
महापरिनिर्वाण दिन विशेषांक २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त कोटी कोटी वंदन!

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय**;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य**;
दर्जाची व संधीची **समानता**;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## ६ प्रेरणा आणि चैतन्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील राजकीयच नव्हे, तर शतकानुशतके रुजलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध सर्वंकष लढा उभारून मूलभूत परिवर्तनाची दिशा दिली. शोषित-पीडित समाजाला स्वत्व, समानता आणि मुक्तीची जाणीव करून देत त्यांनी भारताला नवी सामाजिक दृष्टी दिली आणि याच क्रांतिकारी विचारांच्या बळावर आजही त्यांचे तत्त्वज्ञान काळानुरूप तेजाने झळकत आहे.

## २० स्त्रीमुक्तीचा उद्गाता

भारतातील वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला लढा हा जगाच्या इतिहासात मानवमुक्तीचा लढा ठरला. परंपरेने गुलामीत बंदिस्त झालेली भारतीय स्त्रीसुद्धा बाबासाहेबांच्या मानवमुक्तीचे ध्येय होते. भारतातील विषमतेच्या प्रश्नाला जसे वर्णव्यवस्था व जातिवादाचे अभिन्न स्तर आहेत. तसेच स्त्रीमुक्तीच्या प्रश्नालाही ते आहेच, अशी मौलिक मांडणी बाबासाहेबांनीच सर्वप्रथम केली.

## ५२ कायदा व सामाजिक न्याय

शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनापासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. जर मी कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल, तर मी त्यांचे पालन का करावे? असा त्यांचा सवाल होता.


अमृतमहोत्सवी ‘द अनटचेबल्स्’ — ८
मिलिंद मानकर

इतिहास मीमांसा — १०
डॉ. किशोर जोगदंड

परिवर्तनाचा मंत्र — १२
प्रा. शैलेश धोंगडे

स्वाभिमानाचे नवचैतन्य — १४
रत्नाकर गायकवाड

परिवर्तनाचा अग्रदूत — १६
प्रा.डॉ. सरोज डांगे

कष्टकऱ्यांचा महानायक — १८
भि. म. कौसल

स्वयंप्रकाशित होण्याची प्रेरणा — २२
डॉ. रा. का. क्षीरसागर

मानदंड व्यासंगाचा — २४
वंदना थोरात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट — २६

....आणि शिष्यवृत्ती सुरू झाली — ३२
कृष्णा इंगळे

तात्त्विक अधिष्ठान — ३४
डॉ. कमल रा. गवई

ज्ञानयोगी — ३६
धनंजय कीर

बाबासाहेबांचे पहिले भाषण — ४०
दत्ता भगत

चरित्र आणि विचारधन — ४३
विवेक सौताडेकर

प्रेरक पत्रकारिता — ४६
डॉ. गंगाधर पानतावणे

पाली भाषेला योगदान — ५०
अतुल भोसेकर

राज्यघटनेचा सरनामा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर — ५६
न्या. पी. बी. सावंत

अनुयायांना जाहीर आवाहन — ५७
नागसेन कांबळे

● महापरिनिर्वाण दिन विशेषांक २०२५ ●

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बसस्टॉप, ठाणे (प.)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# आपला आदर्श : आपली प्रेरणा

# भीमराव रामजी आंबेडकर

**अभावग्रस्त समाजाची अस्मिता जागृत करण्याची शक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानात आहे. मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे या तत्त्वज्ञानाने सर्वश्रेष्ठ मूल्य मानलेले आहे. हे सारे कवी आंबेडकरप्रणित समाजक्रांतीचे पुत्र आहेत.**



*आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस तो सुईदोरा कुठे ठेवलास*
*गांजलेल्या जन्मांना नरकातून ओढून पोटाशी घेतले.*

*ती माऊलीची माया तू कुणाजवळ ठेवलीस सगळ्या मापदंडांनी*
*चरणरज व्हावे असा तुझा बुलंद आवाज तू कुठे ठेवलास अरे*
*मी ज्याची भक्ती करावी, शक्ती करावी...*

*ते तुझे इमान तू कोठे ठेवलेस आणि मला समजून घेऊ शकेल*
*ते तुझे सागराएवढे शहाणपण...*

*तू कुठे ठेवलेस ज्यांच्यावर विनम्र होऊन मी ललाट ठेवावे ते*
*तुझ्या चरणांचे युद्धतीर्थ तू कुठे ठेवलेस...*

*असत्याला, ढोंगाला लाथांनी तुडवणारे*
*तुझे ते कठोर निर्णयशास्त्र कुठे ठेवलेस*
*अरे या मनूच्या मुलांनाही माणूस होणे भागच पडेल...*

*अशी तुझी ती जहाल घटना*
*तू कुठे ठेवलीस परमेश्वराच्या प्रेतावर बसून...*

*कर्मविपाकाला माती दिलीस*
*ती अनेकांना हैराण करणारी युगंधर जिद्द...*

*तू कुठे ठेवलीस अरे या बेशरम अत्याचारांना*
*फाडताना आम्ही विजयी होऊत*
*असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस, कुठे ठेवलेस?*

**- यशवंत मनोहर**

लोकराज्य ऑक्टोबर २०१५ मधून पुनर्मुद्रित.

# परिवर्तनाचा मार्गदर्शक दीपस्तंभ

महापरिनिर्वाण दिन (६ डिसेंबर) निमित्त प्रकाशित करण्यात आलेला 'लोकराज्य' विशेषांक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारधनाचे पुनर्परीक्षण करण्याची आणि त्यांच्या कार्याच्या आदर्शांनी प्रेरित होऊन समाजपरिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी प्रदान करतो. आजच्या वेगाने बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक जगात त्यांच्या संदेशाची उपयुक्तता अधिकाधिक वाढत आहे. म्हणूनच 'लोकराज्य' मासिकाचा हा विशेषांक वाचकांना बाबासाहेबांच्या परिवर्तनवादी विश्वाशी नव्याने जोडणारा एक जिवंत दुवा ठरावा, ही आमची मनापासूनची इच्छा आहे.

भारतीय समाजाला समता, न्याय आणि मानवतेच्या मूलभूत मूल्यांकडे नेण्याचा अथक प्रयत्न करणाऱ्या या महामानवाने आयुष्यभर एकच संदेश दिला, 'ज्ञानाशिवाय मुक्ती नाही; संघटनाशिवाय संघर्ष नाही आणि संघर्षाशिवाय परिवर्तन नाही.' हा मंत्र आजही समाजाला दिशा देणारा दीपस्तंभ आहे.

या विशेषांकात मागील काही वर्षांतील 'प्रेरणा आणि नवचैतन्य', 'परिवर्तनाचा अग्रदूत', 'कष्टकऱ्यांचा महानायक', 'कायदा व सामाजिक न्याय', 'ज्ञानयोगी', 'स्त्रीमुक्तीचा उद्‌गाता', 'प्रेरक पत्रकारिता', 'स्वयंप्रकाशित होण्याची प्रेरणा', बाबासाहेबांचे पहिले भाषण, चरित्र आणि विचारधन, डॉ. बाबासाहेब यांचा जीवनपट, इतिहास मीमांसा, पाली भाषेला योगदान, अमृतमहोत्सवी 'द अनटचेबल्स', राज्यघटनेचा सरनामा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कायदा आणि सामाजिक न्याय अशा विविध निवडक लेखांचे पुनर्मुद्रण करून आम्ही बाबासाहेबांच्या विचारांची आणि कृतींची नव्याने उजळणी करण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखांमधून त्यांच्या जीवनकार्याचे सर्वांगीण दर्शन घडते. यासोबतच महापरिनिर्वाण दिन पाळताना काय काळजी घ्यावी किंवा त्याचे पालन कसे करावे? याबाबत देखील माहिती देण्यात आली आहे.

प्रत्येक लेख वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही तितकेच प्रखर, मार्गदर्शक आणि परिवर्तनकारक आहेत. समाजातील तळागाळातील नागरिकांच्या उन्नतीसाठी त्यांनी रचलेली विचारसरणी ही फक्त भूतकाळातील इतिहास नाही; ती आजच्या प्रश्नांना भिडण्याची शक्ती देणारी जिवंत दिशा आहे. भारतीय लोकशाहीमध्ये समतेचे मूल्य अधिक दृढ करण्यासाठी, अंधश्रद्धा, भेदभाव आणि विषमतेच्या सावल्या दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही ठामपणे आपल्याला विवेकाच्या प्रकाशमान मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करतात.

महापरिनिर्वाण दिन हा बाबासाहेबांना स्मरण करण्याचा दिवस असला, तरी त्याहून अधिक तो नवचिंतन आणि आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण बाबासाहेबांच्या विचारांच्या प्रकाशात वर्तमानातील आव्हानांना समजून घ्यावे आणि उज्ज्वल भविष्याचा आराखडा तयार करावा, हीच या विशेषांकामागची प्रेरणा!

'लोकराज्य'चा हा विशेषांक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना विनम्र अभिवादन करीत, वाचकांच्या मनात नवी ऊर्जा, नवे भान आणि परिवर्तनाची दृढ प्रेरणा निर्माण करो, हीच अपेक्षा!

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील राजकीयच नव्हे, तर शतकानुशतके रुजलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध सर्वंकष लढा उभारून मूलभूत परिवर्तनाची दिशा दिली. शोषित-पीडित समाजाला स्वत्व, समानता आणि मुक्तीची जाणीव करून देत त्यांनी भारताला नवी सामाजिक दृष्टी दिली आणि याच क्रांतिकारी विचारांच्या बळावर आजही त्यांचे तत्त्वज्ञान काळानुरूप तेजाने झळकत आहे.**

# प्रेरणा आणि चैतन्य

**डॉ. प्रदीप आगलावे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजात मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांनी भारतीय समाजाला नवीन दृष्टी दिली. समाजातील दलित, शोषित, पीडित समाजाला जागृत करण्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञान दिले. डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य नव्या भारताच्या जडणघडणीसाठी वाहून घेतले होते.

इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या गुलामीतून भारत स्वतंत्र व्हावा, असे त्यांना वाटत होते; पण त्याचबरोबर शेकडो वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीमध्ये खितपत पडलेला दलित, शोषित, पीडित समाजसुद्धा स्वतंत्र झाला पाहिजे, ही त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध बंड पुकारले होते. त्यांचे हे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्धचे स्वातंत्र्ययुद्ध इंग्रजांच्या राजकीय गुलामीपेक्षा अधिक महत्त्वाचे होते. इंग्रजांच्या राजकीय पारतंत्र्यामध्ये असलेल्या भारतीय लोकांना राजकीय गुलामीची जाणीव होती; परंतु सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीमध्ये असलेल्या लोकांना आपल्या गुलामीची जाणीव नव्हती. उलट आपण धर्माचे पालन करतो. दलित, आदिवासी आणि इतर मागासलेल्या लोकांनी आहे त्याच परिस्थितीत राहणे, हाच त्यांचा धर्म आहे, असे त्यांना वाटत होते म्हणून देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीच्या संदर्भात फारसे बंड कुणी केले नव्हते.

## गुलामीविरुद्ध लढा

डॉ. आंबेडकरांनी स्वतः अस्पृश्यतेच्या दाहक गुलामीचे चटके सहन केले होते म्हणून त्यांना जातिव्यवस्थेच्या गुलामीची जाणीव होती आणि त्यांनी त्या गुलामीविरुद्ध शोषित लोकांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी सामाजिक गुलामीविरुद्ध लढा पुकारला. शेकडो वर्षांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक गुलामीविरुद्ध संघर्ष करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानायक होते. डॉ. आंबेडकरांनी केवळ राजकीय नव्हे, तर सर्वंकष गुलामीच्या विरुद्ध संघर्ष केला होता. ही बाब प्रत्येक भारतीयाने लक्षात घेतली पाहिजे.

## राज्यघटनेचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वोत्कृष्ट अशी भारतीय राज्यघटना लिहिली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांचा गौरव केला जातो. असे असले तरी, डॉ. आंबेडकर भारतीय संविधान सभेमध्ये निवडून जाऊ नयेत म्हणून खूप प्रयत्न करण्यात आले होते. शेवटी बंगाल प्रांतातील जस्सौर व खुलना भागातून डॉ. आंबेडकर तेथील शेड्युल्ड कास्ट फेडरेशनतर्फे निवडून आले होते. डॉ. आंबेडकरांचे संविधान सभेतील सदस्यत्व रद्द व्हावे म्हणून बंगाल प्रांताची फाळणी करण्यात आली. इतकेच नव्हे, तर दलितबहुल असलेला जस्सौर, खुलना, बरीसाल, फरीदपूर हा भाग पूर्व पाकिस्तानात (बांगलादेश) समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे ज्यांनी



डॉ. आंबेडकरांना निवडून दिले, त्यांना पाकिस्तानात पाठवण्यात आले. डॉ. आंबेडकरांचे एप्रिल १९४७ मध्ये संविधान सभेचे सदस्यत्व संपुष्टात आले. तेव्हा डॉ. आंबेडकर इग्लंडला गेले. तेथे त्यांनी इंग्रज नेत्यांना ठणकावून सांगितले की, ''भारताला स्वातंत्र्य देताना हिंदू, मुस्लीम आणि दलितांचे मत लक्षात घेतले जाईल, असे वचन दिले आहे. हिंदू आणि मुस्लीम यांचा विचार करण्यात आला. परंतु दलितांना विचारात घेण्यात आले नाही.'' तेव्हा इंग्रजांनी नेहरूंना कळवले की, कोणत्याही परिस्थितीत डॉ. आंबेडकरांना संविधान सभेवर निवडून पाठवा. इंग्रजांच्या दबावामुळे जून १९४७ मध्ये डॉ. आंबेडकरांना मुंबईमधून संविधान सभेवर पाठवण्यात आले.

राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकर यांना त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वामुळे मिळाली. कुणाच्या तरी सांगण्यावरून नव्हे ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे सदस्य होते. मसुदा समितीची बैठक २९ ऑगस्ट १९४७ ला झाली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकर स्वतंत्र भारताचे कायदामंत्री होते. स्वतंत्र भारताचे मंत्रिमंडळ हे सर्वपक्षीय होते. डॉ. आंबेडकरांप्रमाणेच इतर पक्षाचे लोकदेखील या मंत्रिमंडळात होते. डॉ. आंबेडकर हे कायदामंत्री असल्यामुळे ३० ऑगस्ट १९४७ च्या मसुदा समितीच्या बैठकीत सदस्यांनी समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांची निवड केली होती. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून घटना लिहिण्याचे काम डॉ. आंबेडकरांकडे आले आणि त्यांनी अतिशय परिश्रम घेऊन राज्यघटना लिहिली.

## प्रेरणादायी आंबेडकर विचार

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांना सर्वसामान्य लोक तर विसरले नाहीत, उलट त्यांच्या विचारांचा सर्वत्र जोमाने प्रचार होत आहे. डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यांवर आधारित आहे. त्यांच्या विचारांमुळे देशातील शोषित पीडित जनता जागृत होत आहे. त्यांचे तत्त्वज्ञान हे कालबाह्य ठरले नाही. त्यांच्या तत्त्वज्ञानातून केवळ देशातीलच शोषित लोकांना प्रेरणा मिळाली नाही, तर इतर देशातील शोषित लोकांना प्रेरणा मिळत आहे. जपानमध्ये 'बुराकू' नावाची एक शोषित जमात आहे. या जमातीच्या नेत्यांनी भारतात येऊन डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. आज ते नेते डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा बुराकू जमातीत प्रसार करीत आहे. बुराकू जमात डॉ. आंबेडकरांना आपले प्रेरणास्थान मानते. युरोपातील हंगेरी देशातील 'जिप्सो' लोकांचे नेते जानोस ओरसोस यांच्यावर डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रभाव पडला. त्यांनी आंबेडकरांचा विचार हंगेरीतील जिप्सो लोकांमध्ये पेरून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले.

कार्ल मार्क्सच्या जीवनकाळात त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित क्रांती घडली नाही; परंतु १९१७ मध्ये रशियामध्ये मार्क्सच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे क्रांती घडून आली. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या क्रांतिकारी तत्त्वज्ञानामुळे देशातील शोषित समाज जागृत होत आहे. आंबेडकरवादाचा सर्वत्र पुरस्कार केला जात आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित फार मोठी क्रांती भारतात होऊ पाहत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला महत्त्व प्राप्त होत आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतात बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन केले. ही घटना भारतातील बौद्ध धम्माच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. जगातील बौद्ध देशांनीदेखील डॉ. आंबेडकरांच्या या ऐतिहासिक कार्याची दखल घेतली आहे. इतर बौद्ध राष्ट्रात डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ मोठ्या प्रमाणात वाचले जात आहेत. तैवान देशात डॉ. आंबेडकरांच्या इंग्रजी आणि हिंदी ग्रंथांच्या लाखो प्रती प्रकाशित करून हे ग्रंथ मोफत वाटले जात आहेत. डॉ. आंबेडकरांना आदरांजली अर्पण करण्यासाठी मुंबईच्या चैत्यभूमीवर दरवर्षी ६ डिसेंबरला लोक लाखोंच्या संख्येने जातात. त्या दिवशी चैत्यभूमीवर जनतेचा महासागर असतो. नागपूरच्या दीक्षाभूमीवर दरवर्षी देशातील आणि जगातील लोक लाखोंच्या संख्येने येतात.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा आणि कार्याचा हा केवढा प्रभाव आहे? त्यांच्या महापरिनिर्वाणास ५९ वर्ष झाली, तरीदेखील लोकांचे प्रेम कमी झाले नाही.

## प्रत्येक भाषेत आंबेडकरवादी

डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून देशाच्या प्रत्येक भाषेत आंबेडकरवादी निर्माण झाले आहेत. त्यांच्यावर दरवर्षी अनेक संशोधक आणि साहित्यिक नवनवीन ग्रंथ लिहीत आहेत. विदेशातदेखील आंबेडकरी साहित्याची विशेष चर्चा असून, आंबेडकरी साहित्याचा अनुवाद इंग्रजीत मोठ्या प्रमाणात होत आहे. आज सर्वत्र डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथांचा आणि आंबेडकरी साहित्याचा प्रचंड खप होतो. दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांची पुस्तके विकली जातात. ज्या समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, त्या समाजात प्रचंड प्रमाणात ज्ञानार्जनाची वृत्ती निर्माण झाली.

## दडपता न येणारे विचार

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार सर्वत्र जोमाने होत आहे, याचे कारण म्हणजे त्यांच्या विचारांची आज आवश्यकता आहे. त्यांच्या विचारांवर आधारित नवी क्रांती भारतीय समाजात निर्माण होण्याचे हे संकेत आहेत. लोकांच्या मनात डॉ. आंबेडकरांचा विचार रुजला आहे. देशात जी काही क्रांती होईल, ती फक्त आंबेडकरांच्या विचारांतून होऊ शकेल, असे चित्र आज समाजाच्या मनपटलावर दिसत आहे.

भारतात लोकशाही शासनव्यवस्था आहे. परंतु ही लोकशाही निवडणुकीपुरती मर्यादित आहे. अजूनही देशात आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण झाली नाही. यासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेत इशारा दिला होता; परंतु त्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. बुद्धाला अपेक्षित अशी समतामूलक समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीत परिवर्तित करण्यासाठी क्रांतीची आवश्यकता आहे. ही क्रांती डॉ. आंबेडकरांच्या विचारांतून या देशात घडून येईल. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाच्या ५९ वर्षांनंतरसुद्धा त्यांचे तत्त्वज्ञान आणि कार्य हे भारतीय समाजाला प्रेरणादायक आहे.

लोकराज्य डिसेंबर २०१५ मधून पुनर्मुद्रित.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी 'द अनटचेबल्स्' हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक महान विचारवंत रूसो आणि वॉल्टेअर यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या ग्रंथाने यावर्षी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त जागतिक विचारवंतांच्या जीवनकार्याची ओळख...**

# अमृतमहोत्सवी 'द अनटचेबल्स्'


**मिलिंद मानकर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऑक्टोबर १९४८ साली प्रकाशित केलेल्या 'द अनटचेबल्स्' या ग्रंथात अस्पृश्यता उत्पत्तीच्या सिद्धान्ताबद्दल मार्मिक विवेचन लिहून ठेवले आहे. त्यांनी संदर्भांसह या ग्रंथात सिद्ध केले की, 'अस्पृश्य पूर्वी पराभूत लोक होते आणि बौद्ध धर्म तसेच गोमांस खाणे न सोडल्याने त्यांना अस्पृश्य मानले गेले.' ते पुढे लिहितात, 'अस्पृश्यतेचा उगम इ.स. ४०० च्या दरम्यान झाला असावा. बौद्ध धर्म आणि ब्राह्मण धर्म यात श्रेष्ठत्वासाठी जो संघर्ष झाला, त्यापासून अस्पृश्यतेचा जन्म झाला'. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील दोन महान बंडखोर म्हणून रूसो आणि वॉल्टेअर या विचारवंतांचा खास उल्लेख केला आणि म्हटले, 'ब्राह्मणी वाङ्मयाने वॉल्टेअरसारखा बुद्धिवादी नेता निर्माण केला नाही. मागासवर्गीय समाजातून रूसो, वॉल्टेअर सारखे क्रांतिकारक साहित्यिक निर्माण व्हावेत' अशी त्यांची इच्छा होती. रूसो आणि वॉल्टेअर या विचारवंतांसोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर जॉन स्टुअर्ट मिल, एडमंड बर्क, थॉमस पेन, थॉमस जेफर्सन यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव पडला होता.

'फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक' म्हणून वॉल्टेअर आणि रूसो यांना सर्व जग ओळखते. फ्रेंच राज्यक्रांतीचे समता, स्वातंत्र्य आणि बंधुप्रेम या त्रिरत्नाचे तत्त्वज्ञान सर्व जगभर पसरले. मानवी प्रगतीच्या जागतिक इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीची घटना सुवर्णाक्षराने लिहिली गेली. रूसो यांचा 'सामाजिक करार' हा राज्यशास्त्रावर आधारलेला ग्रंथ जगप्रसिद्ध आहे. शिक्षणशास्त्रावर 'एमिल' नावाचा ग्रंथ लिहून त्याने आपले विद्रोही विचार मांडले. या ग्रंथामुळे सर्व फ्रान्स देशात खळबळ माजली होती. रूसोचे तत्त्वज्ञान भावनात्मक आणि अद्‌भुतरम्य होते असे त्याचे टीकाकार म्हणतात. 'ज्याला आपण उत्तम कला, नीती नियम, चांगल्या रूढी, उत्तम संस्कृती असे समजतो तो समाज आणि उच्च लोकांची संस्कृती खरोखरच उच्च आहे काय? याचा पुनर्विचार व्हावा' असे रूसोचे म्हणणे होते. रूसो, वॉल्टेअर हे समकालीन युगप्रवर्तक विचारवंत होते. बुद्धिवंतांना त्यांनी नवा जीवनादर्श दिला.

वॉल्टेअर बुद्धिवादी तत्त्वज्ञान मांडण्यात अतिशय हुशार होता. समाजातील दुष्ट रूढी, अंधश्रद्धा, बुवाबाजी, ढोंगबाजी, दुर्बलांवरील अन्याय यावर तो उपहासात्मक लेखन करत असे. प्रत्येक कार्याला काही तरी कारण असते आणि या कार्यकारण भावाच्या साखळीने सर्व जग बांधलेले आहे. हा कार्यकारणभावाचा वैज्ञानिक सिद्धान्त त्याने आपल्या लेखणीतून जगासमोर ठेवला. त्याला रंगभूमीची भावनात्मक आवड होती. फ्रान्सच्या इतिहासातून प्रेरणा घेऊन त्याने अनेक नाटके लिहिली. 'धार्मिक स्वातंत्र्य माणसाला असावयास पाहिजे' हा विचार त्याने इंग्लंड देशाकडून घेतला. मानवतावादी आणि बुद्धिवादी








दृष्टिकोन समोर ठेवून जनप्रबोधनासाठी 'काँदीद' आणि 'झाँडीग' या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांची रचना केली. ज्या रूसो आणि वॉल्टेअरने फ्रान्सची राज्यक्रांती घडवली, त्यांच्या लेखनशैलीचा आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे होता. रूसोची तळमळ आणि वॉल्टेअरचा बुद्धिवाद त्यांच्या लेखणीत होता. वॉल्टेअरची विचारपद्धती, प्रतिपक्षावर कठोर आसूड ओढण्याची पद्धती त्यांनी जोपासली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडला समतावादी चवदार तळे सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाची तुलना त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीसाठी बोलावलेल्या सभेशी केली होती. (महाड सत्याग्रहाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण, २५ डिसेंबर १९२७)

शोषित, मजूर, दीनदुबळे, उपेक्षित स्त्री, शूद्र यांना उचलून धरण्यासाठी जॉन स्टुअर्ट मिल यांनी आपले विचार मांडले. स्त्री दास्य मुक्ती आंदोलन, मत प्रदर्शनाच्या स्वातंत्र्यावर मिलने जोर दिला. भारतीय स्त्रियांच्या उद्धार आणि अधोगती याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले सविस्तर विचार मांडले. हिंदू अबलांचा सामाजिक दर्जा सुधारावा म्हणून 'हिंदू कोडबिल' मांडले. अशाप्रकारे मिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांत बरेच साम्य दिसून येते. 'राज्यशास्त्राचा जनक' म्हणून एडमंड बर्क ओळखले जातात. ते न्यायप्रिय होते. बर्क म्हणायचे, 'सामाजिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य. समान निर्बंध घालूनच खरे स्वातंत्र्य प्राप्त होते. सामाजिक, आर्थिक न्यायाची हमी हेच खरे स्वातंत्र्य. ज्यावेळी स्वातंत्र्याची आणि न्यायाची फारकत होते, त्यावेळी गुलामगिरी आणि अन्याय सुरू होतात', असे त्यांना वाटे. त्यांनी पार्लमेंटमध्ये दिलेली सर्वच भाषणे हा ज्ञानाचा अमोल ठेवा आहे. त्यांचे प्रत्येक वाक्य हे सुभाषितच होय.

अस्पृश्यता, जातीयता, वर्णाश्रमधर्माची पद्धत कशी अशास्त्रीय, अनैसर्गिक आणि कालबाह्य आहे हे भारतीय जनतेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थॉमस पेनसारख्या प्रभावी भाषेत समजावून सांगितले, 'एक माणूस हा दुसऱ्या माणसाची किंवा एक पिढी ही दुसऱ्या पिढीची मालमत्ता होऊ शकत नाही.' जगातील थोर माणसे लोकशाही समाजातून निर्माण झाली. विकास आणि मानवी कल्याणाच्या बाबतीत लोकशाहीची बरोबरी दुसरी



राज्यव्यवस्था करू शकत नाही' असे पेन यांचे ठाम मत होते. ते लोकशाहीचे परम उपासक होते. त्यांनी आपला 'राईटस् ऑफ मॅन' हा ग्रंथ जॉर्ज वॉशिंग्टन यांना अर्पण केला होता. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही मतप्रणालीवर नितांत श्रद्धा होती. म्हणूनच त्यांना पेनचे तत्त्वज्ञान आवडले असणार!

एका मानवाचे नैसर्गिक हक्क दुसऱ्या मानवास विकण्याचा अधिकार ज्यांनी नाकारला. सामाजिक, धार्मिक पिळवणुकीविरुद्ध आसूड ज्यांनी उचलला अशा महान क्रांतिकारकांपैकी थॉमस जेफर्सन हे एक आहेत. 'ब्रिटिश अमेरिकेच्या हक्काचे संक्षिप्त दर्शन', 'नोटस् ऑन व्हर्जिनिया' नावाचे ग्रंथ त्यांनी लिहिले. स्वातंत्र्याचा जाहीरनामा, धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा आणि व्हर्जिनिया विद्यापीठाची स्थापना या तीन बाबी त्यांनी केल्या. आपल्या थडग्यावरील स्मृतिलेखात या बाबींचा उल्लेख करावा अशी त्यांची स्वतःची इच्छा होती. 'जन्मतःच माणसाला स्वातंत्र्याचा आणि जगण्याचा नैसर्गिक हक्क प्राप्त झाला आहे. तो कोणालाच हिरावून घेता येणार नाही' असे तो ठासून सांगत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच जेफर्सनला ग्रंथवाचन आणि ग्रंथसंग्रह करण्याची आवड होती. सुसज्ज ग्रंथालय त्यांनी स्वतःच्या मार्गदर्शनाखाली बांधून घेतले होते. लोकशाहीची जोपासना करण्यासाठी सुसंस्कृत माणसांची, उत्तम शिक्षणाची आणि संस्काराची आवश्यकता असते म्हणून जेफर्सनने आपल्या २५० एकर जमिनीवर राहत्या घराजवळ व्हर्जिनिया विद्यापीठाची स्थापना केली. राहत्या खोलीमध्ये बसून दुर्बीण लावून तो विद्यापीठाच्या कारभारावर देखरेख करत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेफर्सनचा कॉलेज काढण्याचा आणि चालवण्याचा आदर्श अनुसरला. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई, छत्रपती संभाजीनगरला (औरंगाबाद) महाविद्यालये सुरू केली. उत्तम पोशाख वापरण्याची भारी हौस जेफर्सनला होती, तशीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजात एका प्रसंगी भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'भारतातील नीटनेटका पोशाख करणाऱ्या बॅरिस्टरांपैकी मी एक आहे.' संविधान व कायदे या विषयावर जेफर्सनचा सखोल अभ्यास होता. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायद्याचे सखोल ज्ञान असल्यामुळे ते भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले.

लोकराज्य नोव्हेंबर–डिसेंबर २०२३ मधून पुनर्मुद्रित.

**धार्मिक ग्रंथातील विचारसरणी प्रमाण मानून विशिष्ट मानवसमूहाला गुलाम बनवणाऱ्या विचारसरणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुराव्याच्या, तर्काच्या आधारे वस्तुनिष्ठ इतिहास मांडून छेद दिला. अर्थात पर्यायी इतिहास लेखनातून अस्पृश्यांचा, वंचितांचा पराक्रमी इतिहास मांडला म्हणून बदल म्हणजे इतिहास होय असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच एक इतिहासकार म्हणून उभे राहिले.**

# इतिहास मीमांसा

**डॉ. किशोर जोगदंड**

इतिहासाच्या संशोधनातून मानवी समूहाच्या अस्तित्वाचे, स्वत्वाचे व समस्यांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न निरंतरपणे घडत आला आहे. ऐतिहासिक ज्ञानातून वास्तवातील प्रश्न सोडवण्यासाठी उपयोग करून घेणे ही मानवाची गरज आहे. इतिहासकार हा मानवी समूहाचा एक घटक असतो याचे भान ठेवून त्याला इतिहासलेखन करावे लागते. कारण इतिहासलेखनाची प्रक्रिया ही संस्कारशील प्रक्रिया आहे. इतिहासकार, घटनेवर संस्कार करून ती घटना सबंध मानवी समूहासमोर मांडत असतो. इतिहास वास्तवाला अनेक प्रकारे प्रभावित करत असतो. समाजामध्ये विशिष्ट व्यक्तीचे, गटाचे वर्गाचे, जातीचे व पुरुषांचे प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इतिहासाचा विचारसरणी म्हणून अवलंब केला जात असतो.

## इतिहासाचा पाया रचला

न्यायाने अन्यायावर विजय मिळवणे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची ताकद आहे. ब्रिटिशांच्या अन्यायी नीतीला १८५७च्या उठावाने सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यालाही अपयश आले; पण आधुनिक भारताच्या इतिहासात भारतीय समाजरचनेतील विषमतेचा चक्रव्यूह आपल्या बुद्धिवैभवाच्या जोरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भेदण्यात यशस्वी झाले आणि त्यांनी उपेक्षितांच्या इतिहासाचा पाया रचला. आजचे शूद्र पूर्वी क्षत्रिय वर्णाचाच भाग म्हणून मानले जात होते असे त्यांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?' या ग्रंथातून सांगितले. हा इतिहास भीमा कोरेगावच्या स्तंभातून अधिक स्पष्ट झाला. 'द प्राब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथात भारतीय रुपयाच्या झालेल्या अवमूल्यनाचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषण करून आर्थिक इतिहासाचा दृष्टिकोन दिला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासाचा आधार घेऊन अन्यायग्रस्त, पीडित, उपेक्षित, वंचित मानवी समूहामध्ये लढण्याची प्रेरणा निर्माण केली. सत्याचा अत्यंत कौशल्याने उपयोग करून इतिहासाची पुनर्मांडणी केली, त्यांनी इतिहास मीमांसा करताना चातुर्वर्ण्य जातिसंस्था, अस्पृश्यता यांच्या निर्मितीचा इतिहास, त्याच्या संरक्षणासाठी निर्माण केलेले वाङ्मय, त्याच्याविरुद्ध इतिहासकाळात झालेले संघर्ष याची इतिहास मीमांसा केली. त्यांनी केलेल्या इतिहास मीमांसेला एक उपयोगिता होती. सामाजिक क्रांतीला पूरक व प्रेरक म्हणून ती इतिहास मीमांसा होती. सामाजिक परिवर्तनाचे साधन होती. त्यांनी केवळ इतिहासलेखन केले नाही, तर इतिहासाचा आधार घेऊन व उपयोग करून नवा इतिहास घडवला. अस्पृश्याच्या गुलामगिरीचे मूळ हे जातिव्यवस्थेमध्ये आहे हे ओळखून त्यांना जागे करण्यासाठी अविरत प्रयत्न करत राहिले. 'अस्पृश्यासाठी गांधी आणि काँग्रेसने काय केले?' या ग्रंथात महात्मा गांधीजींना उद्देशून बाबासाहेब म्हणतात, 'चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिव्यवस्था यांची हिंदू धर्मशास्त्रातून हकालपट्टी होईल, तेव्हा आम्ही हिंदू आहोत असे दलितांना म्हणता येईल. हे महात्मा गांधी व हिंदू सुधारकांना मान्य आहे का? त्याचा ध्येय म्हणून स्वीकार करणार का? त्यांच्या मते, खरे शत्रू जातिभेद पाळणारे लोक नसून त्यांना जातिभेद पाळावयास लावणारी शास्त्रे आहेत. थोडक्यात बाबासाहेब प्रश्न उपस्थित करून थांबत नाहीत, तर ते प्रश्न सोडवण्यासाठी पर्याय उपलब्ध करून देतात आणि खरे पाहता हीच सच्च्या इतिहासकारांची कसोटी असते. ती कसोटी

यशस्वीपणे पार पाडण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. हिंदू समाजव्यवस्थेत सुधारणा करण्याची भाषा बोलणे हे या वर्गातील लोकांना भयंकर पाप वाटते, असे बाबासाहेबांचे मत होते. ही मानसिकता आजही भारतीय समाजव्यवस्थेत दिसून येते. बदल घडवून आणण्यासाठी मानसिकतेवरच्या आजारावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घाव घातला होता. नव्हे त्याचे अग्रदूतच ठरले होते. प्रस्थापित बंदिस्त चौकटीची मांडणी, चिकित्सा करून पुराव्यानिशी त्याच्यातला खोटेपणा दाखवून देत आणि तत्कालीन समस्येवर उपाय ही त्यांनी आपल्या लिखाणातून, कृतीतून स्पष्ट केले. आपण मांडलेल्या मतांना उघडपणे प्रतिवाद करावा यांची तयारी ते ठेवत असत.

## इतिहास लेखनविषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कुठलाही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न ठेवता इतिहासाची मांडणी केली. ही मांडणी करताना काही परखड मतेही मांडली. हिंदू धर्मग्रंथांची चिकित्सा करताना म्हणतात, ‘सत्य शोधून काढण्याच्या हेतूने ते वाङ्मय रूढ नियमांच्या कसाला लावून त्यांची पाहणी परीक्षा करावयाची ही इतिहासकारांची परंपरा आहे.’

प्रो. थॉर्नडाईक यांनी म्हटले की, माणूस विचार करतो, ही प्राणिशास्त्रसिद्ध बाब आहे आणि माणूस जो काही विचार करतो, ती समाजशास्त्रसिद्ध बाब आहे म्हणून घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा ठरतो. जर आपला दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित असेल तर ऐतिहासिक संशोधनाला हानिकारक ठरण्याची शक्यता असते. अशा संशोधनात स्वतंत्र बुद्धीची विचारशक्ती दिसून येत नाही. भौतिक विचाराची भर टाकता येत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ‘शूद्र पूर्वी कोण होते?’ या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की, इतिहासकार हा काटेकोर तळमळीचा आणि पंक्तिप्रपंच न करणारा असा असला पाहिजे. भावनारहित आपुलकीची भावना, भीती, तिरस्कार किंवा प्रेमाची ओढ त्याच्यापासून मुक्त असली पाहिजे, इतिहासाची जननी जी सत्यनिष्ठा ती रोमारोमात भिनलेली असली पाहिजे. महत्कृत्यांना सुरक्षित ठेवणारा, अंधाराचा संहार करणारा, पूर्व काळाचा साक्षी आणि भावी काळाचा नेता असा तो असला पाहिजे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, अगदी रिकामे नसणारे नव्हे; पण उघडे असणारे त्याचे मन पाहिजे, खोटेनाटे पुरावे जरी त्याच्या हाती लागले, तरी त्या सर्व पुराव्यांची छाननी करण्याची त्यांची तयारी पाहिजे. इतिहासकार, व्यक्ती या नात्याने समाजाचे अपत्य असल्याकारणाने ते ज्या समाजात जन्माला आले, त्या समाजाविषयी



त्याला सहानुभूती असणे साहाजिकच आहे. या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे ते असे, जुन्या वाङ्मयातील सत्य व असत्य भाग शोधून काढताना तो ब्राह्मणेतर राजकारणाचे वारे आपल्या अंगात आणील हे संभवनीय असले, तरी संशोधन करत असताना असल्या वृत्तीच्या आहारी मी गेलो नाही, याबद्दल मी खात्री देऊ शकतो. शूद्रासंबंधी लिहिताना माझ्या मनात शुद्ध इतिहासाच्या विचाराशिवाय दुसरा कोणताही विचार आला नव्हता. या देशात ब्राह्मणेतर चळवळ अस्तित्वात आहे ती शूद्राची राजकीय चळवळ आहे. हे सर्वांना माहीत होते. त्या चळवळीशी त्यांच्या संबंध होता. तरीसुद्धा बाबासाहेबांनी कुठलाही पूर्वग्रह दृष्टिकोन न ठेवता इतिहासलेखन केले.

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतिहासलेखन हे खुशामत करणारे नव्हते, तर पूर्वीही तशीच स्थिती होती आणि आताही तशीच स्थिती आहे. म्हणून त्यात परिवर्तन करण्यासाठीची गरज म्हणून इतिहासलेखनाला सत्याचा पुरावा देऊन इतिहासलेखन केले. इतिहासाच्या संदर्भात बाबासाहेबांची व्याख्या मोठी उद्बोधक आहे. ते म्हणतात, इतिहास म्हणजे बदल होय. मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी, समतेसाठी, न्यायासाठी आणि प्रत्येक मनुष्याला सन्मानाने जगता यावे यासाठीच बाबासाहेबांचे लेखन प्रेरणा देणारे आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि परखड मते काळाच्या कसोटीवर खरी ठरली, यातच त्यांच्या इतिहासलेखनाचे, इतिहासाबद्दलच्या दृष्टीचे वेगळेपण स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ**


- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद), खरमोडे चांगदेव, शूद्र पूर्वी कोण होते? मिलिंद प्रकाशन, वर्धा, मार्च २००९.
- डॉ.बी.आर.आंबेडकर, व्हॉट कॉंग्रेस अँड गांधी हॅव डन टू द अनटचेबल्स्, महाराष्ट्र शासन, फर्स्ट एडिशन, जानेवारी १९९१.
- बाली एम. आर., डॉ. आंबेडकर और भारतीय संविधान, भीम पत्रिका पब्लिकेशन, तृतीय संस्कारन, २०११.
- इतिहासलेखन मीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका: खंड–१ लोकवाङ्मय गृह प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च २०१०.
- य. दि. फडके २०व्या शतकातील महाराष्ट्र, खंड –३, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, २ ऑक्टोबर १९९१.
- मागाडे बाळासाहेब, (संपादक), समग्र बाबासाहेब थिंक टैंक पब्लिकेशन, सोलापूर, प्रथमावृत्ती, मार्च २०१६.
- गायकवाड अशोक, (संपादक), समाजशास्त्रज्ञ डॉ. बी.आर. आंबेडकर, अनुप प्रकाशन, सोलापूर प्रथम आवृत्ती, १४ एप्रिल २०१३.
- मोरे शंकरराव, डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, जून १९९८.
- खरात शंकरराव (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, २०१४.
- धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००३.
- खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड ७, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८.



लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.

**शिक्षणातूनच सर्वांगीण परिवर्तन होऊ शकते, यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही त्यांना होती. शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते, म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे, असे ते म्हणत.**

# परिवर्तनाचा मंत्र

**प्रा. शैलेश धोंगडे**

ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया होय, म्हणून प्रत्येकाने बुद्धीचा विकास करण्यासाठी हालअपेष्टा सहन करून शिक्षण मिळवले पाहिजे आणि ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. बुद्धीचा विकास करणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळे तो विकास साधता येतो, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर देशातील शूद्र अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी लढा दिला. शिक्षणामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल, त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल. प्रस्थापित विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास ते समर्थ होतील. प्रथम सूत्राचा शोध घेऊन ते आवश्यक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या मनात कोणत्याही विषयाची जिज्ञासा निर्माण होईल, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१३ मध्ये कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी गेले होते. भारतातील सामाजिक परिस्थिती आणि अमेरिकेतील सामाजिक परिस्थितीमधील फरक पाहता त्यांना भारतातील वंचित आणि पीडितांच्या आयुष्यात शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे कळले. म्हणून त्यांनी आपल्या वडिलांच्या मित्राला लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख केला की, 'पालक मुलांच्या जन्माचे साथी आहेत, कर्माचे नव्हे, या संकल्पनेचा आता त्याग केला पाहिजे.' अशी जाणीव करून देताना पुढे, पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात. मुलांच्या शिक्षणाबरोबर आपल्या मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा आणि त्यानुसार कृती करावी.' अशी गरज असल्याची जाणीवसुद्धा करून देतात. पुढे याच पत्रात शेक्सपियरच्या एका इंग्रजी नाटकातील वाक्य उद्धृत करतात की, 'प्रत्येक माणसाच्या जीवनात जेव्हा संधीची लाट येते, तेव्हा तो माणूस त्यावर आरूढ झाला, तर तो समृद्धीच्या मार्गावर जातो; परंतु त्याने जीवनाचा मार्ग त्यागला



तर माणसाच्या वाट्याला दुःखच येणार.' वंचितांच्या आणि पीडितांच्या जीवनात आलेली शिक्षणाची संधी न गमावता शिक्षण घेऊन ज्ञानी झाले पाहिजे, त्यासाठी येईल ते दुःख सहन करावयास पाहिजे, असाही सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात.

शिक्षणाविना माणूस विकासाच्या प्रत्येक आघाडीवर मागेच राहिला आहे; परंतु शिक्षणामुळे त्यांच्याही आयुष्यात क्रांती होईल आणि प्रस्थापित समाजात मान उंचावून तो स्वाभिमानाने जगू शकेल, अशी आशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. त्यामुळे त्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली होती.

मागासवर्गीयांच्या जीवनात शिक्षणाचे किती महत्त्व आहे याची जाणीव करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे. त्याकरिता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक लाभाचा त्याग करण्याची आमची तयारी आहे; पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करण्यास तयार नाही. आता मागासवर्गीयांना जाणवले आहे की, शिक्षणाशिवाय त्यांचे अस्तित्वच सुरक्षित नाही. शिक्षणामुळे परिवर्तन होते, हे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल, तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही, कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, यावर डॉ. आंबेडकर यांची गाढ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव ही डॉ. आंबेडकर यांना होती. 'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या ते करीत.

डॉ. आंबेडकर गुलामाला त्याच्या गुलामीचे गुपित सांगताना म्हणतात की, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम होतो. शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वानुभवाने उच्च शिक्षणाचे किती महत्त्व आहे ते मिलिंद महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणातून सांगतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे, हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगण्यात येते; पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांची मुले प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्यांचे गुलाम व्हावे लागते, तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन निर्दयीपणे लुबाडण्यात आले आहे, त्याचे त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने काय महत्त्व आहे, याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज कशानेच हे साध्य होणार नाही. 'प्रस्थापित समाज व्यवस्थेमुळे विकृतपणे लुबाडण्यात आलेल्यांच्या जीवनात उच्च शिक्षणाचे महत्त्व; तसेच राष्ट्राच्या उभारणीसाठी त्याची आवश्यकता काय, हे डॉ. आंबेडकर यांच्या वरील विधानातून स्पष्ट होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, 'शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे.' व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विद्येची चोवीस तास साधना करावी लागेल, कारण विद्या ही एखाद्या महासागरासारखी आहे. विद्येची ही साधना यशस्वी झाली, तर माणूस जगाच्या पाठीवर आपली कीर्ती पसरवू शकतो. डॉ. आंबेडकर विद्येची चोवीस तास पूजा करीत असत. त्यामुळेच त्यांना जेथे कार्ल मार्क्स, मॅझिनी, लेनिन, सावरकर यांनी संशोधनाचे कार्य केले, त्या लंडन म्युझियममध्ये खुल्या वातावरणात, खुल्या श्वासाने शिक्षण घेता आले. असेच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात घडावे, विद्या सर्वांना अवगत व्हावी, अशी अपेक्षा डॉ. आंबेडकर मनोमनी बाळगत होते. शिक्षणानेच सामाजिक परिवर्तन घडून येते यावर त्यांचा विश्वास होता.

'महामानव' पुस्तकातून पुनर्मुद्रित.

### लोकशाहीच्या संवर्धनासाठी

राष्ट्र निर्माणाच्या प्रक्रियेत तसेच लोकशाहीच्या संवर्धनासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्त्व आहे. डॉ. आंबेडकर या संदर्भात म्हणतात, 'लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता, समाज, नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वात यशस्वी किंवा हमखास यशस्वी ठरू शकेल.' राष्ट्रनिर्माण हा डॉ. आंबेडकर यांच्या आंदोलनाचा मुख्य हेतू होता. त्या हेतूचा मुख्य आधार शिक्षण आहे. 'शिक्षण ही एक पवित्र संस्था आहे. शाळेत मने सुसंस्कृत होतात. शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र होय. ते एक राष्ट्रीयतेचे, मानवतेचे व अज्ञान दूर करण्याचे उदात्त कार्य आहे.' असे डॉ. आंबेडकर समाजमने सुसंस्कृत करण्यासाठी, मानवतेचे संरक्षण करण्यासाठी, शिक्षणाचे विशेष महत्त्व प्रतिपादन करतात. शिक्षणाचे पावित्र्य व समाजाचे भवितव्य विद्यार्थ्यांच्या हातात आहे, असेही ते सांगतात. ते म्हणतात, 'विद्यार्थी आपले कर्तव्य नि जबाबदाऱ्या कशा पार पाडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून आहे.' शिक्षणाबरोबर शिलाची व सदाचरणाची आवश्यकता आहे. त्याशिवाय शिक्षणाला महत्त्व नाही, असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या ऐतिहासिक निर्णयाने भारतीय समाजातील पददलित वर्गाला नवचैतन्य, स्वाभिमान आणि स्वतंत्र विचारांची दिशा देत परिवर्तनाची नवी क्रांती घडवून आणली. बौद्ध धर्माच्या प्रज्ञा, समता आणि करुणा या मूल्यांवर आधारित या धम्मक्रांतीने केवळ दलित समाजालाच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राच्या वैचारिक आणि नैतिक जीवनाला नवी जागृती दिली.

# स्वाभिमानाचे नवचैतन्य

रत्नाकर गायकवाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतीचे मुख्य प्रणेते होय. हजारो वर्षे येथील पददलित समाजाला धर्माच्या नावाने दाबून टाकण्यात आले होते, त्या पददलित समाजाला बाबासाहेबांनी आपल्या हक्कांची जाणीव करून दिली आणि त्यांना संघर्ष करण्यास प्रेरित केले. बाबासाहेब केवळ एक क्रांतिकारक, राजकीय किंवा धुरंधर नेता नव्हते, तर ते एक गंभीर अभ्यासक, सम्यक विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ होते. खऱ्या अर्थाने, बाबासाहेब एक महापुरुष होते.

महापुरुष आपल्या असामान्य विचारांनी समाजाच्या मूळ ढाच्यातच बदल घडवून आणतात व एका नव्या क्रांतीची सुरुवात करतात. बाबासाहेबांनी पददलित समाजात असलेली न्यूनगंडाची भावनाच मुळासकट उखडून टाकली आणि या समाजात अस्मिता निर्माण केली. परिवर्तनासाठी अस्मिता जागृत करावीच लागते हे बाबासाहेबांना माहीत होते. भौतिक आणि धार्मिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी एकाच वेळी दोन पातळ्यांवर बाबासाहेबांना संघर्ष करावा लागला. एका बाजूला दलितांना त्यांचे राजकीय हक्क मिळवून द्यायचे होते, तर दुसऱ्या बाजूला त्यांची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करायची होती.

## स्वाभिमानाची जागृती

धर्मांतरामुळे लगेच सर्व काही बदलेल अशी भाबडी समजूत बाबासाहेबांची मुळीच नव्हती. मात्र धर्मांतराने दलितांमध्ये स्वाभिमान जागृत होणार होता. धार्मिक अंधश्रद्धा आणि उच्चनीचतेने ग्रासलेल्या समाजला स्वतंत्र, समता व बंधुत्वाने बांधले जाणार होते. जग हे ईश्वरनिर्मित आहे आणि उच्चवर्णीय हे त्याची नाळ आहे. हे पारतंत्र्यात नेणाऱ्या विचारांचे जोखड धर्मांतरामुळे फेकले जाणार होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाला माणसासारखी वागणूक मिळणार होती. म्हणूनच १९३५ साली धर्म बदलण्याची बाबासाहेबांनी घेतलेली प्रतिज्ञा १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारण्याने झाली. १२ मे १९५६ साली 'बीबीसी'वर दिलेल्या 'मला बौद्ध धर्म का आवडतो' या भाषणात बाबासाहेब म्हणतात, 'मला बौद्ध धर्म आवडतो कारण तो मला तीन तत्त्वे देतो, जी जगातल्या कोणत्याही धर्मात मिळत नाहीत. सगळे धर्म देव, आत्मा, पुनर्जन्म याचीच व्याख्या करण्यात दंग आहेत. मात्र बौद्ध धर्म मला प्रज्ञा, समता आणि करुणा शिकवतो. बौद्ध धर्म जगाला हेच सांगू इच्छितो की, कोणताही देव किंवा आत्मा जगाला वाचवू शकत नाही. केवळ मनुष्यच आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने समाजाला वाचवू शकतो आणि ती त्याला प्रज्ञा, शील आणि करुणेने प्राप्त होते. कोणतेही धर्मांतर हे कटुता निर्माण करू शकते, मात्र बाबासाहेबांनी याची पूर्ण दक्षता घेतली होती, कारण त्यांचे धर्मांतर ही सुडाची कृती नव्हती. बाबासाहेब म्हणतात, बौद्ध धर्म हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. माझे धर्मांतर हे माझ्या देशाच्या संस्कृतीला किंवा इतिहासाला धक्का न पोहोचवणारे असेल, याची काळजी घेतली आहे.



नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा दिल्यानंतर आपल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

## नवचैतन्य मिळाले

बाबासाहेबांच्या धर्मांतराने काय साधले असे विचारल्यास गेल्या ६० वर्षांच्या इतिहासाची उजळणी आम्हाला करावी लागेल. ज्या लोकांना वेशीबाहेरचे जीवन होते, ज्यांना चांगले कपडेलत्ते नशिबी नव्हते, ज्यांना केवळ शिळेपाके अन्न

खायला मिळत होते, आज तोच समाज बंगल्यांमध्ये राहतो आहे, जगप्रवास करतो आहे व काहींची तर स्वतःची हॉटेल्स देखील आहेत! बाबासाहेबांच्या धर्मांतराने पददलित समाजाला एक नवचैतन्य दिले, ज्यात प्रत्येक व्यक्तीचा स्वाभिमान जागृत झाला. याच धर्मांतराने बाबासाहेबांनी दिलेला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दलित समाजाने आपलासा केला व आज एक स्थान निर्माण केले आहे. बाबासाहेबांच्या मते शिक्षण हे सामाजिक - आर्थिक प्रगतीचे लक्षण आहे. १९५१ मध्ये केवळ १८.३% साक्षरता असलेल्या दलितांची साक्षरता २००१ मध्ये ५६.२% झाली व २०१० मध्ये ती ७६.८% होती. कुठल्याही समाजाने एवढ्या कमी काळात एवढी प्रचंड प्रगती केलेली नाही. धर्मांतराने या समाजाला भगवान बुद्धांची प्रज्ञा, शील व करुणा याची शिकवण दिली. बौद्ध धर्माने दिलेली नीतिमत्तेची शिकवण ही मानवी उत्कर्षाची पहिली पायरी होय. बौद्ध धर्मात असलेला वैज्ञानिक विचार हे माणसाच्या विश्वाला प्रगल्भ करतात, बुद्धविचारामध्ये असलेले सर्व जिवांविषयी करुणा व एकात्मता भावना ही मानवतेची शिकवण देणारी आहे आणि सद्सद्विवेक बुद्धी जोपासणारी आहे. म्हणूनच बाबासाहेबांच्या धर्मांतराने जसा स्वाभिमानी व स्वतंत्र विचाराचा माणूस घडवण्याचे काम केले तसेच तो जबाबदार व आदर्श नागरिक घडेल याचीही खात्री दिली.

## परिवर्तनाची चळवळ

स्वाभिमानाने व शिक्षणाने प्रगत झालेल्या दलित समाजातून राजकीय वारसदार तयार झाले. दलित समाजाचा आवाज ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत गेला. कधीकाळी केवळ भिकेवर जगणारा समाज क्लास फोर पासून ते कलेक्टर, मुख्य सचिवांपर्यंत पोहोचला. हे सर्व शक्य झाले ते केवळ धर्मांतरामुळेच. परिवर्तनाची चळवळ ही सतत चालणारी प्रक्रिया होय. त्याला खतपाणी घालणे, नवनिर्माणाच्या कक्षा रुंदावणे व खणखणीत पिढी तयार करणे ही सततची क्रिया होय. बाबासाहेबांच्या नंतरची पहिली पिढी शिकली, सावरली, स्वतःच्या पायावर उभी राहिली, कष्ट केले व बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र दुसऱ्या पिढीपर्यंत बाबासाहेबांचा संघर्ष म्हणावा तेवढा न पोहोचल्यामुळे, ही पिढी थोडी स्वार्थी झाली. सुखवस्तू झालेली दुसरी पिढी ही मुळातच आपल्या स्वतःच्या परिघातच राहिली. संघर्षासाठी लागणारा त्याग, ध्येय व चिकाटी कमी झाली. मात्र सध्याची पिढी, ही उपजतच दोन पिढ्यांची विचारधारा घेऊन जन्माला आल्यामुळे; त्यांच्यात बाबासाहेबांबद्दल असलेला आदर, चळवळीबद्दल असलेली आस्था आणि बुद्ध विचार समजून घेण्याची तळमळ खूप आशादायक आहे. तीन पिढ्यांचे गुण वारसाहक्काने मिळाल्यामुळे बाबासाहेबांच्या या आताच्या पिढीबद्दल आपण सर्वांनीच आशा बाळगण्यास हरकत नाही.

डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतराकडे केवळ दलितांना माणुसकीचा हक्क प्राप्त करून देणे या मर्यादित दृष्टिकोनातून न बघता, त्यांच्या या महान धम्मक्रांतीत संपूर्ण देशाच्या तात्त्विक, वैचारिक, धार्मिक जीवनात परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य आहे, हे येथे मी विशेष नमूद करू इच्छितो. सारा भारत मी बौद्धमय करीन या डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेत भगवान बुद्धांची मूळ शिकवणूक व शाश्वत तत्त्वे देश निश्चित मान्य करेल हा त्यांचा विश्वास होता.

विशेषतः भगवान बुद्धानंतरचा सुमारे १,२०० वर्षांचा भारताचा इतिहास हा या देशावर भगवान बुद्धांच्या शास्त्रशुद्ध विचारांचा प्रचंड परिणाम व त्यातून निर्माण झालेले सुवर्णयुग लक्षात घेता पुनश्च देशाला देदीप्यमान दिवस प्राप्त होऊ शकतील, यात शंका नाही. संपूर्ण जगाने मान्य केलेल्या या धम्माचा उगम आपल्या देशात झाला, याचा प्रत्येक राष्ट्रभक्त भारतीय नागरिकाला अभिमान आहेच; परंतु हा अमोल ठेवा व वारसा पुनश्च प्राप्त करण्याची इच्छा प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये निर्माण होत आहे हेच खरे परिवर्तन डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतरातून होत आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.


नागपूर येथे दीक्षाभूमीवर उसळलेला भीमसागर

लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित.

**स्त्रियांना शिक्षित करणे, त्यांना जागृत करणे व माणुसकीचे जीवन प्रदान करणे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते. ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती ते सर्व अधिकार स्त्रियांना मिळावे, या ध्येयाने त्यांनी अथक प्रयत्न केले. स्त्रियांना मूलभूत हक्क प्रदान करून त्यांच्या उन्नतीचे सर्व मार्ग त्यांनी मोकळे केले. डॉ. आंबेडकरांनी केवळ अस्पृश्य स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला, असे नाही, तर भारतातील समस्त स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांनी शेकडो वर्षांपासून होणारी स्त्रीची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान, स्वविश्वास जागृत केला. समाजात ताठ मानेने जगण्याचे सामर्थ्य बहाल केले. माणुसकीला पारख्या झालेल्या स्त्री वर्गाला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून दिली. प्राचीन काळापासून ज्या स्त्री वर्गाच्या उत्थानाचा साधा विचारही कुणाला शिवला नाही, ते कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.**

# परिवर्तनाचा अग्रदूत

**प्रा.डॉ. सरोज डांगे**

स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना वाचा फोडणारे डॉ. आंबेडकर हे पहिले सुधारक होते. १९३८ साली स्वतंत्र मजूर पक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने पी. जे. रोहम यांनी मुंबई प्रांतविधिमंडळात संतती नियमनाबाबतचे जे अशासकीय विधेयक मांडले, त्या विधेयकातून आर्थिक विकासाला अवरुद्ध करणारी लोकसंख्या वाढ ही कशी आटोक्यात आणता येईल, यावर विचार करून त्यांनी संतती नियम नाबाबतचा महत्त्वाचा मुद्दा मांडला. संतती नियमनाबाबतच्या विधेयकात दुहेरी सूत्र होते. एक राष्ट्राच्या आर्थिक विकासातील अडथळा दूर करणे. तसेच स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेणे. कुटुंब नियोजन स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने पटवून दिले. अनेक मुलांना जन्म दिल्यामुळे स्त्रिया मृत्युमुखी पडतात. मूल नको असल्यास कृत्रिम गर्भपात करताना स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते आणि भरमसाठ मुलांचे संगोपन व्यवस्थित करता येत नाही. हा दृष्टिकोन पुढे ठेवून ते म्हणाले की,''कोणत्याही कारणासाठी का होईना ज्या वेळी एखाद्या स्त्रीची मूल होऊ देण्याची इच्छा नसेल, त्या वेळी तिला गर्भधारणा टाळता येण्याची मुभा असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे हे सर्वस्वी तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. त्याचबरोबर संतती नियमनाची साधने ही तिच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असली पाहिजे.''



स्त्रियांच्या प्रति डॉ. आंबेडकरांची तळमळ, कारुण्य व ममत्व त्यांच्या या कृतीतून स्पष्ट होते.

### स्त्री कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक

डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना त्यांच्या कौटुंबिक किंवा व्यक्तिगत जीवनात सर्वांगाने स्वतंत्र केले; पण समाजपातळीवरील तिच्या प्रश्नांची सोडवणूक तितक्याच गांभीर्याने केली. स्त्री म्हणून कामाच्या ठिकाणी होणारे तिचे शोषण, तिला मिळणारी दुय्यम वागणूक त्यांच्या नजरेतून सुटली नाही. त्यांनी सार्वजनिक क्षेत्रातही त्यांना न्याय मिळवून दिला. खाणीतील स्त्री कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. त्याचबरोबर स्त्री-पुरुषांना समान मजुरी हे महान तत्त्व प्रथमच स्वीकारण्यात आले. ते फक्त आंबेडकरांमुळे शक्य झाले. त्याचबरोबर प्रसूतिपूर्व काळात स्त्रियांना ठरावीक विश्रांती व सोयी मिळाल्या पाहिजे, ही गोष्ट राष्ट्राच्या हिताची मानली पाहिजे, असे स्पष्ट करून स्त्रियांच्या विश्रांतीच्या हक्काचा अधिकार प्रथमच डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय पातळीवर मांडून त्यांना न्याय मिळवून दिला.

### स्त्री शोषणाचे मूळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री दास्य व तिच्या अवनतीचे मूळ शोधून काढले. स्त्री दास्याचे मूळ त्यांना भारतीय रूढी परंपरेत सापडले. जातीची जडणघडण आणि स्त्री शोषण हे एकमेकांना कसे पूरक आहेत, याची सैद्धान्तिक मांडणी त्यांनी केली.

डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातींचा अभ्यास करताना जातीच्या निर्मितीत स्त्री जातीचा कसा बळी घेण्यात आला, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहावर बंदी घालून तिच्यावर वैधव्याची सक्ती करणे, बालविवाहसारख्या रूढींच्या माध्यमातून अल्पवयीन मुलींचा होणारा छळ यासारख्या सगळ्या धार्मिक रूढी-परंपरांचा त्यांनी भंडाफोड केला आणि स्त्री अत्याचाराला वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांनी स्त्री शोषणाचे मूळ हे जाती व धर्मव्यवस्थेमध्ये असल्याचे सिद्ध केले. माणूस म्हणून जगण्याचा तिचा हक्क रूढी परंपरेच्या नावावर कसा हिरावून घेण्यात आला हे विशद केले. रूढी परंपरेला जन्माला घालणाऱ्या, स्त्री म्हणून अस्तित्व नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे दहन करून

डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीची चळवळ उभी केली.जातिव्यवस्था ही स्त्रियांच्या बलिदानाचे फलित आहे व जातिव्यवस्था हीच स्त्रियांच्या शोषणाचे मूळ आहे हे उदाहरणासह डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

## संघर्षाचा प्रारंभ

अस्पृश्यांच्या हक्कासंबंधीची व स्त्रियांची सार्वजनिक क्षेत्रातील सुरुवात ही महाडच्या संघर्षाच्या रूपात सुरू झाली. या चळवळीच्या अनुषंगाने १९२७ साली बहिष्कृत परिषद भरवण्यात आली. या सभेला मोठ्या संख्येने अस्पृश्य महिला उपस्थित होत्या. या अस्पृश्य महिलांना रूढी-परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी व त्यांच्या मनावर चढलेल्या जुन्या, खुळचट व अनिष्ट विचारांचा गंज काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी परिणामकारक असे भाषण दिले. ते या सभेतील महिलांना उद्देशून म्हणतात की, तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म दिला. इतर लोक आम्हाला जनावरापेक्षाही हीन वागणूक देतात.

आमच्या सावलीचासुद्धा त्यांना विटाळ होतो. इतर लोकांना मानसन्मानाच्या जागा मिळतात; पण तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलीस खात्यातील शिपायाचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा हीन दर्जा आहे. स्पृश्य बायकांच्या पोटी जन्मलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्मलेल्या मुलात काय अंतर आहे? स्पृश्य बायकात जेवढे शील आहे तेवढेच तुमच्यातही आहे, असे असतानासुद्धा स्पृश्य स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक सर्वमान्य व्हावे व तुमच्यापोटी जन्मलेले बालक सर्व ठिकाणी अवमानिले जावे? त्याला साधा माणुसकीचा हक्क मिळू नये याचा विचार तुम्ही केला आहे काय? तुमच्या पोटी जन्म घेतला, एवढेच पाप आमच्या हातून घडले आहे, त्यामुळे आम्हांस ही अस्पृश्यतेची शिक्षा भोगावी लागते आहे. तुमच्या पोटी जन्म घेणे हे पाप का ठरावे याचा विचार केला तर तुम्हाला प्रजा-उत्पत्ती बंद करावी लागेल किंवा तुमच्यामुळे लागत असलेले कलंक तरी तुम्हास धुऊन टाकावे लागेल.''

## समाजोन्नतीचा निश्चय

तुम्ही प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत आम्ही पुढे जाणार नाही. समाजोन्नतीचा जसा पुरुषांनी निश्चय केला तसाच तुम्हीही करा. तुम्ही सर्व जुन्या गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत. ज्या गोष्टींमुळे लोक आपल्याला अस्पृश्य असे ओळखतात, त्या साऱ्या गोष्टी तुम्ही बंद केल्या पाहिजेत. लुगडे नेसण्याची पद्धत, त्याचप्रमाणे गळ्यात भाराभर गळसऱ्या व हातात कोपरभर कथलाचे किंवा चांदीचे गोण-पाटल्या हीदेखील ओळखण्याची खूण आहे. आम्ही ते सोडून दिले पाहिजे. स्वच्छतेने वागण्याची खबरदारी घ्या. घरात कोणतीही अमंगळ गोष्ट होऊ न देणे याबद्दल तुम्ही काळजी घेतली पाहिजे. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद केले पाहिजे. इतरांनीही ते खाऊ नये याची जबाबदारी तुम्ही तुमच्या अंगावर घेतली पाहिजे.

## जागृती व परिवर्तन

डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीसाठी प्रत्येक सभेत अत्यंत प्रभावी व हृदयाला भिडणारी मर्मस्पर्शी भाषणे केली. त्यांच्या या भाषणातून त्यांची स्त्रीउद्धाराची तळमळ स्पष्ट होते. एखाद्या पित्याने आपल्या मुलीची काळजी व तिचे भविष्य उज्ज्वल कसे होईल, याचा ध्यास घ्यावा, तसा ध्यास बाबासाहेबांना दलित स्त्रियांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी लागला होता. त्यासाठी त्यांची जिद्द होती. हजारो वर्षांपासून त्यांच्या समाजातील स्त्रियांची विटंबना होत होती. ती थांबावी व त्यांनीही इतर स्त्री वर्गाप्रमाणे मान-सन्मानाने व प्रतिष्ठेने वागावे अशी त्यांची इच्छा होती.

लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित.

**अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर (१९४२)**



१८, १९ व २० जुलै १९४२ रोजी नागपूरला अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे तिसरे अधिवेशन भरविण्यात आले होते. या अधिवेशनाला २० ते २५ हजार स्त्रिया हजर होत्या. ''एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते.'' हे मूलगामी विचार त्यांनी मांडले. महिलांनी कसे राहावे, कसे वागावे व काय करावे, काय करू नये याचे मार्गदर्शन डॉ. आंबेडकरांनी केले. महिलांच्या राहणीमानावर त्यांनी उपदेश दिला. स्वच्छ राहावे. सर्व दुर्गुणांपासून दूर राहावे. मुलांना शिकवून महत्त्वाकांक्षी बनवावे. मुलांच्या लग्नाची घाई करू नये. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याइतपत लायक करा. पतीची सहचारी बना. माझा हा सल्ला ध्यानात ठेवून वागाल तर तुम्ही स्वतःचीही उन्नती कराल आणि अस्पृश्य समाजालाही प्रगतीच्या मार्गावर न्याल.''

**कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. संविधान सभेमध्ये काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला.**

# कष्टकऱ्यांचा महानायक

**भि. म. कौसल**

कामगारांच्या कल्याणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय कळकळ होती. मध्यवर्ती सरकारच्या श्रम विभागाचे मंत्री या नात्याने कामगार कल्याणविषयक धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना होते. या पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट १९४२ रोजी नवी दिल्ली येथे शासन, मालक आणि कामगारांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत कामगार संघटना (Trade Union), अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा अधिकार असे सर्वसमावेशक धोरण असावे. कामगारांची दुखणी मांडण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असावा, मात्र संपाचा अतिरेक नको इत्यादी विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. उद्योगाच्या आणि श्रमिकांच्या कल्याणविषयक समस्यांचे कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून विश्लेषण आणि समाधान करण्यासाठी, स्थायी आणि प्रातिनिधिक यंत्रणा निर्माण करण्याच्या हेतूने; श्रमसंमेलन आमसभा (Plenary Labour Conference) आणि स्थायी श्रम समिती (Standing Labour Committee) स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.



## कामगारांना सामाजिक सुरक्षा

कामगारांच्या विविध प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्यासाठी ६ सप्टेंबर १९४३ रोजी नवी दिल्ली येथे श्रम संमेलनाच्या आमसभेची बैठक आयोजित करण्यात आली. आमसभेच्या पहिल्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर मंत्री म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले, 'श्रमिकांकरिता उचित श्रममूल्य आणि योग्य सेवाशर्ती निर्धारित करण्याचे कर्तव्य आणि उत्तरदायित्व सरकारने स्वत: स्वीकारले आहे.'

## कामगार संघटनांना मान्यता बंधनकारक

कामगार संघटनांना बळकटी देऊन कामगारांना आपली दुखणी प्रभावीपणे मांडता यावी या हेतूने १९२६ च्या भारतीय कामगार संघटना कायद्यात (Trade Union Act, १९२६) सुधारणा सुचवणारे विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ नोव्हेंबर १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात मांडले. १) मालकाने कामगार संघटनेला मान्यता देणे बंधनकारक करणे २) कामगार संघटनेला मान्यता मिळण्यासाठी संघटनेने विशिष्ट अटी व शर्तींची पूर्तता करणे आणि ३) ज्या संघटनेने मान्यतेबाबतच्या अटी व शर्तींची पूर्तता केली आहे त्या संघटनेला मालकाने मान्यता न दिल्यास तो दंडनीय अपराध ठरविणे या महत्त्वाच्या तरतुदींचा या सुधारणा विधेयकात समावेश होता.

## स्त्री पुरुषांना समान मजुरी

पूर्वी कोळसा खाणीत काम करायला स्त्री कामगारांना बंदी होती; परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे उत्पन्न परिस्थिती आणि कोळसा उत्पादनात होत चाललेली घट विचारात घेता कोळसा उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यावरील प्रतिबंध काढून टाकण्यासाठी दिनांक ८ फेब्रुवारी १९४४ रोजी केंद्रीय विधिमंडळात उपस्थित झालेल्या तहकुबी सूचनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उत्तर दिले.

ते म्हणाले, 'स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यास केलेली मनाई उठवणे म्हणजे काही दुष्कृत्य नव्हे, उलट हे कृत्य अत्यंत समर्थनीय आहे. पुरुष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री

कामगारांना दिला जाईल. स्त्री पुरुषांना समान मजुरी हे महान तत्त्व पहिल्यांदाच स्वीकारण्यात आले आहे.' महिलांना प्रसूती काळात रजा उपभोगताना पूर्ण पगार मिळावा यासंबंधीचे विधेयक डॉ. आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात सादर केले.


## कामगारांना पगारी सुट्टी

कामगारांची प्रकृती चांगली राहावी व त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून कायद्याने दिलेल्या सुट्ट्या कामगारांना मंजूर करण्यात येतात. तथापि सुट्टीची भरपाई करण्याची तरतूद त्यावेळी कायद्यात नव्हती. एखाद्या कामगाराने सुट्टीच्या दिवशी काम केल्यास त्याची भरपाई करण्याची तरतूद करण्यासाठी १ नोव्हेंबर १९४४ रोजी फॅक्टरीज ॲक्ट (दुसरी सुधारणा) विधेयकावर केंद्रीय विधिमंडळात झालेल्या चर्चेला मजूर मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेबांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले.

या विधेयकातील दुसरी तरतूद पगारी रजेबद्दल होती. याशिवाय बारमाही चालणाऱ्या कारखान्यासाठी आठवड्यात कामांच्या तासांची कमाल मर्यादा ४८ आणि हंगामी कारखान्यासाठी ५४ तासांची मर्यादा निश्चित करणे आवश्यक होते. त्या वेळच्या फॅक्टरीज कायद्यात 'ओव्हर टाइम'च्या वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम नव्हता म्हणून कोणत्याही प्रकारचा कारखाना असो 'ओव्हर टाइम'च्या वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम असावा यासाठी वेतनाचा दर दीडपट असावा या दोन प्रमुख सुधारणा सुचवणारा फॅक्टरीज ॲक्ट १९३४ (सुधारणा) विधेयक २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय विधिमंडळात सादर केला.

ट्रेड युनियन ॲक्टमुळे कामगरांना संप करण्याचा अधिकार मिळाला. कामगारांना आपल्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असला, तरी या अधिकाराचा अनाठायी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास कामगारांचे नुकसान होईल ही बाब त्यांनी आवर्जून सांगितली. दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत इंग्लंडच्या बादशाहाने ९ जुलै १९४२ च्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेवरील नेमणुकीस मंजुरी दिल्याची गव्हर्नर जनरल यांनी घोषणा केली. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ जुलै १९४२ रोजी पदभार स्वीकारला. त्यांच्याकडे श्रम, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम आणि खाणकाम ही खाती सोपविण्यात आली. कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. संविधान सभेमध्ये काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचीत समाविष्ट केला.

### समानता नको समभाग पाहिजे



कामगारांना संपाचा हक्क नाकारणारे 'ट्रेड डिस्प्युट बिल' मुंबई प्रांत सरकारने विधिमंडळात सादर केले होते. या विधेयकास कडाडून विरोध करणारे अतिशय अभ्यासपूर्ण, कामगारांप्रती तळमळीने ओतप्रोत विलक्षण दूरदृष्टी असलेले डॉ. आंबेडकरांचे प्रदीर्घ भाषण झाले. विधेयकातील 'संप करणे हा कामगारांचा हक्क असू शकत नाही' या तरतुदीचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. या भाषणाच्या शेवटी डॉ. आंबेडकरांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला. कोणत्याही उद्योगात मिळणारा नफा हा फक्त भांडवलावर नव्हे तर कामगारांच्या घामावर सुद्धा मिळतो असा मुद्दा उपस्थित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उद्योगात कामगारांच्या समान भागीदारीची मागणी केली.

## स्वतंत्र मजूर पक्ष

भारत सरकार कायदा १९३५ नुसार भारतात १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार हे स्पष्ट होते. या कायद्यामुळे जे राजकीय हक्क प्राप्त झाले आहेत, त्याचा फायदा घेऊन अस्पृश्यांमध्ये राजकीय जागृती निर्माण करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरवले. त्यासाठी राजकीय पक्षाची स्थापना करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. तथापि प्रस्तावित राजकीय पक्ष जातीय आधारावर न उभारता या पक्षाला राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या हेतूने शेतकरी व कामगारांच्या लढ्याशी जोडण्याचा त्यांनी निश्चय केला.

गोलमेज परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनेकदा लंडनला जावे लागले. त्यावेळी मजूर पक्षाचे महत्त्वाचे नेते, पदाधिकारी यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली.

मजूर पक्षाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपल्या पक्षाची घटना, कार्यक्रम, ध्येय व उद्दिष्टे ठरवली. अशाप्रकारे १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या नावाने नवीन पक्ष स्थापन केला. शेतकरी व मजूर यांची संघटना बांधून त्यांचे राहणीमान सुधारण्याचा प्रयत्न करणे, विद्यमान जमीनधारा पद्धत अनिष्ट असल्यामुळे ती बदलणे, सामाजिक सुधारणा घडवणे, ग्राम संघटना, कृषी सुधारणा, शिक्षण आदी मुद्द्यांवर या पक्षाच्या जाहीरनाम्यात भर देण्यात आला, या पक्षाची दारे सर्व समाजासाठी मोकळी ठेवण्यात आली. अशा या महामानवास मन:पूर्वक अभिवादन!

लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित.

**भारतातील वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला लढा हा जगाच्या इतिहासात मानवमुक्तीचा लढा ठरला. परंपरेने गुलामीत बंदिस्त झालेली भारतीय स्त्रीसुद्धा बाबासाहेबांच्या मानवमुक्तीचे ध्येय होते. भारतातील विषमतेच्या प्रश्नाला जसे वर्णव्यवस्था व जातिवादाचे अभिन्न स्तर आहेत. तसेच स्त्रीमुक्तीच्या प्रश्नालाही ते आहेतच, अशी मौलिक मांडणी बाबासाहेबांनीच सर्वप्रथम केली.**


# स्त्रीमुक्तीचा उद्गाता

**डॉ. प्रमोद मुनघाटे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांनी भारतातील स्त्रीदास्याची समस्या मांडताना जोतिबा फुलेंचीच भूमिका स्वीकारली आहे. अस्पृश्यतेचा आणि जातिव्यवस्थेचा प्रश्न समजून घेण्यासाठी बाबासाहेबांनी मनुस्मृतीसकट सर्व धार्मिक ग्रंथाची कठोर चिकित्सा केली आहे. रामायण, महाभारत व सर्व हिंदू पुराणांची मानवीयतेच्या दृष्टिकोनातून झाडाझडती घेताना त्यांच्या लक्षात आले की वर्णवाद, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेची मुळे याच धार्मिक ग्रंथांमध्ये आहेत. एवढेच नव्हे तर हिंदुधर्मातील सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहास बंदी या स्त्रियांच्या गुलामगिरीच्या प्रथांचा संबंध जातिव्यवस्थेशी कसा आहे, ते त्यांनी आपल्या काही ग्रंथांमधून सप्रमाण सिद्ध केले आहे. प्रत्येक जातीत लोकसंख्येच्या प्रमाणात जर स्त्रियांची संख्या अर्धी असेल, आणि विधवांना पुनर्विवाहाची परवानगी मिळाली तर असे पुनर्विवाह परजातीतील पुरुषांशी होण्याची शक्यता अधिक. अशा शक्यता गृहीत धरून; विधवा पुनर्विवाहास बंदी अशा प्रकारचे निर्बंध घालण्यात आले, असे विश्लेषण त्यांनी केले आहे.

### अंधश्रद्धेवर आघात

भारतातील स्त्रियांच्या गुलामगिरीस लोकमानसात रुजलेल्या अंधश्रद्धा कारणीभूत असल्याचे बाबासाहेबांच्या लक्षात आले होते. माणसामाणसांत आणि स्त्री-पुरुषांतील समानतेमध्ये विषमतेच्या भिंती धार्मिक पुराणे आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी निर्माण केल्या असल्यामुळे, त्या



अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर (१९४२)

ग्रंथांबद्दल लोकांच्या मनात असलेली अंधश्रद्धा नष्ट करणे आवश्यक होते. म्हणून त्यांनी प्रथम 'मनुस्मृती'चे दहन करण्याचा निर्णय घेतला. 'मनुस्मृती'मध्ये असे काय लिहिले होते? 'मनुस्मृती' म्हणते, पती पत्नीला सोडू शकतो, गहाण ठेवू शकतो किंवा विकू शकतो. पण पत्नी स्वत:हून पतीला कोणत्याही स्थितीत सोडू शकत नाही.

स्त्रीला स्वत:ची संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाही. कारण ती स्वत:चा पिता, पती किंवा पुत्राची संपत्ती असते. जनावर, वेडा, शूद्र आणि नारी हे सर्व छळ करण्यास योग्य आहेत. स्त्रियाही अपवित्र आहेत. म्हणून त्या शिक्षण घेण्यास पात्र नाहीत. या अशा धर्माज्ञांचा तुलसीदासासारख्या कवीवरही प्रभाव होता, आणि त्या कवींच्या कवनांचा प्रसार समाजात झालेला होता. थोडक्यात 'मनुस्मृती' ही भारतातील विषमतावादी, कर्मकांडवादी, वर्ण व जातीयवादी विचारांची प्रतीक होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे 'मनुस्मृती'चे जाहीर दहन केले.

## गुलामगिरीतून मुक्ती

या प्रतीकात्मक कृतीमुळे दलित-बहुजनांना आणि स्त्रियांना सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचे बळ मिळाले, हे बाबासाहेबांचे भारतातील स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या संदर्भातील ऐतिहासिक कार्य होय. स्त्रियांच्या संदर्भातील सुधारणांची पुढे चळवळ झाली. १९७५ नंतर स्त्रीमुक्तीचे लोण सर्व देशभर पसरले. स्त्रीवाद म्हणून संपूर्ण जगात एका नव्या वैचारिक प्रवाहाचे मंथन सुरू झाले; परंतु भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीला तात्त्विक अधिष्ठान मिळाले ते बाबासाहेबांनी केलेल्या हिंदू धर्म व पुराणांच्या सखोल व परखड चिकित्सेमुळे. स्त्री हीसुद्धा एक व्यक्ती आहे, मानव आहे, अशा आदर्शवादी भूमिकेपर्यंत ते थांबले नाहीत. तर भारतातील स्त्रीदास्याचे मूळ त्यांनी शोधून काढले. स्त्रियांच्या दुर्दशेस कारणीभूत असलेल्या अंधश्रद्धांचे मूळ हिंदुपुराणे व महाकाव्यात कसे आहे, ते त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. स्त्रियांच्या गुलामगिरीचा व अस्पृश्यता, जातीयता व वर्णवादाचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. त्यांनी आयुष्यभर संस्कृत, तत्त्वज्ञान, इतिहास व समाजशास्त्र या विषयांचा गाढा अभ्यास केला म्हणून त्यांना ती क्रांतिकारक मीमांसा करता आली, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून सर्व प्रकारच्या समस्यांना व गुलामीला शिक्षण हे एक उत्तर असे त्यांनी सतत सांगितले आहे. अर्थात भारतातील स्त्रियांना त्यांचे नैसर्गिक हक्क मिळवून द्यायला त्यांना फार मोठा संघर्ष करावा लागला. त्यांच्या विद्वत्तेने त्यांनी धर्म-पुराणातील विषमतावादी, अमानुष व अन्यायकारक मुळे शोधली; पण महिलांना त्यातून खऱ्या अर्थाने मुक्त करण्यासाठी बाबासाहेबांना संघटन, चळवळ आणि सक्रिय राजकारण यांचा आधार घ्यावा लागला, हेही लक्षात ठेवले पाहिजे.

### ऐतिहासिक घटना

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकसभेत मांडलेले 'हिंदू कोड बिल' ही भारताच्या इतिहासातील एक फार मोठी ऐतिहासिक घटना मानली जाते. केवळ दलित व बहुजन नव्हे तर भारतातील संपूर्ण स्त्रीवर्गाच्या स्वातंत्र्याचा मार्ग, बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलामुळे मोकळा झाला. मनुस्मृतीसारख्या ग्रंथानी स्त्रियांचे सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. ती समाजात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या दावणीला बांधलेल्या जनावरासारखी गुलाम होती. तिला कौटुंबिक, सामाजिक सन्मान नव्हता, कोणत्याही प्रकारचे आर्थिक अधिकार नव्हते. परंपरेने स्त्रियांच्या वाट्याला केवळ दु:ख आणि अन्याय दिला होता. तो अन्याय दूर करण्यासाठी मानवता-वादी व करुण हृदयाच्या बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले. १९४७ पासून चार वर्षे रात्रंदिवस कष्ट करून त्यांनी हा स्त्रीस्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला होता.**

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात बाबासाहेब पहिले कायदेमंत्री होते. त्यांनी २१ सप्टेंबर १९५१ रोजी 'हिंदू कोड बिल' मांडले; परंतु भारतातील पुरुषप्रधान व सनातनी मनोवृत्तीच्या लोकप्रतिनिधींना स्त्रियांचे स्वातंत्र्य रुचले नाही. त्यांनी कडाडून विरोध केला. या बिलामुळे स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार होती. स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा व प्रतिष्ठा मिळावी, हेच बाबासाहेबांचे स्वप्न होते. प्रारंभी या बिलाचे एकूण सात भाग होते. १. स्त्रियांना मालमत्तेचा वडिलोपार्जित अधिकार २. मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार ३. पोटगी ४. विवाह ५. घटस्फोट ६. दत्तकविधान ७. अज्ञानत्व व पालकत्व. भारतीय राज्यघटनेने जात, धर्म किंवा लिंग यातील भेद अमान्य करून सर्व स्त्रीपुरुषांना समान दर्जा दिलेला आहे, मग स्त्रियांना समान दर्जा देणारे 'हिंदू कोड बिल' का मान्य होऊ नये; परंतु लोकशाहीविरोधी पुराणमतवादी वृत्तीमुळे ते बिल मंजूर झाले नाही, यामुळे बाबासाहेब इतके दु:खी झाले की, त्यांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

पुढे १९५५ मध्ये 'हिंदू कोड बिल' मात्र वेगळ्या स्वरूपात मंजूर झाले. १. हिंदू विवाह कायदा २. हिंदू वारसाहक्क कायदा ३. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा ४. हिंदू दत्तक व पोटगी कायदा. अंशत: का होईना पण स्त्रीस्वातंत्र्याचे बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले. या कायद्यामुळे भारतीय स्त्रीला पुरुषांबरोबरचा दर्जा मिळाला. ती व्यक्ती म्हणून समाजात स्वाभिमानाने जगण्यास पुढे येऊ शकली. या अर्थाने भारताच्या शतकानुशतकाच्या इतिहासाला हिंदू कोड बिलामुळे ऐतिहासिक वळण मिळाले. महात्मा फुले यांनी रुजवलेले स्त्रीमुक्तीचे बीज आपल्या प्रज्ञेने व कर्तृत्वाने प्रचंड संघर्ष करीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाढवले. हे त्यांचे कार्य केवळ भारतीय स्त्रियांच्या संदर्भातच नव्हे तर एकूण मानवजातीच्या दृष्टीने ऐतिहासिक आहे.

लोकराज्य एप्रिल २०१७ मधून पुनर्मुद्रित.


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे क्रांतिकारी समाजसुधारक, अस्पृश्यांचे उद्धारक, भारतीय संविधानाचे शिल्पकार, बौद्धधम्म प्रवर्तक, जसे आहेत, त्याचप्रमाणे हे एक महान शिक्षणतज्ज्ञही होते. शिक्षणाच्या प्रक्रियेद्वारे ज्ञान देऊन व्यक्तीच्या, बुद्धीच्या व विचारांच्या कक्षा वाढवल्या जातात आणि नीतिमूल्यांचे संस्कार करून; त्यांना सुजाण नागरिक बनवले जाते. शिक्षणामुळे व्यक्ती विवेकी, स्वावलंबी, स्वाभिमानी व समाजाभिमुख बनते. म्हणून प्रत्येकाच्या जीवनात शिक्षणाची नितांत आवश्यकता असते. भारतातील विषमतावादी समाजरचनेमुळे तथाकथित अस्पृश्य आणि शूद्रांना, स्त्रियांना अन्य मूलभूत अधिकारांसह शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जीवनभर संघर्ष करावा लागला. त्यातूनच त्यांनी समाजातील उपेक्षित वर्गाच्या शैक्षणिक विकासाला चालना दिली.**

# स्वयंप्रकाशित होण्याची प्रेरणा

**डॉ. रा. का. क्षीरसागर**

शिक्षणासंबंधी मूलगामी विचार प्राचीन काळी भगवान बुद्धाने 'अत्त दीप भव' स्वयंप्रकाशित व्हा या विचारामधून मांडलेला होता. भारतातील शोषितांच्या दु:खाचे कारण, आर्थिक शोषणाच्या मानाने अज्ञानात अधिक आहे; असा अत्यंत मूलगामी विचार महात्मा फुले यांनी मांडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांच्या विचाराला अनुसरून अज्ञानाला जन्म देणाऱ्या स्पृश्यास्पृश्यतेवर आधारित समाजाची संरचनाच मोडीत काढण्याचा विचार मांडला. म्हणूनच त्यांनी सामाजिक विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या मनुस्मृतीचा धिक्कार करून स्वातंत्र्य, समता व बंधुत्वावर आधारित बौद्धधम्म स्वीकारला आणि तो आपल्या अनुयायांना दिला.



### शिक्षणाचे महत्त्व

हिंदू समाजव्यवस्थेतील अस्पृश्यतेमुळे बाबासाहेबांना अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागले होते त्यावर शिक्षण हा एक महत्त्वाचा उपाय वाटत होता. ते औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीच्या कोनशिला बसवण्याच्या वेळी म्हणाले, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या वर्गाची प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन राष्ट्राच्या दृष्टीने आाणि त्यांच्या स्वत:च्या दृष्टीने काय महत्त्वाचे आहे, याची जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही.

त्यांनी शिक्षणाबरोबर शीलही सुधारले पाहिजे असा पुणे येथील विद्यार्थ्यांच्या संमेलनात (१९३८) मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले, आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाला महत्त्व आहे, यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे.

### प्रज्ञा आणि करुणा

पुढे (१९५५ ) त्यांनी असे म्हटले की, 'विद्येबरोबर भगवान बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपण, शील म्हणजे सदाचाराने संपन्न असे आचरण, करुणा म्हणजे सर्व मानव जातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे प्राणिमात्राविषयीची आत्मीयता या चार पारमिता असल्या पाहिजेत. तरच विद्वतेचा काही उपयोग आहे'. अशा रितीने शैक्षणिक अभ्यासक्रम तर पूर्ण केलाच पाहिजे; पण त्याबरोबरच नीतिमूल्यांचाही अंगीकार केला पाहिजे, असे अत्यंत मौलिक विचार त्यांनी मांडले.

### क्रांतीचे सूत्र

बाबासाहेबांनी १९५४ मध्ये स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संघटनेचे ब्रीदवाक्य होते, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' बहिष्कृतांना असे

शिक्षण द्यावे की जेणेकरून ते अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त होतील व त्यासाठी संघटित होतील. शिक्षणाच्या माध्यमातून जागृती, जागृतीमधून संघटन आणि संघटनेच्या शक्तीमधून सामाजिक क्रांती असे त्यांच्या क्रांतीचे सूत्र होते.

## लोकशाही आणि शिक्षणव्यवस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही आणि शिक्षणव्यवस्था यांचा अन्योन्यसंबंध जोडलेला होता. त्यांनी १९४५ मध्ये स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा मुख्य उद्देश येणेप्रमाणे स्पष्ट केला. 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा उद्देश केवळ शिक्षण देणे नसून अशा प्रकारचे शिक्षण देणे की, ज्यामुळे बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीला चालना मिळेल. अशा प्रकारच्या शिक्षणाची आधुनिक भारताला गरज आहे आणि अशाच प्रकारचे शिक्षण देणे भारतात प्रवर्धित करावे अशी भारताच्या हितचिंतकांची इच्छा आहे.'

शिक्षणाचे महत्त्व न जाणलेल्या आणि शिक्षण घेण्याची ऐपत नसलेल्या लोकांसाठी त्यांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला होता. तसेच जे लोक बालपणी शिक्षण घेऊ शकत नाहीत किंवा मोठेपणी कामाधंद्यामुळे दिवसा शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांना रात्र-शाळेत शिक्षण द्यावे असा सल्ला दिला. केवळ आर्थिक परिस्थितीमुळे कोणालाही शिक्षण अर्धवट सोडण्याची पाळी येऊ नये असे सरकारने पाहावे असे त्यांचे मत होते.

## उच्च शिक्षणाला महत्त्व

डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारात उच्च शिक्षणाला महत्त्वाचे स्थान होते. विद्यार्थ्यांनी केवळ प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेऊन थांबू नये तर त्यांनी उच्च शिक्षण घेऊन उच्च प्रशासकीय सेवेत प्रवेश करावा आणि मानाच्या किंवा मोक्याच्या जागा घेऊन समाजाची व देशाची सेवा करावी असे त्यांचे मत होते. सर्वसाधारण शिक्षण असो की, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण असो मागासवर्गीयांनी खूप परिश्रम घेऊन आपली गुणवत्ता सिद्ध करावी असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी असे म्हटले की, 'पुढारलेल्या जातींच्या लोकांशी स्पर्धा करून तेथे बुद्धीचा प्रभाव पाडल्याशिवाय नुसत्या शिक्षणाचे चीज होणार नाही.'

**'माझ्या कल्पनेतील आदर्श समाज हा स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित असेल. या नवसमाज व्यवस्थेच्या रचनेत शिक्षणाची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे प्रत्येकाला शिक्षणाची उचित व समान संधी असावी. अशा मूलगामी व शाश्वत मूल्यांवर आधारित समाज व्यवस्थेवर बाबासाहेबांचा दृढ विश्वास होता.'**



मिलिंद महाविद्यालयाच्या प्रारंभीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. सविता आंबेडकर आणि प्राचार्य एम. बी. चिटणीस.

जातीवर आधारित समाजव्यवस्थेत उच्चशिक्षण घेण्यासाठी आर्थिक ताण सहन करणे लोकांना शक्य नसते याची जाण त्यांना होती. म्हणून अशा विद्यार्थ्यांना सरकारतर्फे शिष्यवृत्ती मिळावी, वसतिगृहाची सोय केली जावी व अन्य सवलती मिळाव्यात, एवढेच नव्हे तर योग्य विद्यार्थांना उच्चशिक्षणासाठी परदेशात जाण्याचीही संधी मिळावी असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या शब्दात, शिक्षण ही अशी बाब आहे की, जी प्रत्येकाच्या आवाक्यात असली पाहिजे, म्हणून त्यांनी शैक्षणिक सवलतींसाठी सातत्याने आग्रह धरला. परिणाम : १९३२ मध्ये झालेल्या पुणे करारातील एकूण अटींमध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रत्येक प्रांतात खास आर्थिक तरतूद केली जाईल, असे नमूद करण्यात आले होते. पुढे जेव्हा ते केंद्रीय मंत्रिमंडळात मजूर मंत्री झाले, तेव्हा त्यांनी अनुसूचित जातींच्या विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करून घेतली. अनुसूचित जातीसाठी १९९४ पासून व अनुसूचित जनजातीसाठी १९४८ पासून मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्यास सुरुवात झाली. तसेच संविधानात अनुसूचित जाती, जनजातीसाठी व मागासवर्गीयांसाठी शिक्षणात व सरकारी सेवेत विशेष संधी मिळण्यासाठी त्यांनी पर्याप्त तरतूद करून ठेवली. हे त्यांचे भारतातील सर्व शोषित व वंचित समाजाच्या हितासाठी फार मोठे योगदान आहे.

## गुणवत्तेसाठी पराकाष्ठा

शैक्षणिक प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शासन या चारही घटकांची महत्त्वाची भूमिका असते. त्यांनी विद्यार्थांना शैक्षणिक 'गुणवत्ता' वाढवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा संदेश दिला. पालकांना 'आपण शिक्षण देण्यात कसूर करू नका', असा संदेश दिला. शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त अध्ययन आणि संशोधन करण्याचा सल्ला दिला. तसेच शासनाला सोयी सवलत उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले.

लोकराज्य एप्रिल २०१७ मधून पुनर्मुद्रित.

**जगभरातील अभ्यासकांना प्रेरणा देणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते नव्हते, तर अर्थशास्त्र, राजकारण, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्र आणि प्रशासन अशा विविध ज्ञानशाखांचा सखोल अभ्यास करणारे द्रष्टे विचारवंत होते. कोलंबिया विद्यापीठाने गौरवलेल्या या प्रज्ञासंपन्न व्यक्तिमत्त्वाने भारतीय समाजरचनेचे पुनरुत्थान, आर्थिक स्वावलंबन व मानवकल्याणाच्या दिशेने मांडलेल्या दूरदर्शी उपाययोजना आजही काळाच्या कसोटीवर तितक्याच लागू व उपयुक्त ठरतात, हीच त्यांच्या कार्यकर्तृत्वाची सार्वकालिकता आहे.**

# मानदंड व्यासंगाचा

**वंदना थोरात**

जगभरातील अभ्यासकांना प्रेरणा देणाऱ्या बाबासाहेबांचा अर्थशास्त्र, राजकारण, समाजकारण, इतिहास, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, कृषी, जलसंधारण, कुटुंबनियोजन, भाषावार प्रांतरचना अशा विविधांगी ज्ञानशाखांचा सखोल अभ्यास होता. प्रत्येक विषयाचे विस्तृत विवेचन, अभ्यासपूर्ण मांडणी आणि सार्वकालिक उपयुक्तता ही त्यांच्या लेखनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

डॉ. बाबासाहेब एक निष्णात अर्थतज्ज्ञ होते. सैद्धान्तिक व व्यावहारिक आर्थिक प्रश्न दोन्हींबाबत त्यांनी अभ्यासपूर्ण दर्जेदार अर्थशास्त्रीय लेखन केले आहे. एम.ए.ची पदवी संपादन करण्यासाठी १९१५ साली त्यांनी कोलंबिया विद्यापीठाला ‘ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी’ या विषयावर प्रबंध सादर केला. १९३२ साली त्यांचा ‘द प्रॉब्लेम ऑफ रूपी : इट्स ओरिजिन अ‍ॅण्ड इट्स सोल्युशन’ हा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेला डी. एस्सी.साठी सादर केलेला अत्यंत मौलिक ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्यांनी रुपयाचा विनिमय दर, त्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या, भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम, त्यावरील उपाय याबाबत मूलगामी सैद्धान्तिक मीमांसा केली आहे.



### पुस्तकांवर जिवापाड प्रेम

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ प्रा. एडविन कॅनन यांनी या ग्रंथास प्रस्तावना लिहिली आहे. हा ग्रंथ एवढा महत्त्वाचा ठरला की, अवघ्या एक दोन वर्षांतच त्याच्या सर्व प्रती संपल्या. १९२५ साली बाबासाहेबांचा दुसरा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध झाला, तो म्हणजे ‘द इव्होल्युशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया : अ स्टडी इन द प्रोविन्शियल डिसेंट्रलायझेशन ऑफ इंपिरियल फायनान्स’ हा होय. हा ग्रंथ म्हणजे पीएच.डी. पदवीसाठी कोलंबिया विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध होय. या ग्रंथात बाबासाहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या वित्तीय व्यवहारांची मूलगामी मीमांसा केली आहे. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या उत्पन्नाची साधने कोणती असावीत व त्यांनी कोणत्या गोष्टींवर खर्च करावा, या संबंधीचे अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन बाबासाहेबांनी या ग्रंथात केले आहे. या ग्रंथाला कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक व प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ एडविन आर. सेलिग्मन यांनी प्रस्तावना लिहून या ग्रंथांची थोरवी व्यक्त करताना म्हटले आहे, ‘प्रस्तुत विषयाच्या प्रतिपादनास डॉ. आंबेडकर यांनी फार मोठे योगदान दिले आहे. या योगदानाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सादर केलेल्या तपशिलाची वस्तुनिष्ठता आणि त्यांच्या स्वतःच्या देशात घडून येत असलेल्या महत्त्वपूर्ण स्थित्यंतरांचे (घटनेचे) निष्पक्षपाती विश्लेषण हे होय. त्यांच्या अभ्यासातून निघणारे निष्कर्ष हे इतर देशानांही लागू होणारे आहेत, याबाबतच्या सिद्धान्ताचा इतका तपशीलवार अभ्यास, माझ्या माहितीप्रमाणे दुसऱ्या कुणीही केलेला नाही.’

विद्यार्थीदशेपासूनच तल्लख बुद्धिमत्ता लाभलेल्या बाबासाहेबांचे वाचन आणि पुस्तकांवर जिवापाड प्रेम होते. एकवेळ त्यांना जेवणासाठी वेळ मिळाला नाही, तरी चालत असे मात्र वाचनात, अभ्यासात व्यत्यय आलेला त्यांना चालत नसे. कोणत्याही विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यावर त्यांचा नेहमीच कटाक्ष होता. त्यामुळेच बाबासाहेबांचे विविध विषयांवरचे प्रभुत्व, परिपक्वता आणि बौद्धिक समृद्धी त्यांच्या समग्र कार्यकर्तृत्वातून प्रकर्षाने अधोरेखित होत राहते.

त्यांच्या ग्रंथसंपदेत अर्थशास्त्रीय विषयावरील लेखनात इस्ट इंडिया कंपनी-प्रशासन आणि वित्त प्रणाली (१९१५), ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती (१९१७), भारतातील लहान जमीनधारणा समस्या आणि उपाय (१९१८), रुपयाचा प्रश्न - उदगम आणि उपाय (१९२३) हे ग्रंथ आहेत. तसेच समाजशास्त्रीय विषयावरील जातिनिर्मूलन (१९३६), महात्मा गांधी यांना उत्तर (१९३७), मुक्ती कोन पथे (१९३६) हे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय आणि



एकंदरीतच सर्व लेखन प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्ण कालखंडातील आर्थिक समस्यांशी निगडित असूनदेखील त्यांचा दूरदर्शीपणा व त्यांच्या विचारातील सखोलपणा यामुळे त्यांचे लेखन देशाच्या काही आर्थिक समस्यांवर अगदी आजही उपयुक्त उपाय सुचवणारे आहे.

## मूलभूत लिखाण

अर्थतज्ज्ञ आणि कायदेपंडित असलेल्या बाबासाहेबांनी मानवी जीवनाशी निगडित अनेक ज्ञानशाखांचा अभ्यास करून त्याची सखोल मांडणी केलेली आहे. मानववंशशास्त्र हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामध्ये त्यांनी मूलभूत लिखाणही केलेले असून, त्यातील भारतातील जाती-त्यांची उत्पत्ती, विकास आणि प्रसार (१९२८), शूद्र पूर्वी कोण होते (१९४६), अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे झाले (१९४८) या ग्रंथांचा समावेश आहे.

## वृत्तपत्रीय लेखनातही हातखंडा

समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये स्त्रियांची प्रगती ही अत्यावश्यक बाब आहे. याची आग्रही मांडणी बाबासाहेबांनी सातत्याने केली. त्यासोबतच त्याला कायदेशीर अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी हिंदू कोडबिल १९५१ साली मांडले. या सर्व ज्ञानशाखांसोबतच बाबासाहेबांनी विविध धर्मांचाही अभ्यास केलेला होता. त्यातून त्यांनी द बुद्ध अँड हिज धम्म (१९५६-५७) बुद्ध आणि कार्ल मार्क्स (१९५६) या ग्रंथांचे लेखन केले. यासोबतच बाबासाहेबांनी विविध आयोग, कमिशन यांना तत्कालीन सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने वस्तुस्थितिदर्शक निवेदने, साक्षही दिलेली आहे. जे कुठल्याही ग्रंथाइतकेच मार्गदर्शक आणि उल्लेखनीय आहे. यामध्ये साऊथबरो कमिटी- १९१९, सायमन कमिशन- १९२८, गोलमेज परिषद- १९३०-३१, लोथियन कमिटी-१९३२, क्रिप्स सुधारणा प्रस्ताव-१९४२, कॅबिनेट मिशन- १९४६, ही निवेदने तसेच साक्षी पुरावे यांचाही समावेश आहे. संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य (१९३९), पाकिस्तान अथवा भारताची फाळणी (१९४०), रानडे, गांधी आणि जिना (१९४३), काँग्रेस आणि गांधी यांचे अस्पृश्यांविषयीचे धोरण (१९४५), सांप्रदायिक पेचप्रसंग आणि उपाय (१९४६), राज्य आणि अल्पसंख्याक (१९४७), महाराष्ट्र - एकभाषिक राज्य (१९४८), भाषावार प्रांतरचना - काही विचार (१९५५) यांचा समावेश आहे. त्यासोबतच समाजप्रबोधनासाठी प्रभावी माध्यम असलेल्या वृत्तपत्रीय लेखनातही बाबासाहेबांचा हातखंडा राहिलेला आहे. त्यांच्या जनता, समता, प्रबुद्ध भारत, मूकनायक यांमधील वृत्तपत्रीय लेखन, अग्रलेख हे सडेतोड व तत्कालीन वस्तुस्थितीवर प्रखर भाष्य करणारे आहेत.

डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम हे जगप्रसिद्ध असून 'राजगृह' या आपल्या मुंबईतील निवासस्थानी त्यांनी ग्रंथालयासाठी स्वतंत्र मजला राखीव ठेवून खास रचना केली होती. या वैयक्तिक ग्रंथसंग्रहात त्यांच्या अभ्यासविषयासह युद्धशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान यांसारख्या विविधांगी महत्त्वपूर्ण आणि दुर्मीळ ग्रंथांचा समावेश होता.

बाबासाहेबांनी आपल्या द्रष्टेपणातून देशासह समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेले मूलभूत चिंतन येत्या काळालाही दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणारे आहे. कारण सार्वकालिकता हा त्यांच्या सखोल चिंतनातून निर्माण झालेल्या ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे आजही देशपरदेशातून त्यांच्या ग्रंथांची; तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वावरील साहित्याची दरवर्षी विक्रमी विक्री होत असते.


**संदर्भ -**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, साहित्य संस्कृती मंडळ
- प्रज्ञा महामानवाची, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखनकार्य, खंड १,२, ग्रंथाली प्रकाशन.


लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १४ एप्रिल १८९१ | महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म. |
| १९०७ | डॉ. आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली. |
| १९०७ | रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह. |
| १९१० | इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण. |
| १९१२ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. |
| २ फेब्रुवारी १९१३ | वडील सुभेदार रामजी यांचे निधन. |
| १ जून १९१३ | सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली. |
| १९१३ | उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना. |
| १९१५ | ॲन्शंट इंडियन कॉमर्स या प्रबंधावर एम.ए.ची उपाधी बहाल. |
| जून १९१६ | नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया ए हिस्टारिक अँड अनालिटिकल स्टडी प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत. |
| १९१६ | कास्ट इन इंडिया, देअर मेकॅनिझम जेनिसिस अँड डेव्हलपमेंट या निबंधाचे वाचन. |
| १९१६ | पीएच.डी.ची पदवी बहाल. |
| ११ नोव्हेंबर १९१८ | सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती. |
| ३१ जानेवारी १९२० | राजर्षी शाहू महाराज यांच्या साहाय्याने मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित. |
| १ मार्च १९२० | माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद. |
| १ मे १९२० | अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर. |
| १९२२ | बॅरिस्टरची परीक्षा पास |
| १९२३ | डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल. |
| २० जुलै १९२४ | ‘बहिष्कृत हितकारिणी’ सभेची स्थापना, मुंबई |
| जुलै १९२६ | राजरत्न या मुलाचे निधन. |
| १९ मार्च १९२७ | कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड. |
| ३ एप्रिल १९२७ | बहिष्कृत भारत पाक्षिकाचे प्रकाशन. |
| १९२७ | मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड. |
| ४ सप्टेंबर १९२७ | समाज समता संघाची स्थापना. |
| १३ नोव्हेंबर १९२७ | अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह. |
| २५ डिसेंबर १९२७ | महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन. |
| जून १९२८ | मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक. |
| २९ जून १९२८ | समता पाक्षिकाचा आरंभ. |
| २३ ऑक्टोबर १९२८ | सायमन कमिशनपुढे साक्ष. |
| १९२९ | अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण. |
| ३ मार्च १९३० | काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ. |
| २ ऑक्टोबर १९३० | लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना. |
| नोव्हेंबर १९३० | गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली. |
| २४ नोव्हेंबर १९३० | जनता साप्ताहिकाचा आरंभ. |
| १४ ऑगस्ट १९३१ | मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट. |
| ८ ऑक्टोबर १९३१ | अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध. |
| २६ नोव्हेंबर १९३१ | गांधी-आंबेडकर-पंचम जार्ज यांची भेट. |
| २५ सप्टेंबर १९३२ | पुणे करारावर स्वाक्षरी. |
| २७ मे १९३५ | पत्नी रमाबाई यांचे निधन. |
| २ जून १९३५ | मुंबई, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती. |
| १३ ऑक्टोबर १९३५ | येवला, हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही. डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा. |
| मे १९३६ | ‘जातिप्रथेचे उन्मूलन’ भाषण प्रकाशित. |
| ३१ मे १९३६ | मुक्ती कोन पथे विख्यात भाषण, मुंबई |
| १५ ऑगस्ट १९३६ | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना. |
| १७ फेब्रुवारी १९३७ | मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ. आंबेडकर विजयी. |
| १७ सप्टेंबर १९३७ | कोकणातील खोती नष्ट करण्याकरिता मुंबई विधिमंडळात बिल मांडले. |
| ४ जानेवारी १९३८ | पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण. |
| १२-१३ फेब्रुवारी १९३८ | मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद. |
| मे १९३८ | मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून राजीनामा. |
| सप्टेंबर १९३८ | औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. |
| ७ नोव्हेंबर १९३८ | स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह. |
| जानेवारी १९३९ | महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद- काँग्रेसच्या शेतकरी-विरोधी-धोरणावर टीका. |

| | |
|---|---|
| २२ जून १९४० | मुंबई, सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट. |
| १९४० | थॉट्स ऑन पाकिस्तान ग्रंथाचे प्रकाशन. |
| एप्रिल १९४२ | अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना. |
| १९ जुलै १९४२ | भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर. |
| १९४२ | मजूर मंत्री म्हणून निवड. |
| १९ जाने.१९४३ | पुणे येथे विख्यात भाषण. रानडे, गांधी आणि जिन्ना. |
| जून १९४५ | काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रति काय केले? ग्रंथ प्रकाशित. |
| २० जून १९४६ | मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना |
| १९४६ | 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रकाशित. |
| १७ डिसेंबर १९४६ | भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण. |
| ऑगस्ट १९४७ | भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश. |
| २९ ऑगस्ट १९४७ | संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड. |
| १५ एप्रिल १९४८ | डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह. |
| ऑक्टोबर १९४८ | 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित. |
| सप्टेंबर १९४८ | सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्या सोबत भेट. |
| ४ नोव्हेंबर १९४८ | घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला. |
| २५ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण. |
| २६ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीने घटना स्वीकार केली. |
| मे १९५० | 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध. |
| २५ मे १९५० | कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| १९ जून १९५० | औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन. |
| मे १९५१ | लोकप्रतिनिधित्व विधेयक लोकसभेपुढे मांडले. |
| सप्टेंबर १९५१ | 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित. |
| २७ सप्टेंबर १९५१ | हिंदू कोडबिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा. |

| | |
|---|---|
| जानेवारी १९५२ | प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव. |
| मार्च १९५२ | राज्यसभेसाठी निवड. |
| ५ जून १९५२ | कोलंबिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी अर्पण. |
| १२ जानेवारी १९५३ | हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी अर्पण. |
| ३० जानेवारी १९५४ | महात्मा फुले बोलपट चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित. |
| मे १९५४ | भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव. |
| ३ ऑक्टोबर १९५४ | आकाशवाणीवर माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान भाषण. |
| २८ ऑक्टोबर १९५४ | माझे आयुष्य तीन गुरूंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले. |
| डिसेंबर १९५४ | रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| ४ मे १९५५ | भारतीय बौद्ध महासभा स्थापित. |
| ४ फेब्रुवारी १९५६ | मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली. |
| २४ मे १९५६ | नरेपार्क येथे ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन, अशी घोषणा केली. |
| १४ ऑक्टोबर १९५६ | नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. |
| १५ ऑक्टोबर १९५६ | बौद्ध धम्म का स्वीकारला या विषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपल्टीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण. |
| १६ ऑक्टोबर १९५६ | चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली. |
| २० नोव्हेंबर १९५६ | काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत बुद्ध आणि कार्लमार्क्स हे अभूतपूर्व भाषण दिले. |
| ६ डिसेंबर १९५६ | दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण. |
| ७ डिसेंबर १९५६ | मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार. |

लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.




ऑगस्ट १९४७, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद कायदे मंत्रिपदाची शपथ देत आहेत. सोबत प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू.



२६ नोव्हेंबर १९४९ रोजी विधि मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना राज्यघटना सादर केली. त्याप्रसंगी राष्ट्रपतींनी बाबासाहेबांचे अभिनंदन केले.




राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद तसेच त्यावेळच्या केंद्रीय मंत्र्यांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



नेहरू मंत्रिमंडळात विधि मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर. (उजवीकडून चौथ्या आसनावर)




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १५ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर महानगरपालिकेतर्फे मानपत्र प्रदान करून नागरी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत नानकचंद रत्तू, महापौर रा. पै. समर्थ व अन्य.



नागपूर महापालिकेच्या अभिप्राय नोंदवहीत आपल्या सत्काराप्रीत्यर्थ अभिप्राय नोंदवताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या बाजूला महापौर रा. पै. समर्थ व माईसाहेब आंबेडकर.



दिल्ली येथे १९५० मध्ये विरोधी पक्षाकडून हिंदू कोडबिलावर चर्चा ऐकताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



संसद भवनाच्या परिसरात के. एम. मुंशी, बलदेव सिंग आणि विधि मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



लंडन येथे दुसऱ्या गोलमेज परिषदेत सहभागी झालेले महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी. (सप्टेंबर १९३१)



१७ ऑक्टोबर १९४९ रोजी नवी दिल्ली येथे मौलाना हसरत मोहानी यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मिलिंद महाविद्यालयाच्या जागेची पाहणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब आंबेडकर व इतर.



मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत उजवीकडे प्रा. व्हि. जी. राव, डावीकडे रावबहादूर सी.के. बोले, मुंबई प्रांताचे राज्यपाल राजा महाराजा सिंग व माईसाहेब आंबेडकर.

(सर्व छायाचित्रे लोकराज्य ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ मधून पुनर्मुद्रित)

# महामानवाचे महापरिनिर्वाण





बाबासाहेबांच्या अंत्यदर्शनासाठी जमलेला जनसागर (७ डिसेंबर १९५६)



सौजन्य : टाईम्स ऑफ इंडिया

**समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या व नोकरीच्या संधी मिळणे सहजसुलभ नव्हते. ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चांगलीच लक्षात होती. वंचित समाजाला प्रगतीच्या वाटेवर आणायचे असल्यास त्यांना अशा संधी मिळणे आवश्यक असून, त्यासाठी शिक्षण शुल्कामध्ये सूट आणि आरक्षण मिळणे गरजेचे असल्याचे त्यांच्या लक्षात आले, त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचेच फळ म्हणून या घटकातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत आहे.**

# ....आणि शिष्यवृत्ती सुरू झाली

**कृष्णा इंगळे**

*शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे!*
*ते पिल्याने माणूस गुरगुरते!!*

हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले; परंतु हे वाघिणीचे दूध मिळवणे हे अस्पृश्यासाठी अशक्य होते हेही सर्वश्रुत आहे. अस्पृश्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार हिरावण्यात आला होता.

महात्मा फुले यांनी १८४८ ला अस्पृश्यासाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. त्यांनी सावित्रीबाईंना पहिली शिक्षिका केले. याच दरम्यान धारवड येथे सिद्धाप्पा कांबळे नावाचा तंबाखूचा व्यापारी होता. तो अडाणी असल्याने त्याला हिशोब लिहिण्यासाठी एका शिक्षिताची फार आवश्यकता होती. त्याच्या मित्राने सल्ला दिला की, तुझ्या मुलाला शाळेत टाक. तो आपल्या मुलाला घेऊन प्राथमिक शाळेत गेला, तेव्हा त्याला शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की, 'तू अस्पृश्य आहेस. तुमच्या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नाही. तेव्हा, तुझ्या मुलाला शाळेत का घालतोस?' तेव्हा सिद्धाप्पा म्हणाला, 'मी तंबाखूचा व्यापारी आहे. मला हिशोब लिहिण्यासाठी माझ्या मुलाला शिकवायचे आहे. तेव्हा माझी कळकळीची विनंती आहे की, त्याला पहिल्या वर्गात घ्या.' मात्र मुख्याध्यापकांनी सांगितले, 'त्याच्यामुळे आमची शाळा बाटेल व सर्व शाळा सोडून जातील.' त्यामुळे त्याला शाळेचा प्रवेश नाकारण्यात आला.



त्या प्रवेशाविरुद्ध सिद्धाप्पा हा जिल्हाधिकारी यांच्याकडे गेला. आपल्या मुलाला प्रवेश नाकारल्याच्या विरुद्ध कैफियत सादर केली. दुर्दैवाने जिल्हाधिकारी यांनी त्याची कैफियत फेटाळली. सिद्धाप्पा त्या विरुद्ध प्रीव्ही कौन्सिलपर्यंत भांडला; मात्र उपयोग झाला नाही.

१८९० मध्ये इंग्रज सरकारने अस्पृश्यांना सैन्यातील भरती बंद करून जे सैन्यात होते त्यांना सैन्यातून काढले.

रामजी आंबेडकर हे सातारा येथे नोकरीनिमित्त स्थायिक झाले होते. त्यांनी आपला मुलगा भिवाला प्रतापसिंह हायस्कूलमध्ये ७ नोव्हेंबर १९०० मध्ये पहिल्या वर्गात दाखल केले. भिवा त्या शाळेत चौथा वर्ग पास झाला. त्याला शुल्क भरावे लागत असे. जेव्हा शाळा सोडली, तेव्हा १९०४ मध्ये त्यांच्या वडिलांनी पूर्ण शुल्क भरले. शाळेच्या रजिस्टरमध्ये 'नो ड्यूज' म्हणून लिहिले आणि रामजी मालोजी आंबेडकर अशी सही केली.

याचा सरळ अर्थ आहे की, उच्चवर्णीयांना फुकट शिक्षण दिले जात होते. तर अस्पृश्यांना शुल्क भरावे लागत असे.

दुसरे महत्त्वाचे उदाहरण बुलडाणा जिल्ह्यातील चिखलीचे आहे. काळुजी जाधव हे चिखलीजवळ सातगाव भुसारी येथे राहत होते. ते मोळ्या विकण्यासाठी चिखली येथे येत. एक दिवस लहानगा मारुती यांच्याबरोबर चिखली येथे आला. तेथे श्री. रंभाजी (ज्युरी) व श्री. रायजी (वन अधिकारी) या जाधव बंधूंचे मागासवर्गीयांसाठी खासगी वसतिगृह होते. त्यांनी काळबाला विचारले की, का.. रे.. काळबा याला शाळेत टाकले नाही काय? तेव्हा तो उद्गारला की, मी गरीब अस्पृश्य कोठून पैसे आणू. मी मोळ्या विकून पोट भरतो. तेव्हा जाधव बंधूंनी त्याला चौथ्या वर्गापर्यंत शिकवले. पुढे मारुतीला बुलडाणा येथील ख्रिश्चन मिशनरी या शाळेत घातले. तेथेच तो मॅट्रिक पास झाला.

बुलडाणा मिशनरी शाळेने त्याला पुणे येथे पुढील शिक्षणाकरिता पाठवले व तो तेथे बी.ए. पास झाला. मारुती काळुजी जाधव



यांचा पुणे येथे अस्पृश्य मंडळीनी सत्कार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवेदन दिले. त्यात एक असे नमूद केले. अस्पृश्य मुलगा बी.ए. पास झाला आहे. त्यांना वरच्या श्रेणीची नोकरी मिळवून द्यावी. या निवेदनाच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकर हे गव्हर्नरला भेटले. १९२६ साली जाधव यांना उपजिल्हाधिकारी करण्यात आले. जाधव हे १९३४ साली आयसीएसमध्ये पदोन्नत झाले.

## बाबासाहेबांचा आग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज सरकारपुढे अस्पृश्यांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक उत्थानासाठी आग्रह धरला. या आग्रहाचा विचार करणे भाग पाडले. इंग्रज सरकारने आदिवासी आयुक्त इएमएस स्टार्ट या आयसीएस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. ती समिती स्टार्ट कमिटी १९२८ ला स्थापन झाली. त्याचे सदस्य म्हणून डॉ.बी.आर. आंबेडकर, डॉ. व्ही. बी. सोळंकी, ठक्कर बाप्पा व कॅ. देशपांडे होते. या समितीने १९२८-१९३२ पर्यंत अस्पृश्यांचे शिक्षण, नोकरी आणि सामाजिक बाबींवर सविस्तर काम केले. या वेळेस भयानक स्थिती त्यांच्या नजरेस आली. त्यावेळी श्री. घट कांबळे, हे अव्वल कारकून होते, तर श्री. कांबळे हे उप शिक्षण निरीक्षक, श्री. इंगळे फॉरेस्टर तर श्री. शेगोकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. याच दरम्यान पोलीसमध्ये फक्त ९६ पोलीस होते. त्या समितीने जेव्हा पोलीस प्रमुखास विचारले की, पोलीस उपनिरीक्षक किती? तेव्हा समितीला सांगितले की, पोलीस दलात जमादार नाहीत तर पोलीस उपनिरीक्षक कोठून येणार?

एवढेच नव्हे तर या पोलिसांना घरे नाहीत. जर यांना पोलीस मुख्यालयात घरे दिली नाही तर आहेत ते पोलीस नोकऱ्या सोडून जातील.

या समितीच्या निदर्शनास आले की, १००० अस्पृश्यांमध्ये फक्त एक मुलगा शिक्षण घेतो. ज्याची ऐपत शिक्षण घेण्याची



म्हणजे शुल्क भरण्याची आहे. तेच शिकू शकतात. स्टार्ट कमिटीचा अहवाल १९३२ साली सादर झाला. या समितीने खालील शिफारसी केल्यात.

- अस्पृश्याच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे. त्यांचे शुल्क सरकारने भरावे.
- शिक्षणाच्या अर्हतेनुसार नोकरी देण्यात यावी.
- अस्पृश्यांना समान वागणूक देण्यात यावी.
- त्यांच्यासाठी सरकारने नवीन खाते उघडून त्यांच्या देखरेखीखाली कार्य करण्यात यावे.

या समितीच्या शिफारशीनुसार हरिजन खाते उघडण्यात आले. त्यानंतर पुण्याला समाज कल्याण खाते स्थलांतरित करण्यात येऊन, १९४२-४३ ला अनुसूचित जातीच्या मॅट्रिक झालेल्या ११४ विद्यार्थांना महाविद्यालयीन शिष्यवृती देण्यात आली. आणि अनुसूचित जमातीच्या ९८ विद्यार्थ्यांना १९४८-४९ साली शिष्यवृत्ती देण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १९४२ साली कामगार मंत्री म्हणून इंग्रज सरकारने नेमले. त्या वेळी बंगालचे जोगेंद्रनाथ मंडल हे अस्पृश्यांचे पुढारी होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मित्र होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे आग्रह धरला की, पदवीधर झालेल्यांना इंग्रजांना आयसीएस करायला सांगा. तेव्हा इंग्रज सरकारने श्री. मल्लिक यांना आयसीएस केले. पुढे ते पश्चिम बंगालचे मुख्य सचिव झाले.

अशा रितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज सरकारला शिक्षण शुल्क/ शिष्यवृत्ती सुरू करावयास भाग पाडून वाघिणीचे दूध पिण्याची सुवर्णसंधी अस्पृश्यांना मिळवून दिली.

लोकराज्य डिसेंबर २०१७ मधून पुनर्मुद्रित.

**भारतीय घटनाकार, थोर समाजसुधारक आणि अभ्यासक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संबोधले जाते; परंतु यापलीकडे जाऊन असे म्हणता येईल की, मनुष्य हा केंद्रबिंदू धरून त्याला न्याय मिळण्यासाठी त्यांनी जो अभूतपूर्व संग्राम उभा केला; त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. या अन्यायाविरुद्ध झगडण्यासाठी त्यांनी आपली उभी हयात वेचली. या त्यांच्या कार्यामागे एक तात्त्विक अधिष्ठान होते. या थोर महापुरुषाच्या आठवणी त्यांच्या स्वभावाच्या अष्टपैलूंवर प्रकाश टाकतात.**

# तात्त्विक अधिष्ठान

**डॉ. कमल रा. गवई**

मला असे वाटते की, ते वर्ष १९३७ असावे. परळला एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर एका बाजूला श्री. बाळासाहेब खरे आणि दुसऱ्या बाजूला डॉ. ना. भा. खरे बसले होते. भाषणाला प्रारंभ करण्यापूर्वी बाबासाहेबांनी एकदा बाजूला मग दुसरीकडे वळून पाहिले आणि थोडे हसत म्हणाले, आज माझ्या एका बाजूला काँग्रेसची आवडती आणि दुसऱ्या बाजूला नाआवडती अशा दोघी जणी बसल्या होत्या. मी मात्र दोघींच्या मध्ये बसलो असल्यामुळे माझी स्थिती मोठी विचित्र झाली आहे. तेव्हा उपस्थित श्रोत्यांना बोलण्याचे मर्म लक्षात आल्याने हशा पिकला.

बहुधा १९४३ वर्षाची गोष्ट असावी. त्या वेळी बाबासाहेब व्हाईसरॉय एक्झिक्युटीव्ह कौन्सिलचे कामगारमंत्री होते. मंत्री झाल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, खाण कामगारांना फार कमी रोजंदारी देण्यात येते. यामध्ये वृद्धी होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. बाबासाहेबांनी एका दमात ही वाढ दुप्पट करण्याचे आदेश दिले. म्हणजे दिवसाची रोजंदारी सहा आण्यावरून बारा आणे करण्यात आली. खात्यातील अनुभवी अधिकाऱ्यांनी अशी घाईघाईने वृद्धी करू नये असा सल्ला दिला. परंतु बाबासाहेब थोडेच ऐकणार? गरिबीचे चटके स्वत:च अनुभवले असल्यामुळे बाबासाहेबांनी अधिकाऱ्याचा सल्ला मानला नाही. काही दिवसांनंतर बाबासाहेबांनी काढलेल्या आदेशामुळे कोणता परिणाम झाला याची सहज विचारपूस केली. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, आदेश निघून दोन-चार दिवस काम केल्यावर अनेक खाणीतील कामगार कामावरच आले नाहीत. ते दारू पिऊन घरी बेहोश पडले आहेत.

बाबासाहेबांना या वेळेस आपली चूक लक्षात आली. कामगारांना केवळ वेतन वाढवून चालणार नाही. तर त्यासोबत हा मेहनतीने मिळविलेला पैसा कुटुंबातील घरखर्चासाठी योग्यरीत्या कसा वापरला जाईल याचेही त्यांच्यावर सुरुवातीपासून संस्कार केले पाहिजेत. ही बाब बाबासाहेबांच्या लक्षात आली.



व्हॉईसरॉय काऊन्सिलमध्ये कामगार मंत्री म्हणून समाविष्ट असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनतेशी संवाद साधताना.

## सिद्धार्थ महाविद्यालय

सिद्धार्थ महाविद्यालय अगोदर मरीन लाईन्स वरील सुंदराबाई हॉल शेजारी असलेल्या मोकळ्या जागेतील बॅरेक्समध्ये भरत असे. हे बॅरेक्स दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात तात्पुरत्या स्वरूपात बांधले असल्यामुळे, तेथे नियमित राहणे शक्य नव्हते. यावेळेस फोर्ट इलाख्यात फ्लोरा फाऊंटनच्या जवळ जपानी बँकेच्या मालकीच्या दोन इमारती रिकाम्या होत्या. या इमारती महाविद्यालयासाठी सुयोग्य आहेत असे लक्षात येताच बाबासाहेबांनी दिल्ली मुक्कामी हालचाली सुरू केल्या; परंतु यश मात्र येईना. तेव्हा बाबासाहेबांनी लेडी माऊंटबॅटनला भेटून सविस्तर कथन केले. तिचे पत्र घेऊन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट घेतली. पंडितजींचे शिक्षणावर अतिशय प्रेम होते. शिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठी या दोन्ही इमारतींचा वापर होणार आहे हे

पाहून पंडित जवाहरलाल नेहरूंनी या दोन्ही इमारती पीपल्स एज्युकेशन सोसायटीला देण्याचे आनंदाने संमती दिली.

आजही आपण पाहतो फ्लोरा फाऊंटनवर मोठ्या दिमाखाने उभ्या असलेल्या आनंद व बुद्धभवन या इमारती आणि त्यामध्ये सुरू असलेले सिद्धार्थ महाविद्यालय म्हणजे बाबासाहेबांच्या प्रयत्नाचे फळ म्हणावे लागेल.

## गरिबांविषयी दया

सकाळचे महाविद्यालय सुरू करण्यासाठी नोकरीला असलेल्या लोकांसाठी मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली. त्याप्रमाणे अनेक महाविद्यालयांमध्ये व्यवस्था करण्यात आली. या व्यवस्थेमुळे उच्च शिक्षणापासून दूर झालेले असंख्य जण बाबासाहेब धावून आले आणि त्यांनी अनेक पातळीवर या प्रचाराला पायबंद घातला. त्यामुळेच सकाळची महाविद्यालये सुरू राहिली आणि हजारो गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले. ही गोष्ट केवळ बाबासाहेबांमुळे झाली हे फार थोड्यांना ठाऊक असेल.

## युवकांचे आदर्श पुरुष

युवकांचे खरे आदर्श पुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. कारण त्यांनी युवकांना अनेक महत्त्वाचे बहुमूल्य उपदेश केले आहेत. डॉ. बाबासाहेबांचा जन्म अतिशूद्र म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजात झाला होता. त्या अस्पृश्यतेचे चटके त्यांना बालपणापासून बसत होते. जातीतून होणारा विरोध व अवहेलना सहन संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. युवकांना आत्मविश्वासाने विद्यार्जन करण्याचा हितोपदेश दिला. मात्र त्यांना इतर लोकसेवेमुळे युवकवर्गाकडे पाहिजे तसे लक्ष देण्यास वेळ मिळू शकला नाही. त्याबद्दल नेहमी खंत वाटत होती. ती खंत त्यांनी दिलगिरीरूपाने आपल्या वक्तव्यातून व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विद्यार्थिदशेतील जीवन फार संघर्षमय होते. अस्पृश्याच्या मुलांकरिता प्रामुख्याने तो काळ विद्यार्थी जनास प्रतिकूल होता. अशाही स्थितीत त्यांनी घासलेटच्या दिव्यावर, प्रसंगी रस्त्यावरील दिव्याखाली, दिवसातील जास्तीत जास्त वेळ अभ्यास करून विद्यार्जन केले. तल्लख बुद्धिमत्तेमुळे प्रेमापोटी बाबासाहेबांना शिक्षकांनी त्यांचे

## स्त्रियांचे कैवारी

स्त्रियांचे उद्धारक भारतात पुष्कळ झाले. परंतु कैवारी मात्र एकच झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर! माता रमाईंना पाठवलेल्या एका पत्रात त्यांनी स्त्रियांच्या प्रगती व मुक्तीसाठी संघर्ष करणारा मी योद्धा आहे, असे म्हटले आहे. ते सर्वार्थाने सत्य आहे. दोन्ही हाती शस्त्र घेऊन, महिलांच्या हक्कासाठी संघर्ष करणारा असा योद्धा पुन्हा होणे नाही. कायद्याचे शस्त्र एका हाती, तर चळवळीचे शस्त्र दुसऱ्या हाती सर्व भारतीय महिलांनी मानले पाहिजे. आपल्या ६५ वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात लढणाऱ्या योद्ध्याने राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक अशी चारही शस्त्रे पादाक्रांत केली; परंतु या पराक्रमाला जोड होती करुणेची, महिला आणि शूद्रादी प्रजेवर पराकोटीच्या जातीय व्यवस्थेने केलेल्या अन्याय



अत्याचाराचा राग व त्या पिळवणुकीला बळी पडलेल्यांविषयी करुणा, यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. तथागत बुद्धाने केलेल्या क्रांतीनंतर ही दुसरी महत्त्वाची सामाजिक क्रांती होय. सर्व प्रकारच्या विषमतेपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा. स्वत:चे सर्व पांडित्य त्यांनी स्त्रियांना अधिकार मिळवण्यासाठी (हिंदू कोडबिल) पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्याची संहिता बदलली पाहिजे व स्त्री केंद्री बनवली पाहिजे, हा त्यामागील हेतू होता.

उच्चशिक्षण घेऊ शकले. इतकेच नाही तर बहुतेकजण विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेत पहिल्या वर्गात चमकले. सर्व काही सुरळीत चालले होते; परंतु काही दुढ्ढाचार्यांना हे पाहवेना. सकाळच्या महाविद्यालयामुळे शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. असा डांगोरा पिटून त्यांनी त्या महाविद्यालयाची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. या वेळेस करतच त्यांनी उच्च शिक्षण घेतले. हे शिक्षण आपल्या अधिकाराच्या जाणिवेसाठी, तद्वतच समाजजागृतीसाठी प्रभावी साधन असल्याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यांना मंत्र दिला तो हाच की, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'.

११ व्या अस्पृश्य विद्यार्थी युवक संमेलनाचे सन १९३८ मध्ये पुणे येथील अंबाडवेकर हे नाव बदलून आंबेडकर हे नामाभिधान दिले. पुढे तेच रूढ झाले. आठवड्यातून एक दिवस उपवास करून, त्यांनी वाचलेल्या पैशातून अनेक पुस्तके विकत घेऊन, आपल्या ज्ञानात भर टाकली.

लोकराज्य डिसेंबर २०१७ मधून पुनर्मुद्रित.

**वडिलांच्या मृत्यूने आयुष्याचा आधारच हरपलेला, पदरी पैसाही नसलेला आणि भविष्य निराशेच्या दाट धुक्यात हरवलेला एक तरुण-पण मनात ज्ञानाची ज्योत अखंड प्रज्वलित. त्या विलक्षण ध्यासाच्या जोरावर भीमराव आंबेडकरांनी प्रतिकूल परिस्थितीला छेद देत जगण्याची नवी वाट निर्माण केली. बडोदा नरेशांच्या शिष्यवृत्तीपासून कोलंबिया विद्यापीठातील कष्टमय शिक्षणप्रवासापर्यंत आणि पुढे लंडनच्या ग्रंथालयांत भुकेवर ताबा ठेवत केलेल्या तपश्चर्येपर्यंतचा हा प्रवास म्हणजे केवळ शिक्षणासाठीचा संघर्ष नव्हे; तर भारताला नवे बौद्धिक नेतृत्व देणाऱ्या महामानवाच्या घडण्याची ही अदम्य कथा आहे.**

# ज्ञानयोगी

**धनंजय कीर**

वडिलांच्या मृत्यूमुळे भीमराव आंबेडकरांचा होता नव्हता तो आधार तुटला. पैशाचे पाठबळ नाही, आप्तांचा आधार नाही अशी परिस्थिती. बडोद्यात नोकरीवर रुजू होण्यासारखी त्यांची मन:स्थिती नव्हती. त्या नोकरीतील अनुभवही काही चांगला नव्हता. आता त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्यांच्या ठायी ज्ञान संपादन करण्याची अनिवार इच्छा होती. जगात काही महत्तम कार्य करावे अशी त्यांची अबोल महत्त्वाकांक्षा होती, त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ होई. कुटुंबाचे पालनपोषण तर केले पाहिजे आणि शिक्षण पुढे चालवावे म्हटले तर पदरी कवडीदेखील नाही. वडिलांचा शेवट कर्जबाजारीपणात झालेला. अशाप्रकारे जीवनकलहाच्या तीव्र धुमाळीतून मार्ग कसा काढावा या विवंचनेत असताना ते बडोदा नरेशांना मुंबईत भेटले. त्या सुमारास बडोदे सरकारने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन चार विद्यार्थी अमेरिकेस पाठवण्याचा विचार केला होता.

महाराजांनी शिष्यवृत्तीसाठी भीमरावांना अर्ज करण्यास सांगितले. त्या चार विद्यार्थ्यांत त्यांनी भीमराव आंबेडकरांची निवड केली. त्याप्रमाणे भीमराव बडोद्याला गेले. तेथे उपशिक्षण मंत्र्यांसमोर ४ जून १९१३ रोजी त्यांनी करारपत्रावर सही केली. त्या करारान्वये भीमरावांनी संकल्पित विषयांचा अभ्यास अमेरिकेत करावा व नंतर दहा वर्षे बडोदे सरकारची नोकरी करावी असे ठरले.

## अभूतपूर्व घटना

१९१३सालच्या जुलै महिन्यातील तिसऱ्या आठवड्यात आंबेडकर न्यूयॉर्कला पोहोचले. प्रथमत: ते विश्वविद्यालयाच्या वसतिगृहात राहिले; परंतु तेथील अर्धेकच्चे अन्न आणि गोमांसाचे पदार्थ यांची त्यांना



लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या घरात वास्तव्य केले. त्या घराचे स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनाप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

शिसारी आल्यामुळे जेथे हिंदी विद्यार्थी राहत असत, त्या सर्व कुटुंबात राहावयास गेले. त्यानंतर ते नवल भथेना पारशी विद्यार्थ्याबरोबर लिव्हिंग्स्टन हॉल शयनमंदिरामध्ये राहत असत. न्यूयॉर्कमधील आंबेडकरांचे जीवन हा एक अपूर्व असा अनुभव. तेथील विद्यार्थ्यांसंगे आंबेडकर बरोबरीने बोलत, चालत, जेवत, फिरत; सर्वच ठिकाणी समतेचे वातावरण. ते जीवन हा त्यांना एक साक्षात्कारच वाटे. त्या नवीन जगाने त्यांच्या मनाचे क्षितिज वाढविले. त्यांचा अंतरात्मा एकप्रकारच्या नवीन तेजाने स्फुरू लागला. अमेरिकेहून वडिलांच्या एका मित्रास लिहिलेल्या पत्रात त्यांनी पददलितांच्या दैन्यावर एक रामबाण उपाय सुचवला. तो उपाय म्हणजे पददलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा होय. त्याच पत्रात आंबेडकर पुढे म्हणतात की, आईबाप मुलास जन्म देतात, कर्म देत नाहीत, असे म्हणणे ठीक नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात, ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल.

**'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक परिशीलन' (नॅशनल डिव्हिडन्ड ऑफ इंडिया - ए हिस्टॉरिक ॲण्ड ॲनॅलिटिकल स्टडी) नामक प्रबंधासंबंधी त्यांचा अभ्यास नि विचारविनिमय उपरोक्त प्रबंधाच्या सोबतच चालला होता. पुष्कळ दिवसांच्या परिश्रमानंतर तो प्रबंध त्यांनी पूर्ण केला. १९१६ जूनमध्ये तो कोलंबिया विश्वविद्यालयाने स्वीकारला. शैक्षणिक क्षेत्रातील हे त्यांचे यश एवढे घवघवीत होते की, त्या वेळी कोलंबिया विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेजवानी देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी लिंकनचा निर्धार नि जीवितोद्देश आणि बुकर टी.वॉशिंग्टनची उद्योगशीलता अंगी असलेल्या आंबेडकरांचे अभिनंदन करावे हा एक मोठाच योग म्हणायचा.**



कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत वॅलेस स्टिव्हन्स.

## ध्येयनिष्ठ आंबेडकर

सुखविलासात रमून जाण्याकडे सामान्यतः प्रत्येक विश्वविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांचा कल असतो; परंतु ध्येयनिष्ठ आंबेडकरांचे मन तशा जीवनास अनुकूल नव्हते. शिवाय पैसा तर जवळ नव्हताच. चित्रपट पाहावयास जाणे, नयनमनोहर सौंदर्यस्थळे पाहणे, क्रीडोद्यानात सहलणे, ह्यांसारखे विचार त्यांच्या मनालासुद्धा शिवले नाहीत. त्यांना सपाटून भूक लागे; परंतु ती एक कप कॉफी, दोन केक, एक बशी सागुती किंवा मासे यांवरच शमवावी लागे. त्या जेवणाचा खर्च एक डॉलर दहा सेंटस् येई. शिष्यवृत्तीच्या पैशातून पत्नीला घरखर्चासाठी काही पाठवावे लागे. यास्तव खर्च हात आखडून करावा लागे. ही परिस्थिती ज्या सहाध्यायांनी पाहिली, त्यांनी पुढे मोठ्या अभिमानाने सांगितले की, 'आयुष्यात मिळालेल्या संधीचा भरपूर लाभ घेण्यासाठी आंबेडकरांनी प्रत्येक क्षण सोन्याचा क्षण मानून अभ्यासासाठीच व्यतीत केला. धनाचा प्रत्येक कण योग्य ठिकाणी लावला.' आंबेडकरांचे ध्येय अमेरिकेतील मोठ्यातली मोठी विश्वविद्यालयीन पदवी मिळवणे हेच केवळ नव्हते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र आणि मानववंशशास्त्र इत्यादी विषयांत पारंगत होण्याची प्रबळ महत्त्वाकांक्षा त्यांनी बाळगली होती. आंबेडकरांच्या मनावर तेथील एका प्राध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाची चांगलीच पकड बसली होती. त्याचे नाव एडवीन आर.ए.सेलिग्मन. संशोधनाची कोणती पद्धत आपण अनुसरावी असे आंबेडकरांनी त्यांना एकदा विचारले. त्यावर त्या गुरुवर्यांनी आबंडेकरांना असा हितोपदेश केला की, 'तुम्ही आपले काम कळकळीने करीत जा, म्हणजे त्यातूनच तुमची स्वतःची पद्धती आपोआप निर्माण होईल.'

## अथक परिश्रम

अमेरिकेतील आंबेडकरांच्या ज्ञानयज्ञास अशाप्रकारे प्रारंभ झाला. दररोज अठरा-अठरा तास याप्रमाणे काही महिने अभ्यास चालला होता. सरतेशेवटी दोन वर्षांच्या अखंड तपश्चर्येनंतर त्यांच्या गळ्यात यशाने माळ घातली. 'प्राचीन भारतातील व्यापार'

(एन्शन्ट इंडियन कॉमर्स) या विषयावर त्यांनी १९१५ साली प्रबंध लिहून एम.ए. पदवी संपादन केली. १९१६ सालच्या मे महिन्यात डॉ.गोल्डनवेझर यांच्या वादकथा सभेत (सेमिनार) 'भारतातील जातिसंख्या, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास' (कास्ट्स इन इंडिया, देअर मेकॅनिझम, जेनिसिस ॲण्ड डेव्हलपमेंट) ह्या विषयावर त्यांनी एक निबंध वाचला.

पुढे आठ वर्षांनी लंडनमधील पी.एस. किंग ॲण्ड सन्स ह्या प्रकाशन संस्थेने हा प्रबंध विस्तृत स्वरूपात 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वैत्तिक उत्क्रांती' (दी इव्हॅल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शल फायनॅन्स इन ब्रिटिश इंडिया) या नावाने प्रसिद्ध केला. आंबेडकरांनी या ग्रंथाच्या छापील प्रती नियमाप्रमाणे कोलंबिया विश्वविद्यालयाला सादर करताच त्या विश्वविद्यालयाने रीतसर त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही अत्युच्च पदवी दिली. आंबेडकरांनी हाताळलेला प्रश्न हा जगातील विचारवंतांच्या चर्चेतील एक महत्त्वाचा विषय आहे असे सांगून सेलिग्मन प्रस्तावनेत म्हणतात, 'या विषयाचा इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास अन्य कोणी केल्याचे आपणांस माहीत नाही.' यावरून त्या ग्रंथाचे महत्त्व आणि मौलिकता लक्षात येईल. भारतातील प्रांतिक आणि केंद्रीय विधिमंडळातील सदस्यांच्या दृष्टीने हा ग्रंथ अतिशय उपयुक्त ठरला. भारतीय चलनविषयक मंडळासमोर आंबेडकरांना साक्ष देण्यास बोलावण्यास आले होते. त्यावेळी कमिशनच्या सदस्यांच्या हाती आपला ग्रंथ पाहून आंबेडकरांना मोठी धन्यता वाटली असेल.

## खडतर प्रवास

लंडनमध्ये कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्याची बडोदे नरेशाकडून त्यांनी संमती मिळविली होती. आंबेडकरांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी 'ग्रेज इन' मध्ये ऑक्टोबरात नाव दाखल केले, त्याचवेळी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिकल सायन्स' ह्या संस्थेतही अर्थशास्त्राच्या अभ्यासाकरिता त्यांना प्रवेश मिळाला. अर्थशास्त्र विषयातील त्यांची प्रगती पाहून तेथील प्राध्यापकांनी त्यांना एका परीक्षेस न बसण्याची सवलत दिली आणि डी.एस्सीच्या परीक्षेची सिद्धता करण्यास त्यांना अनुज्ञा दिली. त्यांनी अभ्यासाला आरंभ केला न केला तोच त्यांच्यावर दुर्दैवाची दृष्टी फिरली. मध्यंतरी बडोद्याच्या दिवाणपदी सर मनुभाई मेहता



एका समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेतलेले अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा.

यांची नेमणूक झाली. ते १० फेब्रुवारी १९२७ पर्यंत त्याच पदावर होते. 'शिष्यवृत्तीचा ठरलेला काळ संपला आहे, तेव्हा तुम्ही आता भारतात निघून या' असे आंबेडकरांना बडोद्याच्या या नवीन दिवाणांकडून कळवण्यात आले. ते आज्ञापत्र वाचून डॉ. आंबेडकरांना मोठा धक्काच बसला! तथापि, काही झाले तरी अभ्यासासाठी लंडनला परत यायचेच असा मनाशी निर्धार करून त्यांनी १९१७ च्या ऑक्टोबरपासून चार वर्षाच्या आत पुन्हा अभ्यास सुरू करण्याची अनुमती लंडन विश्वविद्यालयाकडून मिळवली.

## जग जिंकण्याचा निर्धार

याही स्थितीत त्यांनी आपल्या बुद्धिवैभवाने जग जिंकण्याचा निर्धार काही सोडला नव्हता. त्यांनी तत्त्वज्ञ बर्ट्रान्ड रसेल यांच्या 'सामाजिक पुनर्रचनेची तत्त्वे ' या ग्रंथावर 'जर्नल ऑफ दि इंडियन इकॉनॉमिक सोसायटी'च्या अंकात परीक्षणात्मक एक लेख लिहिला.

आंबेडकरांनी याच सुमारास आपला 'भारतातील जाती' हा निबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला. 'भारतातील लहान जमिनी आणि तद्विषयक उपाययोजना' (स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया ॲण्ड देअर रेमिडिज) या विषयावर त्यांनी एक अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला. जमिनीसंबंधीच्या प्रश्नावर त्या वेळी काही विचारवंतानी आपले विचार मांडले होते. 'बडोदा समिती'च्या निष्कर्षावर आणि त्या विषयावरील इतर अधिकारी पुरुषांच्या मतांवर त्यांनी कडक पण विधायक टीका केली. आंबेडकरांचे मन निराशेत असे हेलकावे खात असता, सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची एक जागा रिकामी झाली आहे, असे त्यांना कळले. मुंबईचे माजी राज्यपाल लॉर्ड सिडनेहॅम ह्याच्या खटपटीने त्यांना ती जागा मिळाली. त्यांची अर्थकारण (पोलिटिकल इकॉनॉमी) या विषयाच्या प्राध्यापकाच्या जागी नेमणूक झाली. लंडनला पुन्हा जाऊन आपला कायदा आणि अर्थशास्त्र याचा अपुरा राहिलेला अभ्यास पुरा करण्यासाठी लागणारा पैसा आपणास ह्या नोकरीमुळे लाभेल हा उद्देश मनाशी बाळगून त्यांनी ती प्राध्यापकाची हंगामी नेमणूक स्वीकारली.

आंबेडकर प्राध्यापक असताना मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या अनुंषगाने साउथ बरो समिती भारतात निरनिराळ्या जातीची मताधिकारविषयक चौकशी करीत फिरत होती. अस्पृश्य वर्गाच्या वतीने कर्मवीर शिंदे आणि आंबेडकर ह्यांची त्या समितीपुढे साक्ष झाली. 'स्वराज्य हा जसा ब्राह्मणांचा

जन्मसिद्ध हक्क आहे, तसाच तो महारांचाही आहे, ही गोष्ट कोणीही मान्य करील. म्हणून पुढारलेल्या वर्गांनी दलितांना शिक्षण देऊन त्यांच्या मानाची आणि सामाजिक दर्जाची उंची वाढवणे, हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. ही बाब बाबासाहेबांनी समितीपुढे निदर्शनास आणली. डॉ. आंबेडकरांना राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक साहाय्य देऊन एक पाक्षिक काढावयास लावले. ते 'मूकनायक' नावाचे पाक्षिक ३१ जानेवारी १९२० या दिवशी त्यांनी सुरू केले. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने तो काळ किती प्रतिकूल आणि कठोर होता ह्याची कल्पना केसरीसारख्या वर्तमानपत्राने 'मूकनायक'बद्दल दोन शब्द लिहिणे तर सोडाच, पण पैसे घेऊन त्याची जाहिरातसुद्धा छापण्याचे नाकारले, ह्यावरून येईल. त्या वेळी टिळक हयात होते.

## साधने नि सामर्थ्य

डॉ. आंबेडकर त्या वेळी प्राध्यापक होते. हिंदू समाजावर उघड चढाई करण्याची त्यांची सिद्धता नव्हती. साधने नि सामर्थ्यही मिळवावयाचे होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांशी आंबेडकरांचे संबंध आता दृढावू लागले होते. त्या संस्थानातील माणगाव येथे संस्थानची अस्पृश्यांची पहिली परिषद मार्चमध्ये भरली. शाहू महाराज तेथे आपल्या लवाजम्यासह उपस्थित होते. या परिषदेनंतर शाहू महाराज, त्यांचे सरदार मानकरी ह्यांच्यासमवेत आंबेडकर आणि इतर अस्पृश्य कार्यकर्ते यांचे भोजन झाले. प्राध्यापक आंबेडकरांना भरपूर मासिक वेतन होते. तरी ते कामगार विभागात इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट चाळीतील दोन खोल्यांतच राहत असत. अभ्यासपूर्तीसाठी लंडनला जाण्याची इच्छा तीव्र तर होत होती. मासिक वेतनातून प्रा. आंबेडकरांनी बरीच बचत केली. नवल भथेंना यांजकडून पाच हजार रुपये वचनचिठ्ठीवर कर्ज घेतले. थोडे आर्थिक साहाय्य कोल्हापूरच्या महाराजांकडून मिळवले. शिक्षण पूर्ण करण्यासाठी अशा रितीने पैसे उभारून त्यांनी लंडनला जाण्याची सिद्धता केली. त्यांनी सिडनेहॅम महाविद्यालयातील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. आणि ते जुलैच्या शेवटच्या आठवड्यात लंडनला पोहोचले.

## अभ्यासाची सिद्धता

लंडनला पोहोचल्यावर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स या संस्थेत आंबेडकरांनी अभ्यास सुरू केला. त्यांनी बॅरिस्टरीचा अभ्यासही ग्रेज इनमध्ये सुरू केला. अभ्यासाची सिद्धता क्रमिक पुस्तकावरूनच करून ते थांबले नाहीत त्यांनी आपली दृष्टी अध्यात्म नि ज्ञानशास्त्र यांच्या विचारांचे जे निधान, जगाच्या प्राचीन इतिहासाचे नि स्थित्यंतराचे जेथे अवशेष जतन करून ठेवले आहेत, जेथे मार्क्स, मॅझिनी, लेनिन, सावरकर यांनी संशोधनाचे कार्य केले, त्या लंडन म्युझियमकडे वळवली. पुरेसा पैसा नसल्यामुळे त्यांना सर्व विद्याभ्यास ठरावीक वेळेतच संपवावयाचा होता. आंबेडकर पोटास चिमटा काढून जेवढे ग्रंथ विकत घेणे शक्य असे तेवढे विकत घेत. प्रवासाकरिता खर्च न करिता वाचनालयातून दुर्मीळ ग्रंथ मिळविण्याकरिता ते मैलनमैल पायपीट करीत असत. त्यांची दिनचर्या म्हणजे खरोखरच मूर्तिमंत तपश्चर्या होती. ज्या बाईकडे ते राहत असत. ती. नतद्रष्ट होती. सकाळी न्याहारीच्या वेळी चहा, एक पावाचा तुकडा, त्या तुकड्याच्या टोकाला चिंचोक्याएवढा मुरांबा एवढेच ती देई. ते अपुरेसे अन्न खाऊन ते सकाळी म्युझियममध्ये वाचायला जात. वाचक म्हणून सर्वांआधी प्रवेश बहुतेक आंबेडकरांचा असायचा. दुपारचे जेवण घेण्यास त्यांच्यापाशी पैसेच नसायचे. बरोबर आणलेले सॅन्डविचचे दोन तुकडे ते तेथे हळूच खात. परंतु एक दिवस म्युझियममधील नोकराने त्यांना नियमाकडे बोट दाखवताच त्यांनी तेथे पावाचे तुकडे खाणे सोडून दिले. ते तसेच पोटाची भूक मारून पाच वाजेपर्यंत वाचीत बसत. पैशात बचत होई, वेळेची कमाई होई. टिपणवह्यांनी खिसे फुगलेले, चेहरा घामाने डबडबलेला, शरीर शिणलेले पण डोळे टवटवीत झालेले असे आंबेडकर वाचनालयातून सर्वात शेवटी बाहेर पडत. बिन्हाडी परत आल्यावर थोडा वेळ पाय मोकळे करीत. नंतर रात्रीचे अपुरे जेवण. पुन्हा वाचनाची दुसरी फेरी सुरू होई. रात्री दहाला चरचरून भूक लागे. भुकेचा डोंब उसळे. एका गुजराथी मित्राने त्यांना एक पापडाची करंडी दिली होती. त्यातील चार पापड एका पत्र्यावर भाजून ते मध्यरात्री खात. वर कपभर दूध. पुन्हा पहाटेपर्यंत अभ्यास चालू राही. त्यांना बाहेरील जगाची शुद्धबुद्ध नसे. अस्नाडेकर नावाचे मुंबईचे एक गृहस्थ त्याच खोलीत राहत. ते उत्तर रात्री जागे झाले की आंबेडकरांना कळकळीने म्हणत, अहो आंबेडकर, रात्र फार झाली. किती जागता दररोज. आता विश्रांती घ्या. झोपा. तेव्हा शांतपणे आंबेडकर म्हणत, अहो, अन्नाला पैसा व झोपायला वेळ मजपाशी नाही. शक्यतो लवकर माझा अभ्यासक्रम पुरा करावयाचा आहे. मग काय करणार? आयुष्य थोडे विद्या फार असे त्यांना वाटे. त्यामुळे लोखंडाचे चणे खाऊन आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते अहोरात्र झटत होते, रात्रीचा दिवस करीत होते. ही ज्ञानोपासना किती कडक. आंबेडकर काटकसरीने लंडनला राहत होते की, त्यांचा मासिक व्यय आठ पौंडांपलीकडे जात नसे. तरी प्रकृती नि मन दोन्ही उल्हासित! एक दोन वेळा प्रकृती बिघडली. परंतु त्याविषयी पत्नीजवळ ब्र काढला नाही. उपाहारगृहे, नाटकगृहे, चित्रपटगृहे ही त्यांचा गावीही नव्हती. आपल्या व्यक्तित्वाचा नि भवितव्याचा अभेद्य असा पाया पराक्रमी पुरुष कसा उभारतो, अडचणीमुळे त्याचे अंगचे गुण कसे प्रकट होतात, याचे आंबेडकरांचे जीवन हे एक मोठे स्पृहणीय उदाहरण आहे. अशी उदाहरणे इतिहासात थोडीच पाहावयास मिळतात. अविश्रांत परिश्रम करण्याचा उत्साह, अपरिमित हालअपेष्टा सहन करण्याची शक्ती, नि उच्च विचार यामुळेच जगातील थोर पुरुषांना यश लाभते.

उच्च शिक्षणाने डॉ. आंबेडकर एक बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली पुरुष झाले. तीन विश्वविद्यालयांत त्यांनी ज्ञानसंपादनासाठी तपश्चर्या केली. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, निर्बंधशास्त्र, इतिहास ह्यांचा संसार त्यांनी पाठीशी बांधला होता. पंडितांना, राजकारणी धुरंधरांना नि अर्थशास्त्रज्ञांना आव्हान देणाऱ्या पांडित्याचे पाशुपत अस्त्र अर्जुनाप्रमाणे घोर तपश्चर्येच्या जोरावर संपादन करून ते पुढील संग्रामास सिद्ध झाले.

लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित.

**'अस्पृश्यता निवारणाच्या एका मागोमाग एक अशा पाच परिषदेच्या जत्रा भरल्या जात होत्या, अशा १९२० च्या उगवत्या महिन्यात अस्पृश्यतेच्या तेजोभंगाला कारणीभूत ठरणाऱ्या तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळींना बाबासाहेबांचा हा बहिष्कृतांच्या बंडखोरीचा एल्गार मुंबईसारख्या शहरात प्रथमच ऐकायला मिळत होता. हाच एल्गार पुढे 'आरक्षण' नीतीत रूपांतरित झाला; पण 'आरक्षण' हे 'संधीसाठी' असतं, ते गुणवत्तेशी तडजोडी करत नसतं, हाही संदेश बाबासाहेबांनी याच पहिल्या वहिल्या भाषणात आपल्या अनुयायांना दिला.**

# बाबासाहेबांचे पहिले भाषण

**दत्ता भगत**

क्रीडा क्षेत्रातल्या एका जातीयवादी प्रकरणाची बातमी वृत्तपत्रात आली आणि मुंबई प्रांतात एकच खळबळ उडाली. बातमी होती उपकप्तानपदी नियुक्त झालेल्या व्यक्तीची. त्या व्यक्तीचे नाव होते पी. बाळू आणि खेळ होता क्रिकेट. हे घडले तेव्हा इ.स.चे साल होते १९११. भीमराव त्यावेळी महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. त्यांनाही क्रिकेट हा खेळ खूप आवडायचा. पी. बाळू म्हणजे एलफिस्टन हायस्कूलचा माजी विद्यार्थी. बाबासाहेब (भीमराव) हेही याच शाळेचे विद्यार्थी, पी. बाळू त्यांच्यापेक्षा खूप सीनियर होते. शाळेत शिकत असल्यापासून त्यांना पी. बाळू यांची गोलंदाजी खूप आवडत असे. पी. बाळूची इ. स.१९११ साली उपकप्तानपदी नियुक्ती झाल्यानंतर एवढी खळबळ का उडली? क्रिकेट जगतातला एक डावखुरा फलंदाज म्हणून १९०७ पासून पी. बाळूने या खेळातली आपली चमक दाखवली होती. मग त्याच्या नियुक्तीने खळबळ का उडावी? कारण इतकी वर्ष सर्व प्रेक्षक पी. बाळूचा खेळ पाहून प्रभावित झाले होते; पण तो जन्मजातीने चर्मकार आहे हे क्रिकेट शौकिनांना पहिल्यांदाच कळत होते. त्यामुळे त्यांच्या मनातला जन्मजातीचा द्वेष उफाळून वर आला होता.



खरे तर क्रिकेट हा ब्रिटिशांचा राष्ट्रीय खेळ. त्यामुळे त्याला खूप प्रतिष्ठा होती. नोकरी करण्यासाठी आणि अन्य व्यवसायासाठी जे ब्रिटिश भारतात आले त्यांनी क्रिकेटची मैदाने निर्माण केली, क्रिकेटचे संघ निर्माण केले आणि या देशातल्या मागास जनतेपासून त्यांनी स्वत:चे वेगळेपण राखले.

पुढे भारतातल्या संस्थानिकांचे राजपुत्र, नवाबांची मुले आधुनिक शिक्षणासाठी लंडनला जाऊ लागले. त्यामुळे त्यांनाही या खेळाची गोडी लागली. भारतात परत आल्यानंतर लष्करात ते अधिकारपद स्वीकारून इंग्लंडच्या अधिकाऱ्यांशी बरोबरीच्या नात्याने वागता वागता तेही ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबर खेळातले नैपुण्य दाखवू लागले. त्यावेळी पासून आजतागायत क्रिकेट हा खेळ अत्यंत उच्चभ्रू जाती आणि श्रीमंतांच्या खेळाडूंनी प्रभावित झालेला आहे. राष्ट्रीय खेळाची प्रतिष्ठा असल्यामुळे भारतातल्या उच्च मध्यमवर्गीयांना या खेळात रस घेणे यात एक प्रकारची सुप्त स्वरूपातली त्यांची प्रतिष्ठा सुखावत असे. मग अशा या खेळात पी. बाळू कुठून आला, आणि कसा? आणि अशा या पी. बाळूचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठा सत्कार समारंभ केव्हा आणि कसा घडवून आणला? याची अनेकांना माहिती नसणार. कारण या घटनेला आता १०० वर्षे उलटून गेली आहेत.

फलंदाजीचा सराव करताना गोरे खेळाडू मैदानात दूर-दूर पोहोचणाऱ्या चेंडूला आपल्याकडे फेकण्यासाठी एखाद्या चुणचुणीत मुलाची निवड करत. त्यासाठी त्या मुलाला तीन रुपये महिना देत असत. मि. ट्रान्स नावाच्या एका गोऱ्या अधिकाऱ्याने या पी. बाळूला त्या कामी नोकरीला लावले. हा मुलगा त्यावेळी शालेय शिक्षण घेत होता. त्या शाळेचे प्राचार्य होते सुभेदार रामजी आंबेडकर. पुढे पी. बाळूचा भाऊ पी. विठ्ठल हाही क्रिकेटर म्हणून चमकला. इंग्रजांनी आपल्या लष्करात स्थानिकांना भरती करताना त्यांचे प्राथमिक पातळीवर शिक्षण व्हावे म्हणून शाळा काढलेल्या असत. त्या शाळेला नॉर्मल स्कूल म्हणत. अशा शाळेवर एखाद्या कर्तबगार सुभेदाराची प्राचार्यपदी नियुक्ती केली जात असे. एवढेच

नाही, तर सैन्यात भरती होणाऱ्या शिपायांच्या मुलामुलींनाही या शाळेत शिक्षण मिळत असे. इंग्रजांच्या या धोरणामुळे लष्करातही अस्पृश्य खूप प्रगत झाले. पी. बाळू धारवाडच्या छावणीत नोकरीस असलेल्या शिपायाचे चिरंजीव होते. धारवाड हा जिल्हा त्यावेळी मुंबई प्रांतात होता. त्यांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातल्या पालवणी गावचे. आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी पुण्याच्या नॉर्मल स्कूलमध्ये बाळूला दाखल केले. त्याने शाळा शिकत शिकत, आपल्या गोऱ्या साहेबांना चेंडू पोहोचवता पोहोचवता गोलंदाजी आत्मसात केली. एका परीने हा महाभारतातल्या एकलव्याचा आधुनिक अवतार होता. पी. बाळू 'पुना यंग क्रिकेटर संघाचा' खेळाडू झाला. पुढे हा पी. बाळू शिक्षणासाठी मुंबईला आला. एलफिस्टन हायस्कूलमध्ये दाखल झाला आणि त्याची खेळातली चमक पाहून त्याला 'मुंबईच्या यंग मेन्स क्रिकेट क्लब'मध्ये खेळायची संधी मिळाली. युरोपीय क्लब आणि पुना यंग क्रिकेटर संघ यांचे सामने होताना कळत नकळत सामन्यांना देशभक्तीचा रंग चढत असे. त्याचाच अवशेष म्हणजे आजही पाकिस्तानविरुद्ध भारत असा सामना सुरू झाला की, भारतीयांच्या मनातले स्वदेश प्रेम उसळ्या मारून वर येते. तो काळ तर या दृष्टीने अधिकच संवेदनशील होता. कारण पुणे शहरातल्या दैनंदिन जीवनात लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी प्रेमाचे जबरदस्त वारे वाहत होते. हळूहळू भारतातील इंग्रजांचा एक वेगळा क्रिकेट संघ अस्तित्वात आला. आता या संघाला स्वतःचे नैपुण्य दाखवावे असे वाटू लागले.

या इर्षेतून लंडनचा 'युरोपीय क्लब' विरुद्ध भारताचा 'यंग मेन्स क्लब' असा एक सामना ८ फेब्रुवारी १९०६ रोजी रंगला. या सामन्यात पी. बाळूने आपल्या खेळाची चमक दाखवली. इ.स १९११ च्या सामन्यात भारतीय संघ जिंकला. आता या संघात भारतीय खेळाडू वाढले होते; पण दोन्ही संघांनी पी. बाळूची गोलंदाजी पाहून तोंडात बोटे घातली. यानंतर पी. बाळू सतत एक दशक क्रिकेट संघात आपले कर्तृत्व दाखवत होता; पण त्याला कधीही कप्तानपद मिळाले नव्हते.

या काळात पी. बाळू पॅव्हेलियनमध्ये बसून लंच घेऊ शकत नव्हता. त्याला डिस्पोजेबल कपातून चहा मिळत असे. चहा पॅव्हेलियनमध्ये बसून पिता येत नसे. लंचसाठी त्याची वेगळ्या टेबलवर व्यवस्था असे. इतकेच नाही तर मुंबईच्या इराण्यांच्या हॉटेलमध्ये अस्पृश्यांसाठी वेगळे कप ठेवले जात. इ.स १९१८ साली बाबासाहेब सिडनेहम कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले, तेव्हा पी. बाळूला अशी वागणूक दिली जाते हे त्यांना कळले. युरोपच्या



दौऱ्यावर इ.स १९०६ साली भारतीय संघ जेव्हा निघाला, तेव्हा संघातल्या काही खेळाडूंनी आणि व्यवस्थापकामधील तेलुगू ब्राह्मणांनी पी. बाळूच्या समावेशास विरोध केला. त्यामुळे क्रिकेटच्या अंतर वर्तुळात पी. बाळूच्या जन्मजातीवरून त्यांना तिरस्काराची वागणूक दिली जाऊ लागली. इ.स. १९११ साली कप्तान देवधरांच्याऐवजी कप्तानपद पै यांच्याकडे आले. पै यांनी पी. बाळूची उपकप्तानपदी नियुक्ती केली. खरे तर कप्तानपदाची पात्रता असूनही जन्माने अस्पृश्य असल्यामुळे पी. बाळूला कप्तानपद मिळाले नव्हते. त्यांना उपकप्तानपदावर समाधान मानावे लागले; पण उच्चभ्रू क्रिकेट शौकिनांना पी. बाळूचे उपकप्तानपदही सहन झाले नाही.

१९११चा सामना एवढा चुरशीचा झाला की, पी. बाळू हा जन्मजातीने चर्मकार आहे हे विसरून क्रिकेट विश्वात त्याच्या खेळाचा खूपच गौरव केला. क्रिकेटच्या जगात पी. बाळू यांचा दरारा वाढतच गेला. अशा या पी. बाळूचा जाहीर सत्कार केला पाहिजे, हे बाबासाहेबांनी सीताराम नामदेव शिवतरकरांना सांगितले. शिवतरकर हे जन्माने चर्मकार होते आणि मुंबईत बाबासाहेबांनी सार्वजनिक कामात गुंतून घेतल्यानंतरचे तेच त्यांचे पहिले जीवश्चकंठश्च मित्र होते. परळच्या म्युनिसिपाल्टी शाळेत ते शिक्षक होते. २५ जानेवारी १९२० रोजी मुंबई येथे करीमभाई इब्राहीम कामगार समाजाच्या लायब्ररीत पी. बाळूचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. रोहिदास समाजातील अनेक कार्यकर्ते या समारंभास उपस्थित होते. कोल्हापूरहून दत्तोबा पवार मुद्दाम या कार्यक्रमासाठी मुंबईत आले होते. दत्तोबांचे कोल्हापुरात 'लोकमान्य वाहनांचे' दुकान होते. स्वतः राजर्षी शाहू महाराज दत्तोबांना अत्यंत सन्मानाने वागवत असत. लायब्ररी हॉलमध्ये बसायला जागा मिळणार नाही म्हणून पी. बाळूचे अनेक चाहते हॉलबाहेर उभे राहून कार्यक्रम ऐकत होते. रोहिदास विद्यावर्धक समाजाच्या वतीने हा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमात

## बाबासाहेबांनी लिहिलेले मानपत्र

**त्या मानपत्रावर मजकूर खालीलप्रमाणे होता;**

श्री. बाळू बाबाजी पालवणकर आणि त्यांचे बंधू पी. विठ्ठल यास, या अधोगतीप्रत पोहोचलेल्या भारतखंडात जी काही थोडीशी नवरत्ने निर्माण झाली आहेत, त्यात आपली व आपल्या बंधूंची प्रामुख्याने गणना होते, याचा आपल्या जातिबांधवास मोठा अभिमान वाटतो. या भारतखंडाने आपल्या अन्याय्य जातिबंधनाने रोहिदास समाजाचे इतके नुकसान केले आहे, त्या भारतखंडाची लाज आज अनेक वर्षे होत असलेल्या क्रिकेटच्या चौरंगी सामन्यात हिंदूंचा झालेला अपूर्व विजय सर्वस्वी आपल्या व आपल्या बंधूच्या अप्रतिम खेळामुळेच झाला हे निर्विवाद आहे... आपणास हिंदू टीमच्या कॅप्टनचा दर्जाही 'गुणकर्म विभागशः' या न्यायाने मिळावयास पाहिजे होता; हे घडले नाही ही खरोखर खेदाची गोष्ट आहे; पण आश्चर्याची खास नव्हे! निदान आपली नीती सुधारणाऱ्या सुधारल्याखेरीज आपली उन्नती होणे नाही, असा उपदेश करणाऱ्या नीतिमान हिंदूंना लाजवणारी तरी ही गोष्ट आहे!

क्रिकेटसारख्या परकीय खेळात आपले मन पूर्णपणे घालून, अनुपम ग्राहकतेने त्यातील मर्म समजून घेऊन तो खेळ आपण आपल्या आपलासा केलात... क्रिकेटचे माहेरघर जो इंग्लंड देश तेथेही लोकांनी आपल्या क्रिकेट पुरत्वाची वाखाणणी केली आहे!

बाबासाहेबांचे अतिशय चेतना देणारे भाषण तर झाले, पण त्यांनी स्वतःच पी. बाळूचे मानपत्र लिहिले होते, तेही अत्यंत आदरपूर्वक पद्धतीने वाचून दाखवले. आज हे मानपत्र 'मूकनायक'च्या फेब्रुवारी १९२० च्या अंकात वाचकांना वाचायला मिळू शकते.

## बाबासाहेबांचा संदेश

मानपत्र वाचून झाल्यानंतर बाबासाहेबांनी पी.बाळूंना ते चांदीच्या करंड्यातून प्रदान केले; पण त्यानंतर त्यांनी जे भाषण केले ते अतिशय महत्त्वाचे होते, ते म्हणाले, 'आम्ही लायक नाही म्हणून आमची स्वराज्याची मागणी लांबवत नेणाऱ्या आमच्या सरकारने पी. बाळूचे उदाहरण लक्षात घ्यायला पाहिजे; आम्ही पुरते लायकच नाही तर पुरेसे सोशिकही आहोत! म्हणून तर या पी. बाळूंना कप्तानपद मिळावे याची आम्ही कधी मागणी केली नाही किंवा त्यांना डावलले; याची साधी तक्रारही केली नाही.'

'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे', असे इंग्रजांना गर्जून सांगणारे लोकमान्य टिळक अजून ह्यात होते; रोलेट ॲक्ट हा व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला घालणारा कायदा आहे, असे सांगून असहकाराच्या आंदोलनाद्वारे महात्मा गांधींचा स्वातंत्र्य



चळवळीत उदय होत होता आणि गेल्या वर्षभरात 'अस्पृश्यता निवारणा'च्या एका मागोमाग एक अशा पाच परिषदेच्या जत्रा भरल्या जात होत्या, अशा १९२० च्या उगवत्या महिन्यात अस्पृश्यतेच्या तेजोभंगाला कारणीभूत ठरणाऱ्या तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळींना बाबासाहेबांचा हा बहिष्कृतांच्या बंडखोरीचा एल्गार मुंबईसारख्या शहरात प्रथमच ऐकायला मिळत होता. हाच एल्गार पुढे 'आरक्षण' नीतीत रूपांतरित झाला. पण 'आरक्षण' हे 'संधीसाठी' असतं, ते गुणवत्तेशी तडजोडी करत नसतं, हाही संदेश बाबासाहेबांनी याच पहिल्या वहिल्या भाषणात आपल्या अनुयायांना दिला.

लोकराज्य नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मधून पुनर्मुद्रित.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अवघे जीवनचरित्र म्हणजे सामाजिक, आर्थिक व राजकीय समतेच्या; तसेच मानवी मूल्ये व मानवी हक्क यांच्या प्रस्थापनेसाठी केलेली अखंड क्रांतिकारक झुंज होय. डॉ. आंबेडकरांचे झंझावाती जीवनचरित्र व क्रांतिकारक चळवळ एक कुतूहलाचा विषय आहे. त्यांचे जीवन, कार्य आणि विचार यांची सबंध २०व्या शतकावर खोल मुद्रा उमटलेली आहे.**

# चरित्र आणि विचारधन

**विवेक सौताडेकर**

भारतीय समाजातील वंचित, उपेक्षित, निराश्रितांच्या माणूसपणाची जाणीव इतरांना करून देण्यासाठी आणि त्यांना माणूसपणाचे हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हा मोठा जीवन संघर्ष केला. मूलभूत अधिकारापासून वंचित असलेल्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी चळवळी केल्या. तसेच त्यांनी दिलेले विचारधन हे विश्वकल्याणासाठी अत्यंत उपयुक्त आहे. 'उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे', हे लोककवी वामन कर्डकांचे उद्गार महत्त्वाचे आहेत.

## सुरुवातीचे जीवन आणि बालपण

भीमराव आंबेडकरांचा जन्म सुभेदार रामजी सकपाळ आणि भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी 'महू' (मध्य प्रदेश) या ठिकाणच्या लष्करी छावणीत झाला. त्यांचे वडील शिकलेले व सुसंस्कृत होते. ते धार्मिकवृत्तीचे होते. कबीर पंथाचा त्यांच्या मनावर सखोल प्रभाव होता. सेवानिवृत्तीनंतर ते दापोलीला आले. तिथे त्यांनी आनंद व भीमराव या आपल्या मुलांना शाळेत घातले. त्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील 'आंबेवडे' या गावचे. त्यामुळेच रामजी सकपाळ हे रामजी 'आंबेवडेकर' झाले आणि त्यामुळेच भीमरावाचे नाव 'आंबेवडेकर' लावण्यात आले. या शाळेतून हे इंग्रजी चौथी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना संस्कृत हा विषय घ्यायचा होता; पण अस्पृश्याचा मुलगा म्हणून त्यांना तो घेता आला नाही. त्याऐवजी त्यांनी पर्शियन भाषेचा अभ्यास केला. शाळेत असताना त्यांना अस्पृश्य म्हणून खूप यातना सहन कराव्या लागल्या. शाळेत आंबेडकर नावाचे ब्राह्मण शिक्षक होते. त्यांनी भीमाचे 'आंबेवडेकर' हे नाव बदलून 'आंबेडकर' हे आपले नाव या मुलाला दिले. शाळेच्या दप्तरी त्यांची नोंद झाली. तेव्हापासून ते 'आंबेडकर' या नावाने ओळखले जाऊ लागले. रामजी मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईला आले. तेथील मराठा हायस्कूलमध्ये भीमरावांना दाखल केले. नंतर त्यांना एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल केले. १९०७ साली ते मॅट्रिक झाले. भीमरावांच्या रूपाने अस्पृश्य समाजातील पहिला विद्यार्थी मॅट्रिक पास झाला होता. त्यामुळे भीमरावांचा सत्कार करण्यात आला. लोकहितवादी सीताराम बोले हे अध्यक्षस्थानी होते. या वेळी विशेष उपस्थिती असणारे गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी स्वतः लिहिलेले 'गौतम बुद्धांचे चरित्र भेट म्हणून भीमरावांना दिले. या पुस्तकामुळे भीमरावांच्या जीवनाची दिशाच बदलून टाकली. याचा उल्लेख त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत अतिशय आदराने केला आहे. मॅट्रिक झाले त्याच वर्षी त्यांचा रमाबाईंशी विवाह झाला होता.

## उच्च शिक्षण

उच्च शिक्षणासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली. एल्फिन्स्टन कॉलेजमधून ते १९१२ साली बी.ए. झाले. पदवीधर झाले तेव्हा त्यांना मुलगाही झाला. त्याचे नाव यशवंत ठेवण्यात आले. बडोदा संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवरच त्यांना महाराजांनी शिष्यवृत्ती दिली होती. त्यामुळे पदवी शिक्षणानंतर ते बडोद्याला गेले. तिथे अस्पृश्य म्हणून त्यांना खूप त्रास देण्यात आला. दरम्यान भीमरावांच्या





वडिलांचे मुंबई येथे देहावसन झाले. या वेळी आंबेडकरांनी केळुसकर गुरुजींच्या मध्यस्थीने सयाजीराव गायकवाड महाराजांची त्यांच्या मुंबई पॅलेसमध्ये भेट घेतली व बडोद्यातल्या दाहक अनुभवाचे कथन केले. त्यामुळे महाराजांनी आंबेडकरांना तीन वर्षांसाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठवले.

## कोलंबिया विद्यापीठ

१९१३ मध्ये त्यांनी न्युयॉर्कला प्रयाण केले आणि कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व पब्लिक फायनान्स या विषयांचा अभ्यास केला. डॉ. सेलिग्मन व डॉ. जॉन ड्यूई यांच्यासारख्या दृष्ट्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अहोरात्र अभ्यास केला. 'भारतातील जातिसंस्था, तिची उत्पत्ती आणि रचना' हा शोधनिबंध त्यांनी लिहिला. अर्थविकासशास्त्रात त्यांनी कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए. आणि पीएच.डी. या पदव्या संपादन केल्या.

१९१६ साली ते इंग्लंडला गेले. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स'मध्ये प्रवेश मिळवला. अर्थशास्त्रात त्यांनी एम.एस्सी. व डी.एस्सी. या पदव्या प्राप्त केल्या. 'ग्रेज इन' येथून त्यांनी १९२२ साली बार. एट. लॉ ही पदवी मिळवली. ते बॅरिस्टर झाले.

लंडनमध्ये शिकण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना मदत केली. जर्मनीतील बॉन विद्यापीठातही त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला. तसेच पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक साहाय्यामुळे इंग्लंडला परत जाऊन त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

सयाजीराव गायकवाड महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांनी अर्थसाहाय्य केले नसते, तर त्यांना अमेरिका व इंग्लंड या देशांत जाऊन उच्च शिक्षण घेता आले नसते. राजर्षी शाहू महाराजांनी तर त्यांचे नेतृत्व पुढे आणण्यासाठी सर्वप्रकारे मदत केली. या दोन्हीही संस्थानिकांना बहुजन समाजाविषयी कळवळा वाटत होता. 'मूकनायक' हे पाक्षिक काढण्यासाठी शाहू महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. त्यांच्या शिक्षणाचे बरेचसे श्रेय गुरुवर्य केळुसकरांना दिले पाहिजे.

सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक व प्राचार्यपदही त्यांनी काही काळ भूषवले. वकील म्हणून त्यांनी काम केले. समाजपरिवर्तनाच्या कार्यासाठी 'बहिष्कृत हितकारिणी' सभेची स्थापना त्यांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. या कार्याला गती देण्यासाठी त्यांनी १९२६ मध्ये 'समता सैनिक दल' स्थापन केला.

## पत्रकारितेचा आधार

हिंदू धर्मातील अस्पृश्यतेची पाळेमुळे मनुस्मृती या धर्मग्रंथात होती. डॉ. आंबेडकरांनी १९२७ साली महाडच्या सत्याग्रहाचे केलेले आयोजन हा जातिभेदावरचा एक फार मोठा प्रहार होता. याच ठिकाणी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाची सुरुवात केली. मंदिर प्रवेशाचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. अमरावती, पुणे, नाशिक आदी ठिकाणी मंदिर प्रवेशासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९३५ पर्यंत हिंदू समाजाला बदलण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न सातत्याने चालूच होते. 'आम्ही प्रोटेस्टंट हिंदू' आहोत, असेही त्यांनी सांगितले; पण हे अरण्यरुदन ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यानंतर राष्ट्रीय प्रश्नांकडे वळले. आपले विचार मांडण्यासाठी त्यांनी पत्रकारितेचा आधार घेतला. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता' पाक्षिकाची सुरुवात त्यांनी केली. या सर्वच पाक्षिकातून त्यांनी लेख लिहिले. 'प्रबुद्ध भारत' हे वृत्तपत्र १९५६ साली त्यांनी सुरू केले.

## राजकीय कारकीर्द

१९३० पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीला सुरुवात झाली होती. अस्पृश्य वर्गाचे

## डॉ. आंबेडकरांचे विचारधन

### डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व सार्वत्रिक आणि मोफत असावे. तसेच प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य सरकारचीच आहे. शैक्षणिक खर्चाची तरतूद राज्य आणि केंद्र शासनाकडून प्रसंगी आवश्यक कर बसून अनिवार्य आहे. त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र दलित समाजाला दिला

### स्त्रियांविषयीचे विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याचा प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होत.

### ग्रामीण अर्थव्यवस्थेविषयीचे विचार

ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाजव्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधले होते. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे.

### शेतीविषयक विचार

शेती हा राष्ट्रीय उद्योग असेल. सामूहिक शेती करावी लागेल. सरकारी सारा दिल्यानंतर उरलेली उत्पन्न समप्रमाणात शासन वितरित करेल. शेतीसाठी लागणारी सर्व साधने राज्य सरकारने पुरवणे बंधनकारक राहील.

बाबासाहेब पुढे म्हणतात, लक्षात ठेवा शेतकरी बंधूंनो, आत्महत्या करणे हा पर्याय नव्हे. तुम्ही तुमच्या न्याय्य हक्कासाठी वाघासारखेच पेटून उठा.

### देशासंबंधीचे विचार

भारत हे मजबूत सबळ आणि प्रगत राष्ट्र झाले पाहिजे असे त्यांचे स्वप्न होते. स्वराज्य हे केवळ मूठभर लोकांचे आणि सत्ताधीशांचे नसावे, तर पीडित आणि उपेक्षितांसह सर्वांचे स्वातंत्र्य ही कल्पना त्यांच्या मनात होती. प्रत्येक भारतवासीयांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे.

### भारत-पाक फाळणीसंबंधीचे विचार

देशासमोरचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न फाळणीविषयी निर्णय घेण्याचा आहे. जोपर्यंत तो घेतला जात नाही, तोपर्यंत स्वातंत्र्य मिळूनही काही उपयोग नाही. हिंदू-मुस्लीम प्रश्नावर तोडगा न काढता स्वातंत्र्य मिळाल्यास अराजक माजेल, यादवी युद्ध होईल, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते.

प्रतिनिधी म्हणून देश त्यांना ओळखू लागला. मुंबई विधिमंडळाचे सदस्य म्हणून सरकारने त्यांची नियुक्ती केली. या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न विधिमंडळात मांडले. उपेक्षितांचे, स्त्रियांचे, गिरणी कामगारांचे व शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी ऐरणीवर आणले. महार वतनाच्या कायद्यात बदल करण्यासाठी दुरूस्ती विधेयक मांडले.

### खोती पद्धतीवर बंदी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप घडवून आला होता. हा संप इ.स. १९२८- या कालावधीत चरी (रायगड जिल्हा) या गावात झाला. हा संप ७ वर्ष सुरू होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करण्यासाठी संघर्ष केला.

१४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत त्यांनी कोकणातील खोतीदारीविरुद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले. खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले.

### गोलमेज परिषदांमधील सहभाग

सायमन कमिशनने अस्पृश्यांच्या राजकीय हितांना फारसे महत्त्व दिले नाही. भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांच्या हिताचे संरक्षण करणारे राजकीय हक्क असावेत, असे आंबेडकरांना वाटत होते. अस्पृश्यांच्या ठिकठिकाणी सभा व अधिवेशन भरवून आंबेडकरांनी अस्पृश्यांना त्यांच्या राजकीय हक्कांचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या स्वतःच्या अधिकारांविषयी जागृती करू लागले.

### स्वतंत्र मजूर पक्ष

१९४२ मध्ये व्हॉईसरॉय लिनलिथगो सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांना 'मजूर मंत्री' म्हणून घेण्यात आले. मजूर मंत्री म्हणून त्यांनी कायद्यात अनेक दुरुस्त्या सुचवल्या. कामगार कल्याणाच्या निरनिराळ्या योजना बनवल्या. विकासासाठी वीज आवश्यक असून जलसिंचनाबरोबर वीजनिर्मितीचा प्रश्नही त्यांना सोडवला होता. १९४६ साली देशात काँग्रेसचे काळजीवाहू सरकार आले. या सरकारमध्ये बाबासाहेबांना कायदामंत्री म्हणून स्थान मिळाले. याच काळात घटना समिती गठित करण्यात आली. बंगाल प्रांतातून ते घटना समितीवर निवडून आले. योगायोगाने ते मसुदा समितीचे अध्यक्ष बनले. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार मानले जातात.

### बौद्ध धर्मात धर्मांतर

आंबेडकर बुद्धिप्रमाण्यवादी होते, त्यांनी सन १९३५ च्या आपल्या धर्मांतराच्या घोषणेनंतर २१ वर्षे जगातील विविध प्रमुख धर्मांचा अभ्यास केला. त्यानंतर त्यांचा कल मानवतावादी व विज्ञानवादी धर्म म्हणून बौद्ध धम्माकडे वळला. त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ नागपूर हा धर्मांतराचे स्थळ व दिवस जाहीर केला.

लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.

**बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हानास्पद आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ उपेक्षितांना जागवण्याचेच कार्य केले नाही, तर उर्वरित घटकांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन त्यांनी वारंवार केले. वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजे, अशी धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती.**

# प्रेरक पत्रकारिता

**डॉ. गंगाधर पानतावणे**

मराठी वृत्तपत्रसृष्टीत कोणा एका महान पत्रकाराचे कर्तृत्व दुर्लक्षित राखले गेले असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर विचारवंताचे, पत्रकाराचे. मराठी वृत्तपत्रसृष्टी ही केवळ एका विशिष्ट वर्गाची आहे. अन्यांना यात प्रवेश नाही किंवा त्यांचे कर्तृत्व नगण्य आहे, अशी एक प्रकारची भावना होती; परंतु १९व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात दलित व अस्पृश्य पत्रकारांनी जो प्रपंच केला तो कितीही दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला तरी आपल्याला, मराठी वृत्तपत्रसृष्टीपासून दूर ठेवता येणार नाही. गंमत अशी आहे की, ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास घडला, ज्यांनी मुलाखती घेतल्या, त्यांनीही त्यांचा पत्रकार म्हणून गौरव तर केला नाहीच, पण त्यांच्या पत्रकारितेचीही फारशी दखल घेतली नाही. असे असले तरी सूर्यसत्य हे शपथेवर सांगावे लागत नाही हे खरे! याचा अर्थ हाच की, बाबासाहेबांचा पत्रकार म्हणून उल्लेख करायला आमच्या वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास कद्रू ठरला. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन उपलब्ध झाल्यानंतर आता कुठे त्याचा अभ्यास व्हायला लागला आहे. ज्या काळात बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांना जन्म दिला आणि त्यांनी त्यातून लेखन केले. त्या काळात भल्या भल्या पत्रपंडितांनी कातडीबचाऊ धोरण ठेवले. त्यामुळे बाबासाहेबांचे नुकसान झाले नाही. नुकसान झाले ते मराठी वृत्तपत्रसृष्टीचे.

बाबासाहेबांनी अपरिहार्यता म्हणूनच मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता (१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) या आपल्या पत्राचा प्रपंच केला. प्रबुद्ध भारत स्वतंत्रपणे जन्माला आले नाही, तर जनतेचेच ते रूपांतर होते. मराठी पत्रे 'प्रकाशा'चा वसा घेऊन पत्रसृष्टीत उभी राहिली; परंतु ब्राह्मणेतरांची काय किंवा डॉ. बाबासाहेबांची पत्रे काय, सामाजिक व सांस्कृतिक निकडीतून उदयाला आली होती.



समाजातील अपूर्ण विषमता, सांस्कृतिक अहंकार आणि स्वनामधन्य नेतृत्वातील विसंवाद, पोखरलेपण आणि अर्थहीनता विशद करून एक नवा समाज घडवण्याची प्रेरणा यामागे होती. ब्राह्मणद्वेषाचे काही प्रमाणात स्वरूप आले होते, ते तत्कालीन पत्रातून जाणवते; परंतु बाबासाहेबांची पत्रे किंवा दलित समाजातील किसन फागू बंदसोडे, दादासाहेब शिर्के किंवा शिवराम जानबा कांबळे यांसारख्या समाजचिंतकांच्या पत्रांचा मागोवा घेतला तर असे दिसून येईल की, ही पत्रे आत्मप्रबोधनासाठीच जन्माला आली होती आणि आत्मप्रबोधन व्हायचे असेल, तर प्रस्थापित व पुनरुज्जीवनवादी विचारांचा आणि व्यवस्थेचा उच्छेद करणे अपरिहार्य, ही रचनात्मक भूमिका या पत्रांनी घेतली होती, असे स्पष्ट दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर आपल्या मूकनायक या पत्राच्या पहिल्या अंकात म्हणतात, आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रासारखी अन्य भूमीच नाही. (मूकनायक : ३१ जानेवारी १९२०)

अस्पृश्य वर्गाला विचारप्रवृत्त करणे, त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे आणि संघर्षोन्मुख करणे ही मानवी जीवित्वाला नवा आयाम देणारी भूमिका बाबासाहेबांनी स्वीकारली होती आणि वृत्तपत्र त्यांना अत्यंत प्रभावी असे माध्यम वाटले होते. सुप्रसिद्ध पत्रकार व संपादक व्हेलरी पायर्स याने आपल्या Challenger या वृत्तपत्राच्या अनुषंगाने म्हटले होते की, Without the black press, the black man would not he is nor what is happening to his struggle for the freedom of citizenship (Is There A Black Press: Roland E. Wolseley, P.8) जगात समान दु:खी आणि समान प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रवक्त्यांची जीवनसृष्टी कशी समान असते, हे या साम्यावरून प्रतीत होईल. दडपल्या गेलेल्या, मनुष्यत्व हिरावून घेतलेल्या समाजाची युद्धे कधीच संपत नसतात. जुनी युद्धे संपली की पुन्हा नवी युद्धे, आकाशात काळे ढग यावेत, त्याप्रमाणे जन्म पावतात आणि म्हणून अशा साधनवंचित समाजाला

जागृत करण्यासाठी, ज्याला त्याचा इतिहास सांगावा लागतो आणि त्यापेक्षा त्याला त्याचे वास्तव जाणवून द्यायचे असते. सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्वखोरांनी त्यांची मलिन केलेली प्रतिमा, त्यांची ठोकरलेली विश्वासार्हता, नवे जग निर्मिण्याची कुस्करलेली दुर्दम्य आकांक्षा यासंबंधीची सत्ये प्रतिपादावयाची असतात. बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून हे अत्यंत आव्हानास्पद आणि अवघड असे कार्य केले आहे. त्यांच्या वृत्तपत्रांनी केवळ अस्पृश्यांना व दलितांना जागवण्याचेच कार्य केले नाही, तर स्पृश्यांनाही आपल्या समाजद्रोही भूमिका तपासून पाहण्याचे आवाहन वारंवार केले. या आवाहनाच्या मागे समग्र भारतीय समाजाच्या एकसंधतेची व एकात्मतेची, समतेची व स्वातंत्र्याची मागणी होती. वृत्तपत्रे ही नैतिक पायावर उभी असली पाहिजेत, अशी त्यांची धारणा होती; परंतु भारतीय वृत्तपत्रसृष्टीकडून ही अपेक्षा करणे सर्वस्वी गैर होते. अर्थात काही ध्येयवादी मराठी पत्रे होती आणि ती अपवादात्मक मानली पाहिजेत. बाबासाहेबांनी वृत्तपत्रांकडे केवळ धंदा म्हणून पाहणाऱ्या वृत्तीचा निर्देश केला आहे. त्यांनी पुणे येथील न्या. रानडे व्याख्यानमालेत वृत्तपत्रांसंबंधी विचार मांडताना म्हटले होती की, Journalism in India was once a profession. It has now become a trade. It has no more moral function than the manufacture of soap. नैतिकता हा वृत्तपत्राचा कणा असावा, असे मत मांडून ते थांबले नाहीत तर आपली सर्व पत्रे त्यांनी याच भूमिकेतून संपादली, चालवली.

'मूकनायक'च्या शीर्षभागी संपादक म्हणून बाबासाहेब आंबेडकरांचे नाव नसले आणि त्या काळातील उच्च विद्याविभूषित अशा पांडुरंग नंदराम भटकर या विदर्भ देशातील तरुणाचे नाव असले तरी मूकनायकाचे संगोपन, धोरण आणि अग्रलेख बाबासाहेबांचेच असत. मूकनायक आरंभले तेव्हा लोकमान्य टिळक होते आणि त्यांचा केसरी घराघरांत स्वराज्याचा विचार नेत होता. अन्य अनेक पत्रे स्वराज्याशी बांधीलकी मानून आपला प्रवास करत होती. ब्राह्मणेतरांचीही पत्रे वाटचाल करत होती. आणि त्यातच बाबासाहेब मूक समाजाचे नायकत्व स्वीकारून बहिष्कृत समाजाच्या उत्थानासाठी सिद्ध झाले होते. मूकनायकातील त्यांचे सर्व अग्रलेख समाजकारणाबरोबरच धर्म आणि राजकारणाशी निगडित होते. तत्कालीन स्वराज्याच्या प्रश्नांसंबंधी विचार मांडताना स्वराज्यापेक्षाही सुराज्याची आम्हाला गरज आहे, असे एका अग्रलेखात त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले होते.

मूकनायक अल्पजीवीच ठरले; परंतु ज्या पाक्षिकपत्रावर त्यांचे संपादक म्हणून नाव होते आणि ज्या पत्राचा त्यांनी सर्वार्थाने प्रपंच केला ते पत्र होते, 'बहिष्कृत भारत'. 'मूकनायक'चे व्यवस्थापन आणि संपादन या दोन्ही बाबतीत बाबासाहेबांना फारसे समाधान नव्हते. ज्यांच्यावर जबाबदारी टाकली जाते ती माणसे अर्थहीन वाद निर्माण करतात, हे त्यांच्या लक्षात आले. तशात त्यांना विलायतेलाही जावे लागले. या कारणामुळे मूकनायक अल्पजीवी ठरले; परंतु 'बहिष्कृत भारत'ला बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने जोपासले. संपादकीय म्हणजे स्वयंदीक्षा ही भूमिका त्यांनी स्वीकारली आणि 'बहिष्कृत भारत' चालवणे म्हणजे सामाजिक ऋण फेडण्यासारखेच आहे, असा विचार त्यांनी मांडला. 'बहिष्कृत भारत'च्या मागे अन्य वृत्तपत्रांसारखी कोणतीही सुसज्ज यंत्रणा नव्हती, संपादकीय विभाग नव्हता की, वितरण व्यवस्था हे सारे बाबासाहेबांनाच करावे लागे. आपल्या पत्राला आर्थिक बळ मिळावे, म्हणून त्यांनी 'बहिष्कृत भारत फंडा'साठी आवाहन केले; पण त्यांना फारसा प्रतिसाद लाभला नाही. आपले वृत्तपत्र हा व्यवसाय नव्हे, तर समाज प्रबोधनकार्यासाठी स्वीकारलेले ते एक प्रकारचे दिव्य आहे, अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच 'बहिष्कृत भारत'चे चोवीस-चोवीस रकाने स्वतःच लिहिणाऱ्या या पत्रकाराने 'बहिष्कृत भारता'चे ऋण हे लौकिक ऋण नव्हे काय? या शीर्षकाच्या ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकात नमूद केले.

बहिष्कृत भारताची संपादकी हा तर पत्राच्या संपादकीप्रमाणे पैसे कमवण्याचा धंदा नसून ही लोकजागृतीकरिता घेतलेली स्वयंदीक्षा आहे.

अस्पृश्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून तर दिलीच पाहिजे; परंतु त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला प्रखरपणे वाचा फोडण्याची गरज आहे आणि त्यासाठी नुसते थंडपणे न बसता आपल्या पत्रातून जनजागरण करणे हेच सर्वार्थाने हितावह आहे, हे डॉ. बाबासाहेबांनी विशद केले. त्या वेळच्या थोड्याफार शिकलेल्या शिक्षकवर्गाने निदान वृत्तपत्र विकत घेऊन वर्गणीदार होऊन कार्याचा वाटा उचलावा, अशी त्यांनी अपेक्षा केली होती; परंतु त्यांना नगण्य असा प्रतिसाद मिळाला. अशा प्रतिकूलतेतही त्यांनी आपले स्वीकृत कार्य तडीस नेण्याचा निश्चय केला आहे आणि अविचलपणे त्यांनी आपली लेखणी परजली. बहिष्कृत भारताच्या झंझावाताने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एक प्रकारचे तुफान आले आहे. असे जे त्यांनी म्हटले होते, ते सार्थ होते. त्यांचे लेखन बहिष्कृत भारतातील असो की जनतेतील, त्यांनी आपली लेखणी वाकवली नाही. ती ताठ होती, स्वाभिमानी होती, क्रांतिकारी होती आणि नवसमाजनिर्मितीच्या ध्येयाने झपाटली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कितीतरी विषयांचा मागोवा घेतला. हिंदू धर्म आणि हिंदू समाज यातील विषमतेवर त्यांनी ज्या परखडपणे लिहिले, तितक्याच परखडपणे त्यांनी हिंदुस्थानातील राजकीय प्रश्नात रस घेणाऱ्या अनेक राजकीय पक्षांच्या असंतुलित भूमिकांसंबंधी लिहिले. राष्ट्रवादाची आपली भूमिका जशी स्पष्टपणे मांडली, तशीच ब्रिटिश राजवटीच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या अनेक स्वार्थपर धोरणांचा निषेधही केला. प्राचीन इतिहासाचा त्यांनी वृथा अभिमान कधीच बाळगला नाही. उलट अशा मनोवृत्तींवर त्यांनी कडवटपणे शरसंधान केले.

भारतीय राष्ट्रवाद हा नेहमीच भारतीयांना अत्यंत प्रिय असा विषय राहिलेला आहे. प्राचीन राष्ट्रांचा विचार करताना भारत हे राष्ट्र अजूनही टिकून आहे, याचा मनस्वी आनंद लुटणाऱ्या काही मानसिकता अजूनही या देशात निश्चल आहेत. राष्ट्रवादी मंडळी आपल्या राष्ट्राचा गौरव करताना भारत हे राष्ट्र अमर आहे, असा फाजील आत्मविश्वास व्यक्त करीत असतात. प्रेमाच्या पोटी दोषांनाही गुण मानण्याची एक वृत्ती असते. तसेच काहीसे येथे घडले. आमचे भारत राष्ट्र हजारो वर्षे टिकून राहिले, याचे एक कारण या देशातील वर्णधर्म व्यवस्था असेही काही मंडळी आग्रहपूर्वक मांडत असतात. बाबासाहेबांनी

या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार केला आहे. त्यांचा बिनतोड असा एक मुद्दा त्यांनी मांडला आहे तो असा की, आपण हजारो वर्षे जगलो म्हणजे नेमके काय? ते स्पष्टपणे म्हणतात की, आपण शतकानुशतके जगलो हे जरी खरे असले, तरी आपण कसे जगलो हा प्रश्न मूलभूत आहे व महत्त्वाचा आहे. आपले राष्ट्र कसे जगले, हा प्रश्न फाजील राष्ट्रवाद्यांच्या मर्मावर आघात करणारा होता. या प्रश्नाच्या मागे परंपरेचे विश्लेषण आहे आणि एका वस्तुनिष्ठ आलेखाचे पृथक्करण आहे. बाबासाहेबांना हेच सांगायचे आहे की, आम्ही जगलो; पण स्वाभिमानाने जगलो नाही, गुलाम म्हणून जगलो. आपले जगणे लाचारीचे आणि कर्तृत्वशून्य असे होते. या विचारांमागे बाबासाहेबांचे राष्ट्रवादी मन उभे आहे. आमचे राष्ट्र स्वाभिमानाने जगावे, एकात्म राहावे असे आम्ही प्रयत्न केले नाहीत. हा विचार जातिव्यवस्था ही समग्र राष्ट्राचा विध्वंस करणारी अशी एक अनिर्बंध संस्था आहे. या संस्थेने गुलामीची परंपरा अस्तित्वात आणली. अस्पृश्य समाजावर या संस्थेने गुलामगिरी तर लादलीच, परंतु हजारो जातीही गुलामी मने घेऊन जिवंत राहिल्या. जात हा हिंदू समाजाचा मूळ आधार आहे. जातिभेदामुळे हिंदू समाजात प्रचंड गैरसमज आहेत. परस्परांविषयीचा अविश्वास आहे. आमच्या राष्ट्राला लागलेली कीड म्हणजे जातिवाद. आमच्या सर्व अनर्थांचे मूळ जातिवाद आहे, असे बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ५०-६० वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेले हे विचार आजही तितकेच जिवंत आहेत, ज्वलंत आहेत आणि एकात्म राष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्यांना अंतर्मुख करायला लावणारे आहेत. बाबासाहेब जातीविहीन समाजाचा उच्चार वारंवार करतात. याचे मर्मही त्यांच्या अंगी अगदी खिळून गेले आहे व सामाजिक प्रश्न आला की, त्यांचे पाय लटके पडतात. (महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी : ब.भा. ६ मे १९२७) असे स्पष्टपणे त्यांनी खडसावलेही. इंग्रज हे पक्षपाती आहेत, महाधूर्त आहेत, अशीही त्यांनी साधार संभावना केली आहे. इंग्रजी राजवटीत काही चांगल्या गोष्टी घडल्या असल्या तरी इंग्रजांनी येथे कायम असावे, असा विचार त्यांनी कुठेही मांडला नाही; उलट दलितांनी या राजवटीत आपल्या हितार्थ जेवढे काही प्राप्त करून घेता येईल, तेवढे करून घ्यावे असे सुचवले आहे. ही त्यांची देशनिष्ठा वादातीत आहे. ते कधीही इंग्रजधार्जिणे नव्हते.

स्वराज्याच्या प्रश्नाच्या संदर्भातही बाबासाहेबांची भूमिका स्वच्छ आहे. ते कधीही स्वराज्यविरोधी नव्हते. ते स्वातंत्र्याच्या


मूकनायक


बहिष्कृत भारत


प्रबुद्ध भारत

बाबासाहेबांनी अगदी प्रखरपणे आणि बिनतोड मांडला आहे.

आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, असे प्रयत्न आमच्या देशात झाले नाहीत. एक कमालीची उदासीनता सर्वत्र भरून होती. ही पराभूतता होती. हा पराभवाचा इतिहास न स्वीकारता आमचे राष्ट्र टिकून आहे, अशा आत्मगौरवी भाषेची कीवच बाबासाहेबांनी केली आहे. जे त्यांनी आम्हाला ठार मारले नाही. हे त्यांचे उपकार होत, हे बाबासाहेबांनी किती उपरोधिकपणे प्रतिपादले आहे! पण मग आम्ही जिवंत राहिलो ते आणखी एका कारणाने आणि ते कारण म्हणजे चिवटपणे आम्ही टिकवून ठेवलेली जातिव्यवस्था. जातिव्यवस्थेमुळे भारत नावाचे राष्ट्र टिकले आणि अजूनही टिकून आहे. याचा अर्थ इतकाच की, परंपरा म्हणून आम्ही टिकून राहिलो ते जातिव्यवस्थेमुळेच; पण हा काही पुरुषार्थ आहे, असे मानण्याचे काय कारण, असा बाबासाहेब सवाल करतात. तथाकथित राष्ट्रवाद्यांनी जाणून घेतले पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांच्या आणखी एका राष्ट्रवादी भूमिकेचा विचार करता येईल आणि ही भूमिका म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संदर्भात त्यांनी वेळोवेळी केलेले प्रतिपादन. ब्रिटिश शासनाने अनेक सुधारणा केल्या. त्यांच्यामुळे अस्पृश्यांना शिकता आले, त्यांना सैन्यात प्रवेश मिळाला, हे बाबासाहेबांनी मान्य केले असले, तरी ब्रिटिशांनीच हिंदुस्थानला गुलाम केले, हिंदुस्थानच्या दारिद्र्याला कारण ब्रिटिश धोरण आहे, हे त्यांनी परखडपणे मांडले आहे. हिंदुस्थानचा विचार करताना हिंदुस्थानला ब्रिटिशांनी देहाने गुलाम बनविले, असे उद्‌गार त्यांनी काढले. आंग्लाई ही एक जळू आहे व ती हिंदुस्थानातील संपत्तीचे शोषण करते (दुःखात सुख : ब.भा. १ जुलै १९२७) असा आरोप त्यांनी निर्भयपणे केला. इंग्रज सरकार धिमे आहे. मार्च ऑन करण्याऐवजी होता होईल तो मार्क टाईम करण्याचे अवलक्षण आंदोलनात कधी सहभागी झाले होते, असा पुरावा नाही. याचा अर्थ हा नव्हे की, त्यांनी स्वराज्याचा किंवा स्वातंत्र्यचळवळीचा विरोध केला आहे. बाबासाहेबांनी स्वराज्याचा संबंध केवळ राजकीय स्वातंत्र्याशी जोडला नाही. देशातील स्वातंत्र्य म्हणजे मालकी असा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता. स्वराज्य हा सर्वांचाच जन्मसिद्ध हक्क आहे व स्वराज्यविषयी सर्वांनाच तळमळ वाटायला हवी. स्वराज्य कल्पनेत त्यांना बहिष्कृतांचेही भवितव्य अभिप्रेत होते. ते म्हणतात, तत्त्व म्हणून स्वराज्याला आपला नकार नाही, परंतु व्यवहार म्हणून पाहिले तर स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वाची री आम्ही तरी ओढू शकत नाही. मग कोण ओढील तो ओढो बिचारा. (मूक नायक : १४ फेब्रुवारी १९२०)

एककेंद्री स्वराज्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. स्वराज्यास समाजव्यवस्था अनुकूल हवी, ती नसेल तर स्वराज्य कसे

मानायचे, असा त्यांनी सवाल केला. तेव्हा त्यांची ही भूमिका स्वराज्यविरोधी होती. असे म्हणता येणार नाही. राष्ट्रवादी बाबासाहेब आंबेडकरांनी स्वराज्याचा संबंध सामाजिक समतातत्त्वाशी जोडला होता, हे लक्षात घेतले पाहिजे.

बहिष्कृत वर्गात विचारप्रबोधन होण्याच्या निकडीने त्यांनी केलेले लेखन प्रचोदक, बुद्धिप्रामाण्यवादी, तर्कशुद्ध, परखड आणि अंतर्मुख करणारे आहे. हिंदू धर्म व समाजचिकित्सा करताना हिंदू समाजातील रूढी-परंपरांनी हिंदू समाजाचे आणि अस्पृश्यांचेही प्रचंड नुकसान झाल्याचे मत त्यांनी मांडले. अन्याय व जुलूम हे उभय समाजाची विवेकशक्ती नष्ट करतात, हे त्यांचे म्हणणे स्वीकारावेच लागेल आणि म्हणून अस्पृश्यांमध्ये आत्मजागृती व्हायची असेल तर आत्मभान व आत्मसन्मान यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी आंदोलनेही उभारली. स्पृश्यांना कर्तव्याची जाणीव आणि अस्पृशांना अधिकाराची जाणीव करून दिली. ज्यांनी नाकारले त्यांनाच नाकारण्याची संधी दिली. हिंदू समाजाशी संघर्ष करण्यासाठी त्यांनी प्रतिकारयोग आणि बहिष्कारयोग सांगितला. मानवी हक्क संपादिण्यासाठी आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी तसेच हिंदूंनी पुनर्विचार करावा, यासाठी या दोन्हीही योगांची गरज त्यांना वाटली. वस्तुतः बहिष्कार घडत असे तो अस्पृशांवरच आणि या बहिष्कारामुळे त्यांचे समग्र जीवन उद्ध्वस्त होत असे. अस्पृश्यांनी स्पृश्यांवर बहिष्कार टाकावा, तो त्यांची कामे न करणे म्हणजे मेलेली ढोरे न ओढणे, वेठबिगारी झुगारून देणे, गावकीची कामे न करणे या स्वरूपात. महार वतनाचा त्याग करून अस्पृश्यांनी गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर यावे असे जेव्हा बाबासाहेब म्हणत, तेव्हा त्यांना भारताचा नवा अध्याय लिहायचा होता, असेच म्हणावे लागेल. महार वतनामुळे अस्पृश्यांतील महत्त्वाकांक्षा मारली गेली आणि त्यामुळे हा समाज माणुसकीपासून दूर राहिला. अस्पृश्यांना महत्त्वाकांक्षी, कर्तबगार आणि माणूस बनवण्यासाठी त्यांनी महार वतने खालसा करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. बहिष्कृत भारतात त्यांनी महार वतनावरील लिहिलेले चार लेख बाबासाहेबांची संशोधनपरता, ठाम विचार, मानवी मूल्यांची आच आणि कर्तव्यकठोरता यांचे दर्शन घडवतात. धर्म, धर्मांतर आणि धर्मग्रंथ यासंबंधीचे डॉ. बाबासाहेबांचे चिंतन तर सांप्रदायिकतेला छेद देणारे आहे. धर्म आणि समाज या दोन्ही संस्थांचे विलगीकरण होणे त्यांना अपरिहार्य वाटते. धर्म एक असेल, परंतु समाजाची स्वतंत्रता अपरिहार्य असते. हिंदुस्थानात ही बाब वर्चस्वाच्या सोसातून निर्माण होऊ शकली नाही, हे एक विदारक सत्य आहे. हिंदू लोक ज्यास धर्म मानतात, तो धर्म नाही तर तो कायदा आहे. ते एक प्रकारचे आज्ञापत्र आहे, धर्म हा शब्दही हिंदुस्थानात धार्मिक विधी आणि धार्मिक कृती याच अर्थाने मानला जातो. बाबासाहेब म्हणतात की, या आज्ञा समाजात सर्व काळ लागू केल्या जातात. एवढेच नाही तर सर्व वर्गांना या समान अर्थी लागू केल्या जात नाहीत. यातूनच अन्यायाचे पोषण होते आणि शब्दप्रामाण्याला अवसर मिळतो. एकदा शब्दप्रामाण्य आले की, विषमता निर्माण होते आणि समाजात असमता भिनत जाते. नियमाधिष्ठित धर्म बाबासाहेबांना अजिबात मान्य नाही. हिंदू धर्माचे प्रचंड नुकसान झाले ते यामुळेच असे ते म्हणतात. तत्त्वनिष्ठ धर्म समाजाची खऱ्या अर्थाने धारणा करतो; पण तो या देशात निर्माण होऊ शकला नाही. उलट प्रचंड विसंवादालाच 'धर्म' ही संज्ञा देऊन धर्मज्ञांनी मानवी अप्रतिष्ठा केली आहे. श्रेणीबद्धता हा हिंदू धर्माचा व्यवच्छेदक विशेष. तो बदलण्याची गरज त्यांनी विशद केली आणि जातिविहीन समाजव्यवस्थेचा आग्रह धरला. धर्मज्ञांचे अधिकारही निश्चित करण्याची गरज त्यांना वाटली.

धर्मांतरासंबंधी त्यांनी केलेली मीमांसा लक्षणीय आहे. ते म्हणतात की, धर्मांतर हा मौजेचा विषय नव्हे. हा प्रश्न माणसाच्या जीविताच्या साफल्याचा प्रश्न आहे. जहाज एका बंदरातून दुसऱ्या बंदराला नेण्याकरिता नावाड्याला जेवढी पूर्वतयारी लागते तेवढीच पूर्वतयारी धर्मांतराकरिता करावी लागणार आहे. (मुक्ति कोन पथे : जनता २० जून १९३६) बाबासाहेबांनी धर्मांतरासंबंधी दोन दृष्टींनी विचार केला होता. १. सामाजिक आणि ऐहिक दृष्टीने २. धार्मिक आणि तात्त्विक दृष्टीने : धर्मांतर हे राष्ट्रांतर नव्हे की वस्त्रांतर, अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. प्रारंभी हिंदूधर्मत्यागाचा निश्चय झाल्यानंतर नेमका कोणता धर्म स्वीकारावा, या संबंधीची अनिश्चितता त्यांच्या अनेक लेखांत उमटली आहे; पण पुढे धर्मच स्वीकारायचा, तर तो या देशातील संस्कृतीला उपकारक ठरणारा हवा ही भूमिका त्यांनी व्यक्त केली. धर्मांतरासंबंधीची मते आणि मतांतरेही त्यांनी काही लेखात विशद केली, ती धर्माची मूलभूत चर्चा करूनच आणि धर्मांतराचा व बुद्ध धर्माच्या स्वीकाराचा विचार झाला, तोही मूलभूततेला शबलित होऊ न देता.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रातून विविध प्रश्नांवर आपले विचार मांडले आहेत. अगदी बालविवाहापासून ते सहशिक्षण, सहभोजन आणि पुढे शेती, शेतकरी, खोतीशाहीपर्यंत, सत्याग्रहाचाही सैद्धान्तिक विचार त्यांनी मांडला आहे; पण या सर्व लेखनाचे सूत्र प्राधान्याने सामाजिक-सांस्कृतिक आणि नवसमाजनिर्मिती हेच आहे. महात्मा गांधी, पंडित नेहरू यांपासून तो हिंदू महासभा-सत्यशोधक समाज या संदर्भातही त्यांनी परखड विचार मांडले आहेत. या सर्व लेखनांतून प्रचंड अभ्यास, परखडपणा, तर्कशुद्धता, चिकित्सकता, सत्यान्वेषकता, साधारता व बहुश्रुतता यांचे प्रत्यंतर येते. तेजस्वी विचारसरणी आणि धारदार भाषा, प्रतिपक्षावर-अज्ञान आणि दंभांवर कठोर प्रहार करणारे बाबासाहेब अनेकदा उपरोधगर्भ भाषेचाही वापर करतात. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, बाबासाहेबांनी आपले विचार, भाषेच्या फुलवऱ्यातून मांडलेले नाहीत. लोडाशी टेकून भाषा सजवण्याचा किंवा नखरेदार शब्दांचा सोस बाळगण्याची हौस त्यांना कदापिही नव्हती.

बाबासाहेबांचे सर्व वृत्तपत्रीय लेखन चिंतनशील आहे, मार्मिक आहे आणि कृतीस आवाहन करणारे आहे. बाबासाहेबांचे विचारप्रवर्तक लेखन, मराठी निबंधवाङ्मयाचा अलंकारच होय. स्वतःची अशी स्वतंत्र शैली निर्माण करणारे बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीला, लोकजागृतीच्या चळवळीचे भान दिले आहे. सामाजिक न्यायमूल्यांची जाणीव हीच त्यांच्या वृत्तपत्रसृष्टीची आधारशिला आहे.

लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या ग्रंथाची तुलना १७५५ मध्ये डॉ. सॅम्युअल जॉन्सन यांच्या इंग्रजी शब्दकोशाशी केली जाते. मात्र त्यात एक मोठा फरक आहे. डॉ. जॉन्सनने जेव्हा इंग्रजीचा शब्दकोश लिहिला, तेव्हा इंग्रजी ही जागतिक भाषा होऊ पाहत होती, तर बाबासाहेबांनी जेव्हा पाली शब्दकोश लिहिला, तेव्हा पाली जवळपास एक मृत भाषा होती. मृत भाषा प्रवाहात नसल्यामुळे त्यातील वेगवेगळे शब्द शोधून, त्यांचे अर्थ व वाक्यरचना करणे, हे महाकठीण काम बाबासाहेबांनी केले.**

# पाली भाषेला योगदान

**अतुल भोसेकर**

कार्लाईलच्या मते सत्य हा थोर पुरुषाचा पाया आहे. मात्र जर सत्यनिष्ठा आणि बुद्धी बरोबरच समाजाच्या गतिमानतेबद्दल तळमळ असेल तर हा पुरुष, महापुरुष होत असतो, कारण महापुरुष समाजाच्या शुद्धीकरणाचे आणि प्रशासकाचे काम करत असतो हे वाक्य आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रानडे, गांधी आणि जीना या भाषणांमधील. हीच कसोटी जर आपण बाबासाहेबांच्या कार्याला लावली तर लक्षात येईल की, बाबासाहेबांना महापुरुष म्हणून का संबोधले जाते!



## डॉ. बाबासाहेबांचे पाली भाषेबद्दलचे प्रेम

डॉ. बाबासाहेबांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक प्रवास हा थक्क करणारा आहे. असमानतेने जातिपातीत विभागलेल्या आणि कायम शोषित राहिलेल्या समाजाला स्वातंत्र्य, समतावादी व मानवमुक्ती आणि कल्याणाचा मार्ग असलेल्या बौद्ध धम्माची दीक्षा त्यांनी दिली. मात्र केवळ दीक्षा देऊन बाबासाहेब थांबले नाहीत, तर 'द बुद्ध अँड हिज धम्म' आणि पाली व्याकरण व शब्दकोशासारखे दोन अद्वितीय ग्रंथ लिहिले. ज्यामुळे बाबासाहेबांचे पाली भाषेबद्दलचे प्रेम, आदर आणि दूरदृष्टी दिसून येते. या संदर्भात बाबासाहेब लिहितात, बौद्ध धम्माच्या प्रसाराबद्दल लोकांमध्ये ज्या दिवसापासून आतुरता उत्पन्न झाली आहे, त्या दिवसापासून बौद्धधम्म म्हणजे काय, व त्याचे वाङ्मय काय आहे, व कोठे काय मिळते यासंबंधाने भारतीय जनतेमध्ये अतिशय मोठे कुतूहल दिसून येते.

सन १९४० मध्ये म्हणजे वयाच्या पन्नाशीनंतर बाबासाहेबांनी पाली व्याकरण व शब्दकोश लिहिला. त्यांचे हे काम अद्वितीय होते. हा ग्रंथ, महाराष्ट्र शासनाने १९९८ साली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र लेखन आणि भाषणे या मालिकेतील १६वा खंड म्हणून प्रकाशित केला आहे. जगातील विविध भाषांचे शब्दकोश गेल्या १०० वर्षांत अनेक भाषातज्ज्ञांनी लिहिले आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या या ग्रंथाची तुलना १७५५ मधे डॉ. सॅम्युअल जॉन्सन यांच्या इंग्रजी शब्दकोशाशी केली जाते. मात्र त्यात एक मोठा फरक आहे. डॉ. जॉन्सनने जेव्हा इंग्रजीचा शब्दकोश लिहिला, तेव्हा इंग्रजी ही जागतिक भाषा होऊ पाहत होती, तर बाबासाहेबांनी जेव्हा पाली शब्दकोश लिहिला, तेव्हा पाली जवळपास एक मृत भाषा होती. मृत भाषा प्रवाहात नसल्यामुळे त्यातील वेगवेगळे शब्द शोधून, त्यांचे अर्थ व वाक्यरचना करणे हे महाकठीण काम बाबासाहेबांनी केले. या ग्रंथाचे चार प्रमुख भाग असून पहिल्या भागात, पाली इंग्रजी शब्दकोश आहे, दुसऱ्या भागात पाली मराठी, इंग्रजी, गुजराथी आणि हिंदी या भाषांचा विस्तारित शब्दकोश आहे, तर तिसऱ्या भागात पाली व्याकरण आणि चौथ्या भागात बौद्ध पूजापाठ आहे. एवढेच नव्हे, तर पाली भाषेतील वाक्यरचना कशी करावी व दोन व्यक्तींमधील घरगुती अथवा व्यावसायिक संवाद पालीमध्ये कसा असावा हेही बाबासाहेबांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे हा शब्दकोश जगातल्या इतर सर्व शब्दकोशांपेक्षा वेगळा ठरतो.

## पाली भाषेचे व्याकरण

चाईल्डर्सने पाली इंग्रजीमध्ये शब्दकोश लिहिला होता; पण सर्वसामान्य भारतीयांसाठी त्याचा उपयोग नव्हता. पालीमध्ये कच्चायन व्याकरण सर्वात जुने आहे. पाली व्याकरणासह वाक्यरचनेवर, त्याच्या धातू आणि प्रत्ययावर अनेक प्राचीन ग्रंथ आहेत. त्यामुळे पाली भाषेचे व्याकरण लिहीत असताना बाबासाहेबांना प्रचंड अभ्यास करावा लागला. या सर्व

ग्रंथांचा अभ्यास करून, त्याची अतिशय सोप्या पद्धतीने मांडणी करून, सर्वसामान्यांनादेखील समजेल असे व्याकरण आणि त्याची वाक्यरचना असे विलक्षण काम बाबासाहेबांनी आपल्या ग्रंथात केले आहे. त्यामुळे पाली भाषा व तिचे व्याकरण शिकताना सोयीचे जाते. भविष्यात भारतात बौद्ध धम्माचे आकर्षण वाढेल आणि बुद्धविचार समजून घेण्यासाठी लोक पाली भाषा शिकतील हा दूरदृष्टीपणा ठेवून बाबासाहेबांनी पाली शब्दकोश व व्याकरण हा ग्रंथ लिहिला जो आजही पाली भाषा शिकण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

सम्राट अशोक यांनी महिन्द आणि संघमित्ता यांना श्रीलंकेत बुद्धविचारांचा प्रसार करण्यास पाठवले. भन्ते महिन्द त्यांच्याबरोबर पाली त्रिपिटक आणि त्याच्या अट्ठकथा घेऊन गेले. कालांतराने त्यांनी त्याचे 'सिंहली' भाषेत भाषांतर केले. काही कारणास्तव मूळ पाली अट्ठकथा नष्ट झाल्या. त्या वेळेस इ.स. ५व्या शतकात, अत्यंत विद्वान, बौद्ध आचार्य बुद्धघोष यांनी श्रीलंकेत जाऊन या सर्व सिंहली अट्ठकथांचे भाषांतर पाली भाषेत केले. चाईल्ड्र्सच्या म्हणण्यानुसार, आचार्य बुद्धघोष यांच्यासारख्या विद्वान, पालीभाषेच्या आचार्यांनी लिहिलेल्या अट्ठकथा पुन्हा पालीभाषेत लिहून संपूर्ण जगावर, विशेषतः बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांवर मोठे उपकार केले आहेत. कालांतराने बुद्धविचार जसे शेजारील देशांत पोहचले तसे पाली त्रिपिटक आणि अट्ठकथांच्या प्रती थायलंड, बर्मा व इतर देशांत पोहोचल्या. बुद्धघोषांनी लिहिलेले मूळ अट्ठकथा आणि अर्हत महिन्द यांच्या सिंहली भाषेतील पाली त्रिपिटक हे श्रीलंकेतील अनुराधापुर येथील विहारात ठेवल्या होत्या. १२व्या शतकात श्रीलंकेवर आक्रमण केलेल्या चोला राजांनी अनुराधापुर लुटले. ते बुद्धविचारांचे विरोधक असल्याने त्यांनी सर्व बौद्ध ग्रंथ नष्ट केले. यात अर्हत महिन्द यांचे सिंहली भाषेतील त्रिपिटक आणि बुद्धघोष यांच्या पाली अट्ठकथा नष्ट करण्यात आल्या. मात्र हे पाली ग्रंथ इतर देशांत सुरक्षित असल्याने नंतरच्या काळात त्यांचा प्रसार जगभर झाला.

### द बुद्ध अँड हिज धम्म

'द बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिताना बाबासाहेबांना संपूर्ण त्रिपिटक आणि इतर बौद्ध ग्रंथ वाचावे लागले. त्यावेळेस, त्यांनीच लिहिलेल्या पाली



व्याकरण व शब्दकोश या ग्रंथाचा उपयोग त्यांना झाला. 'द बुद्ध अँड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिताना बाबासाहेबांनी संपूर्ण पाली त्रिपिटकाचा अभ्यास केला होता, याची साक्ष या ग्रंथाच्या प्रत्येक पानावर दिसते. त्या काळी अस्पृश्य म्हणून हिणवले गेलेल्या समाजाला बौद्ध धम्माची दीक्षा द्यायची हे बाबासाहेबांनी निश्चित केलेच होते, मात्र नवदीक्षित झालेल्या समाजाला तसेच ज्यांना बुद्धविचार समजून घ्यायचेत त्यांच्यासाठी सोप्या भाषेतील ग्रंथ त्यांना लिहायचा होता.

१९५० ते ५६ या कालावधीत बाबासाहेबांनी प्रकृती साथ देत नसतानाही अतिशय सखोल आणि तार्किकरीत्या हा ग्रंथ निर्माण केला. पाली त्रिपिटकामधे काही विरोधभासी वाक्यांवर बाबासाहेबांनी प्रश्न उपस्थित केले व भ.बुद्धांच्याच पालीवचनांचा आधार घेत स्पष्टीकरणही दिले. या ग्रंथात बाबासाहेबांनी तळटीप न दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर काही जणांनी या ग्रंथावर शंका घेतली. मात्र १९६१ मध्ये डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांनी बाबासाहेबांच्या ग्रंथातील कोणते वाक्य त्रिपिटकमधील कोणत्या सुत्तातील आहेत हे शोधून काढले व बाबासाहेबांनी लिहिलेला 'द बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथाला पाली त्रिपिटकच आधार असल्याचे सिद्ध केले. पाली त्रिपिटक हे तुलनेने प्रचंड आहे. बायबलपेक्षा ११ पटीने मोठे आहे. पिढी दर पिढी मौखिक रूपाने बुद्ध वचनांचा प्रसार होत होता. त्यामुळे नकळतपणे त्यात काही अघटित घटनांचा उल्लेख आला आहे. बाबासाहेबांनी अशा प्रत्येक घटनेचे खंडन केले आहे व सर्वसामान्यांना बोध होईल, असा बुद्धांचा इतिहास आणि त्यांचा धम्म लिहिला.

महापंडित राहुल सांकृत्यायन यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात, बौद्ध धम्म पुनर्जीवित करताना असा खांब रोवला आहे की, कोणी तो हलवू शकणार नाही'.

बौद्ध धम्म आणि बौद्ध समाजासाठी जे योगदान बाबासाहेबांनी नागपूर येथे दीक्षा देऊन केले त्यापेक्षा कैकपटीचे योगदान बाबासाहेबांनी हे दोन ग्रंथ लिहून दिले आहे. डॉ. बाबासाहेबांना खरी आदरांजली अर्पण करायची असेल, तर पाली भाषा आणि बौद्ध संस्कृतीचा अभ्यास करून, आपण ती आदरांजली द्यायला हवी तरच या महापुरुषाच्या कष्टाचे चीज होईल!

लोकराज्य डिसेंबर २०२२ मधून पुनर्मुद्रित.

शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनापासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. जर मी कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल तर मी त्यांचे पालन का करावे? असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात साऱ्या वर्गांना प्रतिनिधित्व असावे, जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल, असा त्यांचा आग्रह होता.

# कायदा व सामाजिक न्याय

**डॉ. मुंशीलाल गौतम**

सॉक्रेटीसने म्हटल्याप्रमाणे 'न्याय म्हणजे शक्तिशाली लोकांचे हित' जे भारतीय समाजात तंतोतंत लागू होते. कारण या समाजात कायद्यानुसार जरी सामाजिक समानता, समान सुरक्षा आणि कायद्यासमोर समानता या गोष्टी अस्तित्वात असल्या, तरी 'नाही रे' आणि गरीब वर्गासाठी न्याय हा शब्दच त्यांच्या आवाक्याबाहेर आहे.

रोसलो पाऊंडने म्हटले आहे की, 'कायद्याचे अंतिम ध्येय हे सामाजिक गरजांची पूर्तता करणे होय.' 'ज्या कायद्याचे पालन जनतेने करावे असे वाटते, त्याची उपयुक्तता सिद्ध झाली पाहिजे. त्याचा फायदा हा चांगल्या दृष्टिकोनातून झाला पाहिजे', असे प्रख्यात कायदेविषयक सुधारक जेर्मी वेधनने म्हटले आहे. एच. लास्कीच्या म्हणण्यामागे लोक केवळ पाळायचा म्हणून कायद्याचे पालन करत नाहीत, तर त्यामुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षिततेच्या भावनेतून करतात.

राजकीय चिंतकांनी सांगितलेच आहे की, लोक त्याच शासनाच्या आदेशांचे पालन करतात की, जे कायद्याद्वारे लोकांच्या गरजा पूर्ण करतात आणि स्वतःचे अस्तित्वही जपतात.

ॲरिस्टॉटल म्हणतो की, 'शासन हे चांगले जीवन घडवते. चांगले जीवन म्हणजे लोकांचा सामाजिक, नैतिक विकास जो की शासनाद्वारे आणि कायद्याचे पालन करून होतो.'

हॉब्स मात्र सरंजामशाहीचा पुरस्कार करतो. त्याच्या मते लोक एखाद्या व्यक्ती किंवा व्यक्तींच्या संघटनेला / समूहाला शरण जातात. कारण त्यातून त्यांना वैयक्तिक व सर्वंकष सुरक्षितता हवी असते. हॉब्स म्हणतो की, अशी कोणतीही मानवी संस्कृती असू शकत नाही की, ज्यात जन्म व मृत्यूबाबत सुरक्षितता प्रदान केलेली नसेल.

लॉक अशा नागरी समाजाची कल्पना करतो की, जो लोकांच्या संमतीने बनवला गेला आहे. मात्र या अटीवर की, जर शासन त्यांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करण्यास अपयशी ठरले तर तेसुद्धा शासनाचे आदेश पाळायला बांधील राहणार नाहीत.

'शासन हे सर्वसामान्यांच्या इच्छांचे मूर्तस्वरूप आहे' असे रोशे याचे मत आहे.



माणूस हा स्वातंत्र्याचा उपभोग शासनांच्या कायद्यांचे पालन करून अधिक चांगल्या प्रकारे घेऊ शकतो. याप्रकारे जनता आपल्या इच्छांच्या मूर्तरूपाचा अनुभव कायद्याद्वारे घेऊ शकते आणि स्वतःच्याच इच्छांचे पालन करून उत्तम जीवन जगू शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शासनाची व्याख्या केली नाही, तरीही त्यांची शासनाबाबतची मते इतर ठिकाणी आढळतात. उदाहरणार्थ, संविधानातील कलम-३४ चा पुरस्कार करताना भाषणात त्यांनी म्हटले होते की, 'मूलभूत अधिकारांचा तेव्हा काहीही कायदा नसतो, जेव्हा राज्यच / शासनच गर्तेत सापडले असते. राज्याची सुरक्षितता ही कधीही जनतेच्या सुरक्षिततेच्यावर असते.' त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर यांचा लोकशाही प्रणालीतील विश्वासही दिसून येतो. 'माझ्या मते स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित समान आदर्श आहे. आदर्श समाजात एका भागात होणारा बदल दुसऱ्या भागात माहिती होण्याकरिता संसाधने उपलब्ध असतात. यामुळे दोन घटकांतील संवाद वाढण्यास मदत होऊन बंधुतेचा विकास होतो आणि यालाच लोकशाही म्हणतात. लोकशाही म्हणजे केवळ सरकारचे स्वरूप नव्हे, तर ती म्हणजे समूहजीवन, सुसंवादाची अनुभूती होय. लोकशाही म्हणजे इतरांबद्दल आदर व सन्मान राखणे होय.'

शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनांपासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. जर मी कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल तर मी त्यांचे पालन का करावे? असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात साऱ्या वर्गांना प्रतिनिधित्व असावे जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल, असा त्यांचा आग्रह होता.

न्यायाचे दोन प्रकार आहेत. कायद्याद्वारे मिळणारा आणि सामाजिक. कायदेशीर न्याय म्हणजे राष्ट्रीयत्व आणि सद्सद्विवेक यावर आधारित कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होय. तर सामाजिक न्याय आधारित असतो, सामाजिक गरजा ध्यानात ठेवून बनवलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीवर. समाजातील साऱ्या वर्गाच्या / घटकांच्या सामाजिक गरजा समान नसतात. जसे की, दिव्यांगाच्या अथवा सामाजिक दमनाचे शतकानुशतके बळी ठरलेल्यांच्या सामाजिक गरजा वेगवेगळ्या असतील. त्यामुळे त्यांना वेगवेगळे कायदे लागतील किंवा कायद्याच्या चौकटीतच निदान वेगळी वागणूक देणे गरजेचे राहील. त्यांना इतर प्रगत वर्गाच्या रांगेत नेऊन बसवायला, वरीलप्रमाणे परिणामकारक वागणूक देण्यासाठी एक सकारात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. त्यालाच 'संरक्षक भेद' म्हणतात.

२०व्या शतकातील प्रख्यात विधिज्ञ रोसलो पाऊंडने या संदर्भात कायद्याचे अंतिम उद्दिष्ट काय असावे हे स्पष्ट केले आहे. त्याच्या मते कायदा हा समाजात विविध घटनाक्रमातही शांतता अबाधित राखण्याकरिता अस्तित्वात असतो. त्यालाच कायद्याची प्राथमिक संकल्पना म्हणतात. सर्वसामान्य सुरक्षिततेच्या सामाजिक गरजेची पूर्तता कायदेशीररीत्या करून समाधान मिळवून देणे हे त्यातून अभिप्रेत आहे.

ग्रीक विचारवंतांनी सर्वसामान्य सुरक्षिततेचा व्यापक दृष्टिकोनातून विचार केला आणि सामाजिक परिस्थितीत आरक्षणाला कायद्याच्या ध्येयाशी निगडित केले. सामाजिक संस्थांच्या सुरक्षिततेशी त्यांनी सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेला जोडले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या नैसर्गिक गुणांसहित आणि इतरांशी होणारा वाद टाळण्याकरिता सुरक्षित ठेवण्याचे एक साधन म्हणून कायद्याचा विचार केला. सामाजिक संस्थेची सुरक्षितता ही प्रमुख सामाजिक गरज आहे. प्लेटो या मताचा होता की, प्रत्येकाने त्यांच्या नैसर्गिक गुणानुसार आपली जबाबदारी पार पाडली, तर सामाजिक सौहार्द निर्माण होते. प्रत्येक व्यक्ती ही विशिष्ट गुण, धैर्य, ज्ञान आणि भूक घेऊन जन्माला येते. हेच गुण तीन वेगळे सामाजिक गट निर्माण करतात जसे की, लष्कर, राज्यकर्ते आणि शेतकरी व कामगार. एकाच मानवजातीचे असे कृत्रिम वर्गीकरण करणे ही एक संकल्पना होती.

'चांभाराने चांभारच असावे, त्याने सोबतच वैमानिक असू नये. शेतकऱ्याने शेतकरीच असावे, त्याने सोबतच न्यायाधीश होऊ नये. सैनिकाने सैनिकासोबतच उद्योगपती होऊ नये. आणि वैश्विक विद्वान जो ज्ञानाद्वारे सर्व काही होऊ शकतो आणि करू शकतो, तो जर अशा आदर्श राज्यात आला तर त्याला तेथे थांबायला जागा राहू नये,' अशी प्लेटोची आदर्श राज्याची संकल्पना होती. ॲरिस्टॉटलनेही याच संकल्पनेला पुढे नेत म्हटले की, प्रत्येकाला त्यांच्या ठरलेल्या वर्तुळात ठेवण्याची अवस्था म्हणजे न्याय.

भारतीय परिस्थितीचा विचार केला तर बौद्ध काळापूर्वी प्राचीन भारतातील कायद्यांचे अंतिम उद्दिष्ट काय होते, याचा विचार करू. या ब्राह्मणी विचारसरणीच्या मनूने समाजाला चार वर्णात विभागले, ज्यामुळे एकाच मानवजातीचे कृत्रिम वर्गीकरण झाले. मनूचा उद्देश सामाजिक सौहार्द टिकवणे होता, असे म्हणतात. प्रत्येकाची पात्रता तो कोणत्या वर्णात जन्माला येतो यावर ठरायची. डॉ. आंबेडकरांनी या प्रकारच्या विचारसरणी विरोधात बंड पुकारले. त्यांच्या मते चातुर्वर्ण्य हे समाजाला घातक असून ती अपयशी ठरणारी व्यवस्था आहे.

चातुर्वर्ण्यांचा विरोध असताना डॉ. आंबेडकरांनी प्लेटोच्या संकल्पनेलाही मान्य केले नाही. दोहोंमध्ये कायदा, सामाजिक गरजांची नीट पूर्तता होऊ शकत नाही. एखाद्याच्या सामाजिक गरजेची पूर्तता त्याच्या पात्रतेनुसार ठरावी, ती गोष्ट त्याचा कोणत्या वर्गात जन्म झाला यावर ठरू नये. बाबासाहेबांच्याच शब्दांत सांगावयाचे तर प्लेटोच्या संकल्पनेवर ज्या गोष्टीसाठी टीका करायला पाहिजे, त्याच गोष्टीसाठी चातुर्वर्ण्यावरही टीका व्हायला हवी. लोकांना अतिशय काटेकोरपणे काही वर्गात बांधून ठेवायची प्लेटोची संकल्पना म्हणजे माणूस आणि त्याच्या समतेबाबतचे

उथळ आकलन होय. प्लेटोला याचा विचारच करता आला नाही की, प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगळी, त्याच्यात इतरांपेक्षा वेगळे गुण असतात, आणि त्याद्वारे प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व असते, प्रत्येकाचा वेगळा वर्ग असतो. प्लेटोने प्रत्येकातील प्रचंड वैविध्य आणि सक्रियवृत्तीचा विचारच केला नाही. आधुनिक विचाराने हे सिद्ध केले आहे, व्यक्तीबाबत काटेकोर वर्गीकरण करणे योग्य नव्हे. जर विविध व्यक्तींना वेगवेगळ्या वर्गात विभाजित करण्यात आले, तर त्यांच्या विविध गुणांचा उपयोग योग्य प्रकारे करता येत नाही. ज्या कारणासाठी प्लेटोची गणराज्याची संकल्पना अपयशी ठरते, त्याच कारणाने चातुर्वर्ण्यही अपयशी ठरते, कारण वेगवेगळ्या वर्गातील व्यक्तींना पक्ष्यांप्रमाणे खुराड्यात टाकण्याची कल्पना करणे शक्य नाही. (ॲनिहिलेशन ऑफ कास्ट)

वेगवेगळ्या वर्णांत व्यक्तीचे वर्गीकरण करून सामाजिक सौहार्द मिळवण्याची मनूची संकल्पना किंवा ग्रीकांची कायद्याच्या अंतिम उद्दिष्टांबद्दलची कल्पना सामाजिक समतेवर आधारित नसल्याने अपयशी ठरल्या आहेत. फक्त मूर्खच या प्रकारच्या वर्गीकरणाला मान्य करतील. येथे हा प्रश्न उपस्थित होतो की, चातुर्वर्ण्याची भारतात अंमलबजावणी करण्याकरिता काय बंधने घालण्यात आली होती? मनुस्मृतीत विविध प्रकारच्या शिक्षा सांगण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ - रामाने तपश्चर्येला बसलेल्या शंभूक ऋषींना मारले ती घटना. तपस्या हे वर्णव्यवस्थेप्रमाणे ब्राह्मणांचे कार्य होते, आणि मनुस्मृतीप्रमाणे जो शूद्र वेदपठण करतो अथवा ऐकतो त्याची जिव्हा कापावी किंवा त्याच्या कानात तप्त शिसे ओतण्याची शिक्षा द्यावी. ही अवस्था येथेच संपत नाही.

डॉ. आंबेडकर यांनी महाभारत आणि पुराणांतील काही मजेदार उदाहरणे दिली आहेत. जसे की, ब्राह्मणांनी किती वेळा क्षत्रियांच्या वंशाचा नाश केला आहे? आणि क्षत्रियांनी किती वेळा ब्राह्मणांचा नाश केला आहे, या प्रश्नांची उत्तरे क्लेशदायक आहेत. येथे हा प्रश्न निर्माण होतो की, मनुस्मृती किंवा महाकाव्यात सांगितल्याप्रमाणे त्या तत्त्वांवर आजच्या समाजव्यवस्थेची उभारणी होऊ शकेल का? आधुनिक काळात अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेला जतन करणे हे



कायद्याचे अंतिम उद्दिष्ट होऊ शकते काय? जर या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक आहेत, तर हिंदू समाज अशा गोष्टींना नाकारत का नाही? ज्या गोष्टींचा चुकीच्या पद्धतीने निवाडा करण्यात आला आहे, तिचा निवाडा कधीच झाला नसतो आणि म्हणून फेरनिवाडा करणे, हाच सामाजिक क्लेशांवरील उत्तम उपाय आहे.

## संविधानातील कायदा व सामाजिक न्याय

आपण येथे संविधानातील सामाजिक न्यायाबाबतच्या कलमांत काय अभिप्रेत आहे हे बघू या. प्रस्तावनेत या गोष्टी संक्षिप्तरीत्या मांडण्यात आल्या आहेत. संविधानाची प्रस्तावना म्हणते की, आम्ही भारताचे नागरिक सन्मानाने स्वीकारतो की, भारत हे सार्वभौम, सामाजिक, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य आहे. आणि याद्वारे साऱ्या नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी देतो. त्यात संधी आणि प्रतिष्ठेची समानता, धर्म आणि पूजाविधीचे स्वातंत्र्य आणि बंधुत्व यांचा समावेश होतो.

येथे हे उल्लेखनीय आहे की, न्यायाबाबत लक्ष वेधताना सामाजिक न्याय हा आर्थिक न्यायाच्या आधी येतो आणि आर्थिक न्याय राजकीय न्यायाच्या आधी. या क्रमावरून हे लक्षात येते की, राजकीय स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत. स्वातंत्र्यापूर्वी अस्पृश्यता सामाजिक विषमता, जाति-वर्ण व्यवस्था, हुंडा पद्धती, सतीप्रथा, स्त्रियांना नाकारलेले संपत्तीवरील अधिकार इत्यादी गोष्टींचा नाश करणे, या सामाजिक सुधारणांचा या सामाजिक अनिष्टांचा नाश हीच सामाजिक न्यायाची मूळ संकल्पना होय. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक न्याय शक्य नाही. मात्र लोकांना जर त्यांचे आर्थिक क्षेत्र मिळाले नाही, तर आर्थिक न्यायाची गोष्ट करणे योग्य ठरणार नाही. माणसाच्या जन्मावरून त्याचा उद्योग/क्षेत्र ठरवणे माणसाच्या स्वभावगुणाच्या विरोधात आहे आणि म्हणून कोणताही जाणता समाज या प्रकाराला सामाजिक सौहार्दाचा पाया मानणार नाही, तशी समानरचना खोटी ठरेल.

आपल्या संविधानात प्रस्तावनेतील सामाजिक न्यायाचे ध्येय गाठण्यासाठी विविध प्रावधाने करण्यात आली आहेत. जसे: कलम-१७ अस्पृश्यता निवारणासाठी आहे, कलम-१८ किताबा संबंधात आहे. कलम - १५, १६, ३३ हे राज्याला शैक्षणिक संस्थांमध्ये आणि शासन सेवेत एस.सी./ एस.टी. आणि इतर मागासवर्गांना आरक्षण देण्यासंदर्भात आहेत. ज्यांना शैक्षणिक आणि आर्थिक अधिकारांपासून शतकानुशतके वंचित ठेवण्यात आले होते, त्यांना शासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपाद्वारे संरक्षक करून त्यांची उन्नती साधण्याचे उद्दिष्टच त्यातून अधोरेखित केलेले आहे. डॉ. आंबेडकर यांनी म्हटलेच आहे, शिक्षण किंवा ज्ञान हीच शक्ती आहे. शासन सेवेत आरक्षणामुळे वंचित वर्गाला आर्थिक बळ मिळाले आहे. आरक्षणामुळे त्यांच्या मुलांना उत्तम शिक्षण आणि माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची सामाजिक संधी मिळाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नवीनच प्रमेय मांडले आहे की, आरक्षण जरी संविधानाच्या भाग तीनचा घटक असला, तरी ते सक्षमीकरणाचे साधन होय. आणि हे त्या त्या राज्यावर / शासनावर अवलंबून आहे की, आरक्षण द्यावे अथवा देऊ नये.

आरक्षण हे सूचक आहे किंवा बंधनकारक हा भाग, हा वेगळा मुद्दा आहे. मात्र त्याची अंमलबजावणी शासनावर सोपविलेली आहे, हे निश्चित.

संविधान आणि त्या अंतर्गत केलेल्या कायद्यान्वये सामाजिक न्यायाची जी संकल्पना आहे, त्याचे मूळ कायद्याच्या अंतिम उद्दिष्टाच्या विविध प्रमेयांत आहे. ग्रीक आणि रोमनांच्या मते कायद्याचे अंतिम उद्दिष्ट फार काळापुरते राहू शकत नाही, कारण मानवी गरजा आणि नैसर्गिक अधिकाराचे कधीही समाधान होऊ शकत नाही. मानवाचा स्वभाव हा त्याच्या गुणावर अवलंबून असतो. यात प्रत्येकाच्या विवेकाला महत्त्व दिले आहे. मात्र विधिज्ञांनुसार प्रत्येक माणूस सारखा नैसर्गिक समानता हीच समानतेचा निकष ठरते. आदर्शवादाच्या सिद्धांताचा पुरस्कर्ता 'कांट' नावाचा राजकीय अभ्यासक कायद्याबाबत म्हणतो की, कायदा म्हणजे अशा वैश्विक नियमांची किंवा तत्त्वांची व्यवस्था होय, की ज्यात कर्त्याची इच्छा ही इतरांच्या इच्छेत समाविष्ट असते. येथे असे नियम किंवा तत्त्व मानवी कृत्याला लागू होतात. जेर्मी बेंथनच्या म्हणण्यानुसार शासनाद्वारे अंमलात आणलेल्या नियमांचे संकलन म्हणजे कायदा होय, की ज्याद्वारे प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक सुख, स्वातंत्र्याच्या स्वरूपात उपभोगता येईल. इंग्रज विचारवंत या विचारसरणीचा पुरस्कार करतात की, इतरांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यापलीकडे प्रत्येकाच्या



असतो. ही नैसर्गिक समानता इच्छेच्या स्वातंत्र्यातील समानतेचे रूप घेते. कोणतीही सामाजिक बंधने या इच्छेच्या स्वातंत्र्यावर बंधने घालू शकत नाहीत. येथे हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो की, स्वतंत्र अस्तित्वाच्या व्यक्तीच्या इच्छा ओळखून त्यांच्यात समानता कशी आणायची? अशा वेळी स्वतंत्र वागण्यावर / कृत्यावर बंधने घालू नयेत. त्यांच्या मते हीच कायद्याची परिणती होय.

या शतकात, विधिज्ञांनी या दिशेने विचार करायला सुरुवात केली आहे की, मानवी इच्छेपेक्षा आणि आकांक्षांना जास्त महत्त्व द्यावे. आता केवळ इच्छांचे समग्रीकरण करण्याऐवजी गरजांच्या समाधानाचे समग्रीकरण करण्याला महत्त्व देण्यात येत आहे. मी कायद्याचा विचार सामाजिक संस्था म्हणून करतो की, ज्याद्वारे लोकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करता येईल. राजकीयदृष्ट्या संघटित समाजाद्वारे मानववागणुकीचे नियंत्रण अशा पद्धतीने करणे की, ज्यामुळे सुसंस्कृत समाजातील घटकांच्या इच्छांची पूर्तता कमीत कमी त्याग करून होईल, असे रोसलो पाऊंडने योग्यच म्हटले आहे. त्याचे म्हणणे हेच आहे की, कायद्याची परिणती ही सामाजिक रचना होय.

डॉ. आंबेडकरांचेही मत होते की, समाजातील विविध घटकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करणे हेच कायद्याचे कार्य असावे. हे करताना 'जैसे थे' परिस्थिती ठेवणाऱ्या चालीरितींना तिलांजली देणे आवश्यक आहे. त्यांनी 'हिंदू कोडबिल' केवळ वंचित महिलांना त्यांचे अधिकार मिळवून देण्याकरिता बनवले. मात्र त्यांच्या या प्रयत्नाला संसदेतील उच्चवर्णीयांनी उद्ध्वस्त केले आणि पंडित नेहरू मूक प्रेक्षक बनून राहिले.

संविधानातील कलम-४४ मधील 'समान नागरी संहिता' हे त्यांचेच योगदान होय. त्यांना समाजाची अशी पुनर्रचना हवी होती की, ज्यात महिला व पुरुषांना सारखे मूलभूत अधिकार मिळतील, जे की त्यांच्या श्रद्धेवर अवलंबून राहणार नाहीत. एखाद्या मुस्लीम स्त्रीला कालबाह्य झालेल्या वैयक्तिक कायद्यांचा त्रास का व्हावा? हिंदू कायद्यांत मुलींना प्रथमश्रेणी वारसा हक्क मिळू नये? विविध धर्मांच्या साऱ्या स्त्रियांना लग्नाशी संबंधित असलेले वारसा हक्क, दत्तक विधान इत्यादी हक्क समान का नसावे? राजकीय नेतृत्वाच्या व इच्छाशक्तीच्या अभावामुळे समान नागरी संहितेची मूळ संकल्पनाच कधी संसदेसमोर येऊ शकली नाही.

संसदेच्या विषयतालिकेवर अनुसूचित जाती/जमाती अन्याय प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, बालमजूर प्रतिबंधक कायदा आणि इत्तर कायदे आहेत.

लोकराज्य नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मधून पुनर्मुद्रित.

**घटनेचा सरनामा हा तर घटनेचे ध्येय-धोरण, स्वरूप व गाभा यांचा आरसा असतो. संक्षिप्त भाषेत; पण अर्थपूर्ण शब्दांत संकीर्णपणे केलेले ते घटनेवरील भाष्यच असते. ते नीट न्याहाळणे अभ्यासकाचे कर्तव्य असते.**

# राज्यघटनेचा सरनामा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**न्या. पी. बी. सावंत**

आमच्या राज्यघटनेचा जन्म डिसेंबर १९४६ ते डिसेंबर १९४९ या तीन वर्षांच्या दीर्घ प्रसूतिवेदनांनंतर झाला. या काळाने दुसऱ्या महायुद्धाचा अंत नुकताच पाहिला होता व त्याबरोबरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेचे स्वागतही केले होते. प्रसूतिवेदनांच्या काळातच संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेली मानवी हक्कांची सनद त्याने वाचली होती व युद्धाने लोकशाहीला 'फासी'वादावर मिळवून दिलेल्या विजयावर या सनदेने केलेले शिक्कामोर्तब पाहून समाधानाचा निःश्वास टाकला होता. आमच्या घटनेला आणखी दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय घटितांची पार्श्वभूमी होती. १९१७ साली सोव्हिएत युनियनमध्ये व १९४९ साली चीनमध्ये झालेली साम्यवादी क्रांती.

परंतु घटनेची जडणघडण होत असतानाच देशावर, धर्माच्या पायावर झालेल्या फाळणीचा आघात व त्यापूर्वी व त्यानंतर झालेले अभूतपूर्व मानवी हत्याकांड याचे भीषण दृश्य तर घटनाकारांना रात्रंदिवस भेडसावीत होते. आमच्या घटनेवर या सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटितांचा परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या झाला आहे, हे लक्षात ठेवून घटनेच्या सरनाम्याचा अभ्यास होणे अत्यावश्यक आहे. घटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी व तात्कालिक परिस्थिती नीट समजून घेतल्याशिवाय घटनेचा यथार्थ बोध होणे कठीण असते. घटनेचा सरनामा हा तर घटनेचे ध्येय-धोरण, स्वरूप व गाभा यांचा आरसा असतो. संक्षिप्त भाषेत; पण अर्थपूर्ण शब्दांत संकीर्णपणे केलेले ते घटनेवरील भाष्यच असते. ते नीट न्याहाळणे अभ्यासकांचे कर्तव्य असते.

१९५० साली जेव्हा घटना अमलात आली तेव्हा सरनाम्याच्या उपोद्घातात 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द व त्याच्या चौथ्या परिच्छेदात 'एकात्मता' हा शब्द नव्हता. याचा अर्थ घटनेला आरंभी या शब्दांचे वावडे होते असा नाही. उलट या संकल्पना घटनेच्या इतर तरतुदीत अविभाज्यपणे पूर्वीपासूनच गुंफलेल्या आहेत; परंतु अस्थिर राजकीय परिस्थिती व या संकल्पनांच्या स्पष्ट उल्लेखाचा अभाव यांचा फायदा घेऊन काही प्रतिगामी शक्ती जेव्हा घटनेला अभिप्रेत असलेल्या समाजपरिवर्तनाविरुद्ध हालचाली करू लागल्या, तेव्हा १९७६ साली घटनेत दुरुस्ती करून जाणीवपूर्वक व घटनेच्या मूळ हेतूचा पुनरुच्चार करण्याकरिता या संकल्पना अलगपणे स्पष्ट शब्दात मांडण्यात आल्या. कुठल्याही बाह्य बंधनाशिवाय जो देश आपला अंतर्गत कारभार व परदेशी व्यवहार आपल्या इच्छेप्रमाणे करू शकतो, तोच देश सार्वभौम असतो. ज्या देशातील जनता आपल्या देशाचा कारभार स्वतःच्या इच्छेप्रमाणे चालवते, तिथेच गणराज्य वा लोकसत्ताक राज्य असते. जिथे सर्व जनता, सर्व जनतेच्या इच्छेप्रमाणे व सर्व जनतेच्या हिताकरिता राजवट चालवते, तिथे लोकशाही नांदत असते. जिथे कुठल्याही एका धर्माचे, पंथाचे वा समाजसमूहाचे राज्य नसते, तिथे धर्मनिरपेक्ष राजवट असते. जिथे सर्व स्त्री-पुरुष 'नागरिक' म्हणून सर्व दृष्टीने समर्थ असतात, जिथे कमीत कमी आर्थिक व सामाजिक विषमता असते,



जिथे कुणालाही इतरांना आर्थिक वा मानसिक 'दास' करण्याची संधी नसते व उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची असतात, तिथे समाजवादी समाज अस्तित्वात असतो.

अशाच समाजात सर्वांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळतो आणि आचार-विचाराचे, उक्तीचे व भक्तीचे स्वातंत्र्य असते. अशाच समाजात सर्वांना समान स्थान व संधी मिळते आणि बंधुता व व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासली जाते. तसेच देशाच्या ऐक्याची व एकात्मतेची रक्षा होते.

वरील ज्या सर्व मूलभूत गोष्टी घटना साकार करू इच्छितात व ज्या साकार करण्याकरिता घटनेत तरतुदी केलेल्या आहेत, त्याचे दिग्दर्शन सरनाम्यात यथोचित संकल्पनांच्याद्वारे करण्यात आले आहे. म्हणूनच घटनेतील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे याप्रमाणेच सरनामा हा घटनेचा पायाभूत भाग मानण्यात आला आहे व घटनेत दुरुस्ती करून तो बदलण्यात येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

ज्या डॉ. आंबेडकरांनी घटना साकार करण्यात प्रमुख योगदान दिले, त्यांच्याच लेखणीतून घटनेचा मथितार्थ सरनाम्याच्या स्वरूपात व्यक्त होणे हे स्वाभाविक, योग्य व औचित्यपूर्ण होते. त्यांनी ही जबाबदारी किती समर्थपणे व निर्णायकरीत्या पार पाडली आहे, हे सरनाम्याच्या छोटेखानी; परंतु निनादणाऱ्या प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट होते. सरनाम्याच्या रूपात घटनेचा आत्माच आपल्याशी बोलत आहे असा भास होतो. तो प्रत्येक नागरिकाने मुखोद्गत करून त्याचे नेहमी स्मरण करणे आवश्यक आहे. देशाला ज्या नवसमाजाची आवश्यकता आहे, ज्या समाजनिर्मितीचे आव्हान घटनेने आम्हाला दिले आहे व जे समाजपरिवर्तन घडवून आणण्याची प्रतिज्ञा आम्ही सर्व भारतीयांनी केली आहे, ती जबाबदारी आम्हाला पूर्ण करायची आहे, याची आठवण त्यामुळे सर्वांना सदोदित होत राहील.

लोकराज्य नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मधून पुनर्मुद्रित.

# अनुयायांना जाहीर आवाहन

नागसेन कांबळे

**परमपूज्य बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ५ आणि ६ डिसेंबर २०२५ रोजी येणाऱ्या अनुयायांना विनंती की, त्यांनी खालील नमूद सूचनांचे काटेकोरपणे कृपया पालन करावे.**

१) महापरिनिर्वाण दिन हा दुःखद दिन असल्याने हा दिवस साऱ्यांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांचे चिंतन; तसेच आत्मपरिरक्षण करण्याचा हा दिवस आहे.

३) या दिनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे आणि सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करून २२ प्रतिज्ञांचे स्मरण करावे.

४) चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दर्शनासाठी येताना कृपया रांगेतून, शिस्त पाळावी व शांतपणे दर्शन घ्यावे.

५) बाहेरगावांहून अथवा दूरवरून आलेल्या ज्येष्ठ नागरिकांना अनुयायांच्या रांगेत प्राधान्या द्या. कृपया सर्वांना सहकार्य करा.

६) स्वयंसेवक, कार्यकर्ते; तसेच महापालिका प्रशासन आणि पोलीस दल यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे. अंधश्रद्धा; तसेच अफवा पसरविणाऱ्या लोकांपासून सावध राहावे.

७) घातपाती कृत्य / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तूंवर नजर ठेवून तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. पोलिसांशी १११ क्रमांकावर संपर्क साधावा.



८) कोणताही प्रकारच्या मदतीकरिता पोलीस नियंत्रण कक्ष, महापालिका कक्ष, भारतीय बौद्ध महासभा (समता सैनिक दल); तसेच महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे स्वयंसेवक, माहिती कक्षाशी संपर्क साधावा.

९) सामुदायिक वंदना म्हणण्याची प्रथा सुरू करावी, घोषणा देऊ नये, शांततेचे वातावरण राखावे.

१०) चैत्यभूमी, शिवाजी पार्कसह अनुयायांचा वावर असलेला सर्व परिसर स्वच्छ राखावा, कचरा इतरत्र फेकू नये. कचरा कुंडीतच टाकावा.

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासाठी आलेल्या अनुयायांना गर्दीत बालक, वृद्ध महिला हरविण्याची दाट शक्यता असल्याने संपर्काकरिता बालक, वृद्ध महिला यांच्याजवळ पूर्ण पत्ता व दूरध्वनी असलेला कागद द्यावा.

१२) अनुयायांनी भगवान गौतम बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना म्हणण्याची प्रथा सुरू करावी. कोणत्याही प्रकाराची धक्का-बुक्की करू नये, कारण छोट्याशा धक्का-बुक्कीचे रूपांतर चेंगराचेंगरीत होऊ शकते.

१३) या दिवशी बुद्ध आंबेडकर यांच्याशी संबंधित असलेले साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले; तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका विकत द्याव्यात.

१४) बेवारस वस्तूला हात लावू नये व त्याबाबत तत्काळ पोलिसांना कळवावे.

१५) रहदारीच्या मार्गामध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना / वाहनांना अडथळा निर्माण करू नये.

१६) स्टॉलवर कुठल्याही प्रकारचे खाद्यपदार्थ शिजवू नयेत, ज्वलनशील वस्तू / पदार्थ यांचा वापर पूर्णपणे टाळावा.

१७) घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायांनी दक्षता घ्यावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेवून पोलिसांना कळवावे.

१८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित सर्व स्थळे, पुतळ्यांच्या पवित्र जागा आदी ठिकाणांचे पावित्र्य जपणे, तेथे संसर्गाचा फैलाव होऊ नये, ही आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे.

१९) सर्व सोयी-सुविधा या अनुयायांकरिताच आहेत. त्यामुळे वरील सूचना पालन करून त्यांचा लाभ घ्यावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्ष, त्याग व विचारांचे स्मरण करू या, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल.



सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...



सर्वत्र : सर्वोत्तम

**लोकराज्य**

**महासंवाद**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**जय महाराष्ट्र**

ऐकायलाच हवा

**दिलखुलास**

संवाद...

आपलं

**मंत्रालय**

## माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

R.N.I.No. 14140




Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**गोविंद अहंकारी**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. वृंदावन एंटरप्रायजेस प्रा.लि., शॉप नं. ए-१,२,३, सिडको बसस्टॉप, ठाणे (प.) येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह